शाहूनगरवासी नाटकमंडळीकरितां

रा. रा. ल. ना. जोशीकृत,

कपिध्वज

अथवा

कपटप्रभाव नाटक.

मुंबईः
" तत्त्वविवेचक " प्रेस.

July 1906
No 10/A of 1906/7.

कपिध्वज आणि आभारादर्श.

सर्व

शेक्सपियर कवीनें 'किंग् जॉन्' नाटक ऐतिहासिक म्हणून रचिलेलें असल्यामुळें—त्याला इतिहासाला फारसें सोडितां आलें नाहीं. त्याचमुळें (कॉन्स्टन्स्)ची म्हणजे आमच्या **चित्रसेनेची** भूमिका त्यानें तिसऱ्या अंकाच्या अखेरीसच रंगभूमीवरून अदृश्य केली आहे; परंतु महाराष्ट्र—नाटकगृहांत हें नाटक ऐतिहासिक ह्या सदराखालीं प्रयोगरूपानें पुढें आणण्याचा विचार नसल्यामुळें आणि पुढील दोन्हीं म्हणजे चवथा आणि पांचवा ह्या अकांत मूळांतच स्त्रीपात्रांचा स्पर्श रंगभूमीला करण्याचें इतिहासामुळें कवीला नाइलाजानें टाळावें लागल्यानें, ते दोन्हीं अंक र भरित असूनही, श्रीरहित अशा सुंदर इमारतीप्रमाणें दिसले—म्हणून चित्रसेनेला चवथ्या अंकांत (फ्रान्स) **फेनपदेशांतून** गुप्तपणानें पुरुषाच्या वेषा((इंग्लंड) **इंद्रकीलास** भविष्यवादी ह्या नात्यानें आणून (ऑरथर) **वीरबाहूची** आणि तिची तुरुंगांत भेट करवली आहे. प्रसंग आला असतां स्त्रियांचें धाडस खून करण्याला किंवा आत्महत्या करण्याला कसें तयार होतें ह्याचेंही चित्र—**चित्रसेनेच्या** पात्राकडूनच पांचव्या अंकांत अखेरीस दाखवून—मूळ नाटक जसें शोकपर्यवसायी आहे तसेंच हें त्याचें मराठी परावर्तनही ठेविलें आहे.

'किंग् जॉन्' संबंधाचा इतिहास सुशिक्षित वर्गाला अवगत आहेच. नाटककारानें आपलें कौशल्य नाटकरचनेंत काय दाखविलें आहे त्याची पुस्तक वाचून आणि प्रयोग पाहून परीक्षण करण्याची योग्यता विद्वान वाचकवृंदांत आहे. पुस्तकांतील विषयाचा गोषवारा ...तावनारूपानें देण्याचा जो अलीकडे संप्रदाय पडला आहे त्याचा ह्या प्रसंगीं स्वीकार नकेल्याबद्दल वाचकवर्ग क्षमा करील अशी आशा आहे.

ही गोष्ट सुशिक्षित आणि विद्वानांची झाली. आतां र...ला कायतो अविद्वान आणि अशिक्षित वर्ग; परंतु ह्या पुस्तकासारख्या नाटकग्रंथांतून कवीनीं काय काय चमत्कार ग्रथित केलेले असतात

त्यांचें हुबेहुब प्रदर्शन दाखविण्याच्या कामांत
जोशी आणि **बाळाभाऊ जोग** ह्यांनीं मुख
स्वीकारून, आपल्या **शाहूनगरवासी नाटकमंडळी**कडून जा
गारी आज बरींच वर्षे चालविली आहे–तिनें अशिक्षितांचें दुहेरी काम होऊन, सुशिक्षितांचेंही एकेरी काम होत आहे. शिवाय ह्यामुळें नाटक-ग्रंथलेखनालाही ग्रंथकारांस उत्तेजन येत असून, ह्याबद्दल त्या मंडळीच्या आश्रित नाटकग्रंथकारांनीं त्या मंडळीचे आभार मानिले पाहिजेत हें योग्य आहे. प्रकृत नाटक ह्याच मंडळीकरितां रचिलें असून–ह्याचा प्रयोगही ही मंडळी लवकरच करणार आहे ह्याबद्दल पुस्तककर्ता मंडळीचा आभारी आहे.

हें पुस्तक शाहूनगरवासी नाटकमंडळीला वाचून दाखविण्याच्या आधीं पुस्तककर्त्याचे परम मित्र **रा. रा. महादेव दामोदर करंदीकर, बी. ए., एल्‌एल्. बी.,** यांनीं तपासून–मूळांतल्या कल्पना कांहीं ठिकाणीं चुकल्या होत्या त्यांबद्दल सूचना केल्या–ह्याबद्दल पुस्तककर्ता त्यांचा ऋणी आहे.

मुंबई,
ता. २५ डिसेंबर सन १९०४.

ल. ना. जोशी.

कपिध्वज–नाटकावरील
सर्वमान्य वर्तमानपत्रांचे
अभिप्राय.

काळ, पुणें–ता० ५ ऑगस्ट स० १९०४ इ०.

कपिध्वज -हें नाटक रामदास नाटकाचे कर्ते रा. रा. लक्ष्मणराव जोशी यांनीं शेक्स्‌पियरच्या **किंग जॉन** नामक नाटकाच्या आधारें शाहूनगरवासी नाटकमंडळीकरितां लिहिलें आहे. रा. रा. जोशी यांच्या हातून पूर्वीं कित्येक नाटकें लिहिलीं गेलीं असल्यामुळें या नाटकांतील त्यांची भाषा वगैरे चांगली साधली आहे. आपल्या इकडील रीतरिवाजास जुळण्याकरितां मूळच्या गोष्टींत केलेले फेरफारही बरेच चांगले जुळून आलेले आहेत. **किंग जॉन** हें शेक्स्‌पियरच्या चांगल्या नाटकांपैकीं एक आहे व शेक्स्‌पियरच्या अत्युत्कृष्ट प्रवेशांपैकीं एक प्रवेश या नाटकांत आहे. तापलेल्या सांडसांनीं एका राजपुत्राचे डोळे फोडण्याच्या प्रवेशामध्यें शेक्स्‌पियरनें आपलें कौशल्य किती दाखविलें आहे, हें पाहण्याचीं संधि या नाटकाच्या द्वारें रा. रा. जोशी यांनीं महाराष्ट्रवाचकांस आणून दिली, याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

भारतधर्म, मुंबई–ता० ८ ऑगस्ट स० १९०४ इ०

कपिध्वज अथवा **कपटप्रभाव**–हें नाटक रा. रा. ल. ना. जोशी यांनीं लिहिलें आहे. रा. जोशी यांनीं बरींच नाटकें केलीं आहेत; आणि मूळची बुद्धीही त्यांच्यांत–या विषयास बरीच योग्य आहे असें, पुस्तकरचनेवरून दिसतें. प्रयत्न चांगला साधला आहे.

श्रीसयाजीविजय मुंबई–ता० १३ ऑगस्ट स० १९०४ इ०

कपिध्वज अथवा **कपटप्रभाव**–हें पुस्तक, त्याचे कर्ते रा. रा. लक्ष्मण नारायण जोशी यांनीं शाहूनगरवासी नाटकमंडळीकरितां लिहिलें आहे. रा. जोशी यांनीं आजपर्यंत बरींच नाटकें लिहिलीं असल्यामुळें प्रस्तुत नाटक चांगलें वठलें आहे. मूळ नाटकांतील चौथ्या अंकांत ताप-

लेल्या सांडसांनीं आर्थरचे डोळे फोडण्याचा प्रवेश अत्यन्त हृदयद्रावक आहे. कपिध्वजांतही हा प्रवेश उत्तम साधला आहे. **किंग जॉन** नाटकाचें गांभीर्य लेडी कॉन्स्टन्स व आर्थर ह्यांचा जो दुःखकारक शेवट झाला त्यांतील विरोधांत आहे. मराठी–रंगभूमीला शोभण्याकरितां ग्रंथकर्त्यांनीं मूळाप्रमाणें लेडी कॉन्स्टन्सच्या भूमिकेचा शेवट तिसऱ्या अंकांतच होऊं न देतां पांचव्या अंकापर्यंत तिला रंगभूमीवर आणिली आहे. ह्या फेरफारानें नाटकाचें गांभीर्य कमी झालें नसून उलट संविधानक गोड झालें आहे. नाटक मराठी रंगभूमीला शोभेल असें करण्याकरितां ग्रंथकर्त्यांनीं कित्येक ठिकाणीं फेरफार केले आहेत ते योग्य आहेत. एकंदरींत नाटक चांगलें साधलें आहे. रा. जोशी ह्यांनीं मराठी नाटकांत एका चांगल्या नाटकाची भर घातली ह्याबद्दल त्यांचे आम्ही आभार मानितों.

इंदुप्रकाश,–ता० २४ ऑगस्ट स० १९०४ इ०.

कपिध्वज अथवा **कपटप्रभाव नाटकः**–रा. रा. लक्ष्मण नारायण जोशी यांनीं सदरहू नाटक शेक्सपियर कवीच्या 'किंग जॉन' नामक ऐतिहासिक नाटकाच्या आधारानें लिहिलें आहे. मूळांत कॉन्स्टन्स ही भूमिका पहिल्या तीन अंकांतच शेक्सपियरनें दाखविली आहे. प्रस्तुत नाटककारांनीं ह्या भूमिकेला पुरुषाचा पेहराव चढवून रंगभूमीवर आणली आहे. पहिल्या तीन अंकांत चित्रसेनेच्या भूमिकेला जगविख्यात नाट्यकलापटूनें ज्या कौशल्यानें रंगविलें आहे त्या कौशल्याची झांक पुढील दोन अंकांत म्हणजे चौथ्या व पांचव्यांत दिसून येते. कपिध्वजाच्या भूमिकेला शोभणारी भारदस्त भाषा नाटककारांनीं वापरली आहे. इंग्रजी कथानकाला महाराष्ट्र–भाषेचा पोषाख चढवितांना इंग्रजी रीतिभाती अथवा इंग्रजी भाषा यांचा कोठेंही छद्म दिसतां कामा नये. तसा प्रयत्न प्रस्तुत नाटककारांनीं केला आहे. अर्पणपत्रिकेची प्रस्तुत नाटककारांनीं मात्र अगदीं नवीन कल्पना काढली आहे. ह्या नाटकांतील नायिका चित्रसेना हिच्या महाराष्ट्र–रंगभूमीवरील प्रथमावतरणास हें पुस्तक कर्त्यानें अर्पण केलें आहे. ही कल्पना मार्मिक आहे व अर्पणपत्रिकेमध्यें ही केलेली सुधारणा इतर नाटककारांनीं विचार करण्यासारखी आहे. एकंदरीनें नाटक बरें साधलें आहे.

इंग्लंडचे सिंहासनाधीश

पहिले रिचर्ड राजे

यांची जी दुर्दैवी पत्नि

राणी कॉन्स्टन्स्

तिच्या

महाराष्ट्ररंगभूमीवरील

चित्रसेना नांवाच्या

प्रथमावतरणास

हें पुस्तक

अर्पण केलें

आहे.

नाटकांतील पात्रें.

कपिध्वज .... इंद्रकीलचा राजा.
मणिपाल.................. इंद्रकीलचा युवराज.
वीरबाहु .... इंद्रकीलचा बालराजा.

सुभानु	इंद्रकीलचे सरदार.
मुचकुंद	
संजीवसेन	
वृषसेन	
इडस्पति	

शबलाक्ष .... दासीपुत्र.
अर्कपाल .... एक जमीनदार.
हंसकेतु .... फेनपचा राजा.
हंसचूड .... फेनपचा युवराज.
सुदर्शन .... फेनपेशाचा सरदार.
कुशध्वज .... धर्मगुरूचा एक दूत.
वेत्रवती .... इंद्रकीलची विधवा राजमाता.
चित्रसेना.................. वेत्रवतीची विधवा सून.
स्वयंप्रभा.................. सम्राटची राजकन्या.
त्रिशिला .... शंखचूड आणि अर्कपाल यांची माता.

सरदार, वकील, हेर, दूत, सैनिक वगैरे.

कपिध्वज

अथवा

कपटप्रभाव नाटक.

अंक पहिला.

प्रवेश पहिला.

[इंद्रकीलच्या राजवाड्यांतील सिंहासनावर–कपिध्वज राजा, त्याच्या जवळ त्याची विधवा आई वेत्रवती, पुढें सरदार–सुभानु, आणि वृषसेन व फेनपदेशाचा वकील वगैरे मंडळी बसलीं आहेत असा प्रवेश उघडतो.]

कपिध्वज–वकीलसाहेब, फेनपदेशच्या तुमच्या राजाचं काय म्हणणं आहे ?

वकील–त्यानीं महाराजांचं कुशल विचारून, महाराजांना एक विनंति करायला मला सांगितलं आहे.

कपिध्वज–बोला.

वकील–हें इंद्रकीलचं सिंहासन आपण निव्वळ चोरीकरून उपटलं आहे.

वेत्रवती–काय, चोरीकरून उपटलं आहे ?

वकील–फेनपदेशाचे राजे हंसकेतु–यांनीं वीरबाहूचा पक्ष उचलला आहे. आपल्या आधीं ह्या सिंहासनावर जे आपले बंधु अजितसिंह नामक होते, त्यांचे चिरंजीव वीरबाहू हेच ह्या सिंहासनाचे खरे वारस आहेत. त्यांच्या तर्फे, आमचे महाराज असं कळवतात कीं, ह्या सुंदर इंद्रकीलबेटावर आणि आमच्या फेनपदेशांतल्या ज्या प्रांतांवर आपण आपला हक्क सांगत आहां

तो खोटा आहे. त्या सर्वांवर राज्य करणारे खरे राजे—आपले पुतणे-वीरबाहू हेच न्यायाचे राजे आहेत. म्हणून कोणच्याही प्रकारें शस्त्रास्त्रांचा उपयोग न करितां—शांततेंत—त्यांचा हक्क त्यांना मिळावा.

कपिध्वज—बरं, त्यांच्या म्हणण्याप्रमाणें आम्हीं कबूल झालों नाहीं, तर ते आमचं काय करणार ?

वकील—घोर आणि हृदयद्रावक असा दोन्ही राष्ट्रांचा रण-संग्राम होईल.

कपिध्वज—ठीक आहे. त्यांची रक्तपात करण्याची इच्छा असल्यास आम्हींही रक्तपात करायला तयार आहोंत.

वकील—बरं आहे. घेतों रजा तर मग ?

कपिध्वज—आमचा निरोप फेनपेशाला तावडतोब जाऊन कळवा. तुम्हीं तिथें जाऊन पोंचण्याच्या आधीं आम्हीं तिथें जाऊन पोंचूं. म्हणून तुमची गती विजेसारखी करा आणि त्याचे डोळे दिपवा. तुम्हीं तिथें जाण्याच्या आधींच आमच्या तोफांचे गडगडाट, आमचा निरोप तुमच्या राजाला कळवतील. तुम्हीं आमच्या रागाची तुतारी होऊन, फेनपेशाला असं कळवा कीं, यमघंटा जीं घुबडं तीं तुझ्या राजवाड्याच्या अत्युच्च मनोऱ्यावर घूत्कार करूं लागलीं आहेत. जा—त्याचा सभ्यपणा त्याच्यापाशींच राहूंद्या. सुभानु, ह्या वकीलांची योग्य व्यवस्था लावा.

(कपिध्वज आणि वेत्रवती ह्यांशिवाय सर्व जातात.)

वेत्रवती—राजा, तुझा पुतण्या वीरबाहू हा फेनपेशाच्या साह्यानं आपले ह्या सिंहासनावरचे हक्क शाबीत करण्याकरतां हरतऱ्हेच्या खटपटी करील, असं मी तुला पूर्वी पुष्कळ वेळां सांगितलेलं आठवत असेलच. त्याचा प्रत्यय अतांच आला. जी गोष्ट सध्यां हातघाईवर आली आहे आणि जिचा शेवट चांगला किंवा

वाईट–कोणच्यातरी तऱ्हेचा–रक्तपातांत होणार आहे, तीच गोष्ट, ममतेनं आणि स्नेहभावानं-हवीतशी आपसांत ठरवून-यापुढें दोन राष्ट्रांत होऊं पाहणारं रणकंदन व्हायचं चुकेल, तर बरं होईल.

कपिध्वज–आई, तुम्हांला भिण्याचं कांहीं कारण नाहीं. आमचा पराक्रम आणि आमच्या सैन्याची अद्वितीय युद्धकला, ह्या दोन्ही गोष्टी आमच्या पक्षाला सबल असल्याकारणानं आम्हांला भिण्याचं मुळींच कारण नाहीं.

वेत्रवती–राजा, तुझ्या हक्कापेक्षां तुझं बल अधिक आहे. हीच समाधान मानायला जागा आहे. बाकी ह्या सगळ्याच्या मुळाशीं काय आहे–तें–मी, तूं किंवा परमेश्वर ह्यांशिवाय कोण जाणणार आहे ?

भालदार–(पुढें येऊन) सरकार, योग्य न्याय मिळण्याकरतां एक अति चमत्कारिक खटला बाहेर आला आहे. आज्ञा होईल तर हजर करतों.

कपिध्वज–घेऊन ये पुढें.

(अर्कपाल आणि शंखचूड येतात.)

तुम्हीं दोघे कोण आहांत ?

शंखचूड–मी ह्याच इंद्रकीलच्या राज्यांत प्रतिष्ठित अशा कंदर्पकुलांत जन्मलों आहें. जयसेनजी सारख्या आपल्या थोर सरदारांचा थोरला मुलगा आणि आपला अत्यंत लीन प्रजाजन आहें.

कपिध्वज–तुम्ही कोण ?

अर्कपाल–त्याच थोर जयसेनजींचा मी खरा औरस पुत्र आहें.

कपिध्वज–तर मग तो थोरला आणि तूं वारस ! असंच किं नाहीं ? तुम्हां दोघांची उत्पत्ति एकाच स्त्रीपासून झाली नसावी असं ह्यावरून दिसतं.

शंखचूड–महाराज, आमची दोघांची उत्पत्ति एकाच स्त्रीपासून झालेली आहे. आणि त्यावरून आम्हां दोघांचा बापही एकच होता असं जें मला वाटतं तें सर्वश्रुत आहे. परंतु ह्याबद्दलची खरी हकीकत माझी माता आणि परमेश्वर ह्यांनांच ठाऊक असली पाहिजे. आपण मानतों त्याच आईबापांपासून आपला जन्म झाला आहे किंवा नाहीं ह्याबद्दलची माझ्याप्रमाणेंच प्रत्येकाला खरी माहिती नसणं हें स्वाभाविकच आहे.

वेत्रवती–बैला, आग लागो त्या तुझ्या तोंडाला. असल्या घाणेरड्या संशयानं आपल्या आईची अब्रू रस्त्यावर ओढून तिला बाजारबस्वी ठरवतोस होय?

शंखचूड–कोण–मी?

वेत्रवती–हो–हो-तूं!

शंखचूड–अशी गोष्ट मी कधीं करणार नाहीं. हा संशयाचा मुद्दा माझ्या भावाचा आहे. मी जर असं बोललों, तर मला तत्क्षणीं इथून हांकून लावा. मला माझं वर्षांचं आठ हजारांचं उत्पन्नही नको आणि माझ्या जमीनीही मला नकोत. परमेश्वरा, माझ्या आईची लाज राखणं तुझ्याकडे आहे.

कपिध्वज–ह्याच्या बोलण्यावरून हा मोठा प्रामाणिक असावा असं वाटतं! शंखचूडा, तुझ्या भावाचं काय म्हणणं आहे? अर्कपाल तुझा धाकटा भाऊ असून, तुझ्या बापाच्या सर्वस्वाचा खरा वारसा तुझ्याऐवजीं त्याला मिळावा असं तो कसं म्हणतो?

शंखचूड–अपहाराव्यतिरिक्त यांतलं गौप्य मला कांहींच कळत नाहीं. जयसेनजी, आपणच जर आम्हां दोघांचे खरे तीर्थरूप असाल, तर मी आपल्यापुढें दंडवत घालतों. हा अर्कपाल, जर आपल्यासारखाच हुबेहूब झाला असेल, तर आपल्यासारखं रूप मला प्राप्त झालं नाहीं म्हणून मी परमेश्वराचे आभार मानतों.

कपिध्वज–काय हा चमत्कारिक प्राणि परमेश्वरानं आमच्या-पुढें धाडला आहे?

वेत्रवति–ह्याचा तोंडावळा नि स्वर अगदीं हुबेहूब माझ्या अजितसिंहासारखीं आहेत. राजा, तुझ्या थोरल्या भावाच्या शरीराची साक्ष ह्या मनुष्याच्या भव्य देहावर तुला कांहीं पटत नाहीं का?

कपिध्वज–ह्याच्या देहाकडे आम्हीं इतका वेळ अगदीं बारकाईनं पाह्यलं. त्यावरून हा मनुष्य आमच्या वडील बंधूंचाच मुलगा असावा असं आम्हांला वाटतं. कायरे, तुझ्या भावाच्या जमीनजुमल्यावर तुला हक्क सांगण्यासारखा पुरावा काय आहे तो बोल?

शंखचूड–माझ्या बापाचं ह्याच्या चेहऱ्यांत अर्धं साम्य असतां हा सगळी मालमत्ता घ्यायला पाहतो. हाच माझा पुरावा.

अर्कपाल–राजाधिराज, माझा बाप जिवंत होता त्यावेळीं आपले वडील बंधु ह्याच तक्तावर होते. त्यांचं माझ्या बापावर अत्यंत प्रेम असे. त्यामुळें ते त्यांना मोठाल्या विश्वासाच्या राज्य-प्रकरणीं कामगिऱ्या सांगत असत. एके प्रसंगीं त्यांना अती दूर इष्टगंध देशाच्या बादशहाकडे वकीलाच्या नात्यानं जावं लागलं होतं. त्याच प्रसंगीं आपल्या बंधूनीं माझ्या वडिलांच्या गैरहजेरीचा फायदा घेतला. माझ्या बापाशीं दगा केला. ह्यापेक्षां ज्यास्त फोडून काय सांगू? शरम वाटते. पण सत्य तें सत्यच. ज्यावेळीं माझे वडील आणि आई ह्यांच्यामध्यें–भयंकर लांबीचा समुद्र, खडक, डोंगर, अनेक किनारे वगैरे होते–अशा वेळीं हे पुत्र जन्माला घातले गेले. ज्यावेळीं माझ्या वडिलानीं मृत्युपथाचा स्वीकार केला त्यावेळीं त्यानीं आपली सर्व मालमत्ता मला दिली आणि हा माझ्या आईचा मुलगा–माझा कोणी नाहीं–असं ते

म्हणाले. तेव्हां महाराज, माझं जें काय आहे तें मला मिळालंच पाहिजे. आपण तें मला द्यावं.

कपिध्वज—तुझा भाऊ हाच तुझ्या बापाच्या जमीनजुमल्याचा खरा वारस आहे. कारण, तुझ्या बापाशीं तुझ्या आईचं लग्न झाल्यावर हा तिला झालेला आहे. तुझ्या म्हणण्याप्रमाणं जरी ह्याची उत्पत्ति असली, तरी तो तुझ्या आईचा अपराध आहे. त्याचं प्रायश्चित्त ह्याला काय म्हणून? स्त्रियांच्या हातून अधर्माचं कृत्य घडण्याला धाडशी पुरूषच कारण असतात. आमच्या वडील बंधूंच्याकडून तुझ्या बापाला औरस संतती झाली आणि म्हणूनच तुझ्या बापाच्या सर्व संपत्तीवर त्या संततीचा पूर्ण हक्क आहे.

अर्कपाल—तर मग जो मुलगा माझ्या बापाचा नाहीं अशी त्यांची समजूत होऊन, त्यांनीं जें मृत्युपत्र लिहिलं तें निरुपयोगीच ठरलं म्हणायचं?

शंखचूड—ह्या पुराव्यानं माझा हक्क मुळींच उडला जात नाहीं. सर्व संपत्ती मला द्यावी असाच त्यांचा इरादा होता हें मला पक्कं स्मरतं.

वेत्रवती—जयसेन सरदाराचा मुलगा असं स्वतःला म्हणवून घेऊन, त्यांच्या सर्वस्वाची मालकी मिळण्यापेक्षां—अजीतसिंह राजाचा मुलगा म्हणून प्रसिद्धपणें जगांत वागणं तुला आवडत नाहीं काय?

शंखचूड—मासाहेब, माझा भाऊ जर माझ्या स्वरूपाचा असता आणि मी जर त्याच्यासारखा असतों—म्हणजे माझे पाय सडसडीत चाबकाच्या काठ्यांसारखे असते—हे हात वाळक्या बोंबलाला लाजवते—ही माझी मुखश्री जर रोडकी—भद्राक्ष असती, तर मात्र ही सुमनमंजरी कानावर ठेवायला मी भ्यालों

असतों. मग मात्र "तें पहा सैतान चाललं आहे" असं मला लोकांनीं म्हटलं असतं. अशा प्रकारची जर माझी स्थिति असती–जयसेनजींच्या त्या जमीनींचा जर मी वारस असतों, तर मात्र मरेपर्यंत मी त्या जमीनी सोडल्या नसत्या. इतकं असण्यापेक्षां ह्या जागेंत जन्मपर्यंत खिळून रहाणंच मला आवडलं असतं. माझं आहे हें स्वरूप मला लखलाभ होवो? हेंच मिळण्याकरतां मी वाटेल तें केलं असतं; पण–जयसेनजींचा मुलगा ह्या नांवानं–जगांत मिरवण्याची माझी इच्छा नाहीं.

वेत्रवती–मला तूं फारच आवडतोस. मी जातीनं शूर असून फेनपदेशाला जाण्याची माझी तयारी झाली आहे. ह्यावेळीं तूं आपल्या बापाच्या जमीनींवरचा हक्क आपल्या भावाला देऊन, आमच्या राजघराण्यांतला ह्या नात्यानं लढाईवर येण्याला तयार आहेस का?

शंखचूड–आजपासून मी आपल्याला इंद्रकीलच्या राजघराण्यांतला असंच म्हणवणार. अर्कपाला, माझ्या सर्व जमीनी तुला घे. मी आपल्या वांट्याला मी आपलं प्रारब्ध मात्र घेतों. आज तुझ्या वडलांच्या चेहेऱ्याच्या साम्यतेवर तुला (जयसेनजींचें) उत्पन्न मिळालं आहे; परंतु ती तुझी खप्पड मुखश्री फुटक्या कवडीला जरी कुणाला मिळाली, तरी देखील तो फसला असंच मी समजेन. मासाहेब, आपल्याबरोबर हवा तिकडे येण्याला मी तयार आहें.

वेत्रवती–माझ्या आधीं तुला त्या रणमैदानाकडे गेलं पाहिजे.

शंखचूड–जशी आज्ञा.

कपिध्वज–आजपासून, तूं आपलं शंखचूड नांव सोडून दे. ज्या आकृतीशीं तुझ्या जन्म–प्रकृतीचं साम्य आहे तें नांव घे. जयसेनजींचा मुलगा शंखचूड या नांवानं गुढगे टेंकून विनम्र हो

आणि अजीतसिंह महाराजांचा मुलगा–लेंकावळा–शबलाक्ष ह्या नांवानं थोर होऊन ऊठ.

शंखचूड–(गुढगे टेंकून) मी तुझा थोरला भाऊ असतांना देखील फक्त सहोदर ह्या नात्यानं आईकरतां तुझ्यापुढें गुढगे टेंकून लहान होत आहें. तुझ्या बापानं जशी तुला संपत्ती दिली तशी माझ्या बापानं मला सरदाराची उच्च पदवी दिली. (उठतो) रात्र असो अगर दिवस असो–ह्या जगांत मी मनुष्य-कोटींत उत्पन्न होणार असं परमेश्वरानं ज्यावेळीं ठरवलं आणि जयसेनजींना परदेशीं धाडायचं ठरवलं–ती घटका–तें निमिष–सदासर्वदा पुण्यकारक असो.

वेत्रवती–ह्याला म्हणतात राजबीज. शबलाक्षा, मी तुझी आतां आजीबाई झालें. मला तशीच हाक मार.

शंखचूड–सत्यतेपेक्षां नशीबानंच मी आपल्याला आतां आ-जीबाई अशी हाक मारण्याचं ठरवलं आहे.

कपिध्वज–अर्कपाला, जा–तुझ्या इच्छेप्रमाणं तुझं काम झालं. ह्या सरदार झालेल्या तुझ्या भावानं तुला जमीनदार केलं हें लक्षांत ठेव. आईसाहेब, चलायचं आतां. शबलाक्षा, तूंही चल. फेनपचं रणमैदान त्वरित गांठलं पाहिजे.

शंखचूड–अर्कपाला, हेच माझे तुला शेवटचे आशीर्वाद. तुझं जनन सत्यमार्गाचं झालं असल्याकारणानं तुझं आयुष्य सुखांत जावो. (शंखचूडाशिवाय सर्व जातात.) रंकाचा राव एक-दम होणं हें खरोखर किती आनंदकारक असतं ! हजारों बिघ्यांच्या धनीपणापेक्षां एकाच थोर पदवीचा मानकरी होणं फार चांगलं. आतां एखाद्या दरिद्र्याच्या पोरीशीं जरी माझं लग्न झालं, तरी ती देखील माझ्याप्रमाणेंच थोर होणार. अर्कपाला, ईश्वर तुला सुखी ठेवो. ह्या माझ्या सध्यांच्या थोरपणानं काय

चमत्कार होणार आहे पहा! एखाद्या माझ्या स्नेह्याचं नांव जर किसनसिंग असेल, तर विस्मृतीनं मी त्याला चट्कन् किशोरसिंग म्हणूनच हांक मारीन. हलक्या दरजाचे लोक एकदम मोठे मानकरी झाले म्हणजे त्यांची अशीच स्थिति होते—असा अनुभव आहे. एका धर्मांतून दुसऱ्या धर्मांत गेलं म्हणजे जसं दुसरं नांव घ्यावं लागतं, तशीच माझी रंकांतून सुटका झाल्यामुळें स्थिति झाली आहे. ह्या पोषाखासह त्या जुन्या भिकारड्या शंखचूड नांवाला आतां अखेरचा रामराम ठोकून, नवं मिळालेलं—सरदार शबलाक्ष हें नांव, नव्या पोषाखासह सजवायचं तेव्हांच प्रसिद्धपणें जगाच्या दृष्टीस पडायचं. ह्यापुढें जर माझा एखादा जुना मित्र मला माझ्या नव्या पोषाखाच्या सरदारी भपक्यांत पाहील, तर तो मला खात्रीनंच पट्कन् मुजरा करील—मग काय? श्रीमंत—हुजूर, महाराज, मालक, धनी—ह्या विशेषणांची माळ ह्या गळ्यांत आडकून—जो तो आपलं काम साधून घेण्याकरतां माझी हांजी हांजी करील. "सेवक सेवेंत हजर आहे. दासाला आज्ञा व्हावी" अशा भाषेशिवाय मला उद्धट भाषा माझ्या देखत ऐकूंच यायची नाहीं. मी जरा जोरानं बोलल्यावर "माफी असावी, सरकार" असेच उद्गार कानीं येतील. पण परमेश्वरा, काय ही ह्या लोकांची स्थिति! माझंच उदाहरण घेऊन न्याय केला, तर मी कलमी आंबाच ठरणार नाहीं काय? आतां थोर झालों—तेव्हां पूर्वींचे दिवस आतां कोण स्मरतो—असं म्हटलं तर तें न्यायाचं होईल काय? माझ्या एकंदर सरदारी ऐटीवरून मला कलमी आंबा जरी कोणी स्पष्टपणें म्हटलं नाहीं, तरी मागें म्हणायला सोडतील कीं काय? ह्या काळांत दुनिया खऱ्याची नसल्यामुळें दुनियेला फसवण्याकरतां जरी नाहीं, तरी दुनियेकडून न फसला जाण्याकरतां तरी मला दुनियेशीं मोठ्या सावधगिरीनं

आणि ऐटीनं ह्यापुढें वागलंच पाहिजे. मी जर सोदेगिरीनं जगाशीं वागलों नाहीं, तर माझा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जाणं अशक्य होईल. (पाहून) हें घोड्यावर बसून कोण बरं इकडे येत आहे? ही स्त्री कोण बरं असावी? अरेवा:! ह्या असल्या प्रसिद्ध स्त्रीच्या आगमनाची वार्ता पोंचवण्याला तिचा नवरा कां बरं शिंगवाला झाला नाहीं? (त्रिशिला आणि एक नोकर येतात.) ओहोहोहो! अरे ह्या तर–ह्या माझ्या देहांत कलमी आंब्याची गोडी उत्पन्न करणाऱ्या–आमच्या मातोश्री! कसं काय मासाहेब? इतक्या घाईनं येण्याचं कारण?

त्रिशिला–तो कार्टा–तुझा भाऊ कुठें आहे? बोल कुठें आहे तो? माझ्या पातिव्रत्याची विटंबना करणारा तो दुष्ट पोरटा कुठें आहे बोल?

शंखचूड–(तिरस्कारानें) काय, वृद्ध जयसेनजींचा मुलगा? माझा भाऊ अर्कपाल? ज्यानं मला कलमी आंबा ठरवून जयसेनजींची सर्व संपत्ती उपटली तो होय? त्याला का आपण शोधतांहांत?

त्रिशिला–हो हो–त्यालाच! त्याच जयसेनजींच्या कारट्याला! जयसेनजींच्याबद्दल इतका तिरस्कारसा दाखवतो आहेस–मूर्खा! तुम्ही दोघे त्यांचेच मुलगे आहांत हें तुला माहीत नाहीं का?

शंखचूड–(नोकराला) तूं इथून जरा बाजूला जा. पुन्हां बोलावीन तेव्हां ये.

नोकर–जशी आज्ञा! (जातो.)

शंखचूड–आई, मी सरदार जयसेनजींचा मुलगा नाहीं हें मला ठाऊक आहे. ते जर सध्यां जिवंत असते, तर त्यांनींही असंच सांगितलं असतं. माझ्यामध्यें त्यांचं कोणचं साम्य आहे? खरंच असं होईल असं त्यांच्या स्वप्नींही नव्हतं.

त्रिशिला–काय, तूं अन् तुझ्या भावानं–संगन्मत करून

स्वार्थाकरतां माझी अशी विटंबना करण्याचा बेत केला आहे काय ? या चावटपणाचा अर्थ रे काय ?

शंखचूड–सरदार, ह्याचा अर्थ सरदार आईसाहेब ! ही पदवी– हा मान–स्वतः ह्या पठ्यानं मिळवला आहे. आईसाहेब, आपण म्हणतां त्यांचा मुलगा मी खास नव्हे! जयसेनजींचा आणि त्यांच्या सर्वस्वाचा वारसा मी सोडला. औरसपणा–वारसा–नांव– सर्व कांहीं मी टाकलं. सांगा तरमग आतां माझे जन्मदाते कोण होते ते ? ते कोणी तरी फार मोठे गृहस्थ होते अशी माझी समजूत आहे.

त्रिशिला–काय, तूं जयसेनजींचा मुलगा नाहींस असं कबूल केलंस ?

शंखचूड–अगदीं प्रांजलपणें.

त्रिशिला–ठीक आहे ! ऐक तर. तुझा बाप राजा अजितसिंह होता. देवा, माझ्याकडून घडलेल्या अपराधाची मला क्षमा कर. माझ्याकडून जो नीचपणाचा अपराध घडला–त्यापासून तुझी उत्पत्ती झाली आहे.

शंखचूड–ह्या सूर्यनारायणाचीच शपथ घेऊन सांगतों कीं, पुन्हां जर ह्याच कोटींत माझी उत्पत्ती व्हायची असेल, तर त्या योग्य बापाहून अन्य कोणी असावा असं मी कधीं म्हणणार नाहीं. ज्याप्रमाणें मांडलीक राजे–इच्छा नसतांही–सार्वभौमाला खंडणी देतात, त्याचप्रमाणें राजाचं प्रेम संपादन करायला–तुमच्यासारख्या स्त्रियांनीं मोठ्या खुषीनं त्याच्या प्रेमाच्या खळखळाटाला नम्र झालंच पाहिजे. ज्या अजितसिंहाच्या राक्षसी त्वेषाला आणि अद्वितीय शक्तीपुढें मोठाले रानटी क्रूर सिंह सुद्धां कचरत असत, किंवा जो सिंहाचे कान बेधडक पकडून त्याचं काळीज बिनधोक ओरबडून काढीत असे, त्याला, आपल्यासारख्या

एखाद्या क्षुल्लक स्त्रीचं हृदय–स्वतःच्या कबजात आणायला वेळ तो किती? आईग, हा देह त्या बापाच्या बीजाचा आहे हें तूं मला कळवल्याबद्दल मी तुझे अनंत आभार मानतों. माझ्या जननाच्या कामीं तुझ्या हातूंन जें कृत्य घडलं–ती दुष्कृति होती असं म्हणायचं जर कोणी धाडस करील, तर त्याच्या आत्म्याला तत्क्षणीं नरकाचीच वाट दाखवीन. तुझ्याबद्दल अजितसिंह राजाच्या मनांत आसक्ति उत्पन्न झाली त्यावेळीं तूं जर नकार दर्शवला असतास, तर तुझ्या हातूंन खचित मोठं पातक घडलं असतं. आणि हें जर कोणी माझं म्हणणं खोटं आहे असं म्हणेल, तर मी त्याला बेधडक असत्यवादीच मानीन. (पडदा पडतो.)

अंक पहिला समाप्त.

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

[फेनपदेशांतील रणमैदान. सरदार **मुचकुंद** सिंहाच्या कातड्याचा पोषाख घातलेला व त्याचें सैन्य एका बाजूला असून, दुसऱ्या बाजूला राजा **हंसकेतु**, त्याचें सैन्य, युवराज **हंसचूड**, **वीरबाहू**, त्याची आई **चित्रसेना**-वगैरे मंडळी उभीं आहेत असा प्रवेश उघडतो.]

हंसकेतु—सरदार मुचकुंदजी, ह्याठिकाणीं तुम्हीं आम्हांला भेटलांत, फार चांगलं झालं. जो इंद्रकीलचा राजा धर्मक्षेत्राच्या युद्धांत अग्रगण्य होता आणि ज्यानं सिंहासारख्या क्रूर प्राण्यांशीं कुस्त्या केल्या—त्याच शूर अजितसिंह राजाचा हा वीरबाहू औरस मुलगा आहे. आपले हक्क न्यायानं मिळवण्याकरतां हा इथें आला आहे. वीरबाहू, तूं आपलं गुंडाळून ठेवलेलं तुझ्या वैभवाचं निशाण आज खुलं कर. तुझं सिंहासन बळकावणाऱ्या तुझ्या कपिध्वज चुलत्याला योग्य शिक्षा लावण्याकरतां जरी तूं आज इथें आला आहेस, तरी तो इथे आल्याबरोबर त्याची आदबी राखून त्याला प्रेमालिंगन दे.

वीरबाहू—अजितसिंह महाराजांच्या ह्या बच्चाला आजपर्यंत संभाळलंत. ह्याच्या सर्व हक्कांनां आपण आपल्या कृपाछत्राखालीं ठेवलंत. इतकंच नव्हे तर, आज ह्याचे खरे हक्क शाबीत करण्याकरतां सैन्यासह इथें आलांत—ह्याबद्दल माझे आभार जरी अगदीं गरीब स्थितींतले आहेत, तरी ते मोठ्या उत्साहाचे आहेत. आपल्याबद्दलच्या निष्कलंक प्रेमानं माझं हृदय पूर्ण ओथंबलेलं आहे. महाराज, आपल्या कृपाछत्राखालीं मला घालून ह्या अंबरपूरच्या वेशीपाशीं आणलंत ह्याबद्दल मी आपले अती लीनतेनं आभार मानतों. (एक गुडघा टेंकून नम्र होतो.)

हंसकेतु–शाबास! तुझे सर्व हक्क तुला कां न मिळावेत ?

मुचकुंद–हे बालराजा, माझ्या प्रेमाचा शिक्का–तुझ्या त्या तांबूस-धवल्या गालावर उठवूंदेरे! इंद्रकीलच्या त्या निस्तेज–फट-फटीत तोंडाच्या पांढऱ्या किनाऱ्यांचंच नव्हे तर, साऱ्या इंद्रकी-लचं संरक्षण करायला तिथें मोठाले पराक्रमी वीर असून, त्यांनीं आपल्या भोंवतालचा पाण्याचा कठडा मोठ्या धूर्ततेनं रक्षण केला आहे. तिथले लोक राजकारणांत जरी मोठे कुशल आहेत, तरी मी एवढं खास सांगतों कीं, इंद्रकीलच्या गादीचा आणि ह्या देशांतल्या प्रांतांवरचा तुझा हक्क तुला मिळून–तूं आपल्या सर्वस्वाचा स्वामी होईपर्यंत–स्वदेशीं न जातां तुझ्या शत्रूशीं लढत राहीन. हे इंद्रकीलच्या भावी बालराजा, मी तुला वंदन करतों.

(दोन्ही गुढगे टेंकून नम्र होतो.)

चित्रसेना–मुचकुंदजी, ह्या प्रेमाबद्दल त्या बालराजाच्या विधवा आईचे आशीर्वाद घ्या. तुम्हीं आपलं युद्धकौशल्य जितक्या खुबीनं दाखवाल तितकं तुमचं ह्याच्याबद्दलचं प्रेम व्यक्त होणार आहे.

मुचकुंद–ह्या न्यायाच्या आणि धर्माच्या युद्धांत–स्वार्थत्याग करून, उपकार करण्याच्या हेतूनं जे कोणी आपल्या तरवारी म्यानाच्या बाहेर काढणार नाहींत, त्यांना खचित यमसदनाला जाण्याची पाळी येईल.

हंसकेतु–आतां आपल्या कामाला लागलं पाहिजे. आपल्या रस्त्यांत अडथळा आणणाऱ्या ह्या अंब्रपूर शहराच्या मस्तकावर आपल्याला आपल्या तोफेची शिस्त बांधली पाहिजे. बोलवा– आमच्या सेनाध्यक्षांना बोलवा. त्यांच्याकडून रणमैदानाची व्यवस्था करवली पाहिजे. आमची ही–राजेपणाची हाडं ह्या शहरापुढें पडून, त्यांची बाजारांत विक्री होईपर्यंत आम्हीं ह्या बालराजाचे हक्क शाबीत करण्याकरतां लढणार.

चित्रसेना–थांबा–तिकडे धाडलेला वकील काय निरोप आणतो तो ऐकल्याशिवाय आपल्या तरवारींनां रक्त माखायला तयार होऊं नका. ह्या बालराजाचे हक्क स्थापित करायला जे आतां तुम्ही लढाईला तयार झालां आहांत ते कदाचित शांततेंतही मिळतील. शांतता सोडून घाईनं रक्तपात केला, तर त्याच्या प्रत्येक थेंबागणिक आपल्याला पश्चात्ताप होईल. आपण हें अघोर कर्म व्यर्थ केलं असं आपल्याला वाटेल.

हंसकेतु–हे पहा आलेच! आठवण करण्याचा अवकाश. वकीलसाहेब तयार. काय, इंद्रकीलचे राजे काय म्हणतात?

वकील–सोडा–शांततेचा धडा सोडा. मोठ्या शक्तीमान शत्रूशीं भयंकर रणकंदन करण्याला उद्युक्त करणारा धडा आपल्या फौजेला द्या. इंद्रकीलच्या राजाकडे आपण केलेल्या मागण्यांचा सूड घेण्याकरतां, कपिध्वजराजे मोठ्या उतावळीनं–दांडग्या सैन्यासह येताहेत. ह्याच शहरावर समोरून चाल करून जाण्याला त्यांच्या सेनापतीची सैन्याला आज्ञा झाली आहे. त्यांचं सैन्य चांगलं कसदार, विश्वासु आणि चतुर आहे. राजमाता वेत्रवतीही येत आहेत. त्यांची नात, सम्राट देशाची राजकन्या, स्वयंप्रभाही आपल्या सैन्यासह लढाईला आली आहे. इंद्रकीलच्या अजितसिंह राजाचा एक लेकावळाही बरोबर आहे. शिवाय, इतर बायका–पुरूष, मोठ्या अहंपणानं–स्वार्थावर लाथ मारून–लढायला आलीं आहेत. तीं आपल्या धिप्पाड–डोंगरी–दांडग्या–क्रूर लोकांसह रणदुंदुभींचे आवाज करीत आहेत. त्यांना अस्सल बीजाचा गर्व झाला असून, ताठा आणि अभिमान यांचं त्यांनीं साह्य घेतलं आहे. स्वतःचं न सोडतां नवी संपत्ती मिळवण्याच्या महत्वाकांक्षेनं त्यांना मगरमिठी घातली असल्यामुळें, ते सर्व मोठ्या जोरानं ह्याच शहराकडे ढाला फिरवून दौड करीत येत आहेत. एकं-

दरींत काय कीं, सध्यां सर्व इंद्रकीलभर वीररसाला ऊत आला आहे. त्याचा लोट ह्याच शहराकडे धांवत येत आहे. त्यावर अनीतीचं तेज फांकत आहे. ऐका, त्यांच्या रणदुंदुभी मोठ्यानं खिदळत आहेत. संपलं. ज्यास्त सांगणं नको. ठरल्याप्रमाणें अगदीं वेळेवर शत्रु लढण्याकरतां नजीक येऊन ठेपला आहे. आपलीही तयारी झालीच पाहिजे.

मुचकुंद—आमचं संरक्षण करण्याला आम्हीही पूर्ण तयार आहोंत असं आपण त्यांना दाखवलं पाहिजे. प्रसंगीं धीर धरला म्हणजे धैर्य आपल्याआपण एकेक पाऊल वाढतं.

[**कपिध्वज** राजा, **वेत्रवती, स्वयंप्रभा, शबलाक्ष** आणि सैनिक डाव्या बाजूनें येतात]

कपिध्वज—वंश आणि न्याय ह्या दोन गोष्टी लक्षांत ठेवून, आमच्या शहरांत, जर आम्हांला बिन्तक्रार जाऊं दिलं, तर फेनपेशाला सदा शांतता मिळो असं आम्हीं म्हणूं. तसं जर न घडलं तर फेनपेशाला रक्तबंबाळ व्हावं लागून, त्याच्या शांततेला स्वर्गाचा रस्ता धरावा लागेल. सध्यां आम्हीं परमेश्वराचे क्रोधदूत बनलों असून, शांततेला हद्दपार करणाऱ्या उताणखाट गर्वाला शिक्षा लावण्याकरतां इथें आलों आहोंत.

हंसकेतु—शांततेंत राहण्याकरतां इंद्रकीलानं सुरू केलेल्या युद्धाला तोंड देऊन, शांततेंत राहण्याचा फेनपेशानं जर प्रयत्न केला नाहीं, तर इंद्रकीलालाही शांती मिळो. आमचं इंद्रकीलावर फार प्रेम आहे. त्याकरतांच आम्हीं शस्त्रास्त्रं घेऊन इथें आलों आहोंत. आपल्या मनांत जर इंद्रकीलाबद्दलची प्रीति असेल, तर त्या भूमीला तिच्या खऱ्या मालकाच्या स्वाधीन करा. आपल्या सध्यांच्या वर्तनावरून इंद्रकीलबद्दलचा आपला द्वेष व्यक्त होत आहे. खऱ्या मालकाच्या खऱ्या हक्कांची पायमल्ली

करणं चांगलं नव्हे. बापाच्या मागं मुलाला गादी मिळायची हा स्वाभाविक हक्क आपण बुडवला. वारसदार–अर्भक असल्यामुळें, त्याला आपल्या राक्षसी कृतींनीं भेवडावून, त्याचं सर्वस्व आपण गट्ट केलंत. एका निराश्रित–सुशील अबलेला आणि तिच्या अर्भकाला त्रास देऊन–ज्याचा मुगुट आपण चोरला आहे–त्या ह्या आपल्या छोट्या पुतण्याकडे आतां तरी ममतेनं पहा. हा मुलगा बदकारीचा नसून, ह्याचा कोणचा अवयव ह्याच्या बापाप्रमाणें नाहीं बरं! आपल्या वडील बंधूंची–ही सही सही छोटी प्रतिमा आहे. हें बालक मोठेपणीं आपल्या वडील बंधूंची आपल्याला आठवण सुद्धां होऊं देणार नाहीं. अजितसिंह हे आपले वडील बंधू होते आणि हा त्यांचा थोरला मुलगा आहे. ते इंद्रकीलचे राजे होते; म्हणून त्यांच्या मागें न्यायानं हाच राजा झाला पाहिजे. ह्या बालकाच्या देहांत राजरक्त स्वच्छंदानं खेळत असून, हें ह्याचं मस्तक अभिषिक्त होण्याकरतांच उत्पन्न झालं आहे. ह्या सर्व गोष्टी दांडगेपणानं बाजूला सारून त्याचं सर्वस्व बलात्कारानं आपण आपल्याकडे ओढून घेतां ह्याला काय म्हणावं?

कपिध्वज–राजा हंसकेतु, आपण जे जोरानं आम्हांला आपल्या प्रश्नांचीं उत्तरं देण्याला सांगतांहां, त्याबद्दल आपल्याला तसं करण्याला कोणच्या शक्तीची प्रेरणा होऊन, आपण तो अधिकार आपल्याकडे घेतला आहे?

हंसकेतु–आमच्या मनांत नेहमीं सत्यतेचे विचार उत्पन्न करणाऱ्या न्यायदेवतेनंच तो अधिकार आम्हाला दिला आहे. तिनंच आम्हाला ह्या बालराजाचे संरक्षक नेमलं आहे. त्याच शक्तीच्या जोरावर आम्हीं तुमचं कृष्णकारस्थान उघड करीत आहों. तिच्याच पाठबळानं आमचं म्हणणं खरं आहे असं सिद्ध करण्याला आम्हीं तयार झालों आहों.

कपिध्वज–ह्या योगानं आपण लुटारू–बंडखोर ठरताहांत.

हंसकेतु–बंडखोरीला अशा तऱ्हेनं आम्हीं रसातळाला पोंचवीत आहोंत.

वेत्रवती–राजा, तूं कोणाला लुटारू म्हणतोस?

चित्रसेना–ह्याचं उत्तर मी देतें सासुबाई! आपले धाकटे चिरंजीव लुटारू आहेत.

वेत्रवती–अहाग कैदासणी! बदकारीनं झालेल्या त्या तुझ्या कारट्यानं राजा होऊन, तूं राजमाता व्हावंस आणि अशा ह्या कमअस्सल जोडीच्या हातांत राज्य देऊन, वाडवडलांचं नांव घालवावं काय?

चित्रसेना–सासूबाई, ज्या प्रमाणें आपण आणि आपले पुत्र कपिध्वज–यांमध्यें पाणी आणि पाउस किंवा मूत आणि पिशाच्च यांच्यासारखं साम्य आहे–त्याचप्रमाणें माझे पति आणि हा त्यांचा मुलगा ह्यांच्यामध्यें आहे. असं असतां, मी जारकर्म करून ह्याला प्रसवलें, असं जें आपण म्हणतां तें आपल्याला शोभतं का? देवाशपथ, तुमचे चिरंजीव तुम्हाला अशा तऱ्हेनं खास झाले नाहींत. कारण तुम्हीं जर त्यांच्या मातोश्री असाल, तर तसं होणं अशक्य आहे.

वेत्रवती–वीरबाहू, ही पहा तुझी आई तुझ्या बापाच्या कीर्तीला काळोखी लावते आहेरे!

चित्रसेना–अन् ह्या पहा तुझ्या आजीबाई प्रत्यक्ष तुलाच काळीमा लावताहेतरे!

मुचकुंद–कृपाकरून जरा थांबता का?

शबलाक्ष–अहो, मेहेरबान, जरा गलबला बंद करा.

मुचकुंद–हे कोण शहाणे तिरशिंगराव?

शबलाक्ष–आपल्या सारख्याशीं झुंजणारे–समजलं? आपण

कोणचं पांघरूण घेतलं आहे तें मी ओळखतों. सिंह मेल्यावर उंदीर त्याची चेष्टा करायचेच. आणि आपलंही तसंच आहे. पण एवढं खास लक्षांत ठेवा कीं, तें आपण पांघरलेलं कातडं हा बहादर आतां सर्रकन आपल्या अंगावरून ओढणार.

स्वयंप्रभा–अगदीं खरं. स्वतः सिंहाला मारून त्याचं कातडं पांघरलं असतां जितकं भूषणावह होतं, तितकंच सिंह मारणाऱ्याचा खून करून तें पांघरणाऱ्याला दूषणावह होतं.

शबलाक्ष–यांत काय संशय? सिंहाचं कातडं पांघरून एखादं गाढव रस्त्यांतून हिंडूं लागलं तरी त्याचं खरं स्वरूप थोडंच झांकलं जाणार आहे! लांब कान आणि भेसूर ध्वनि हीं मूळस्वरूपाची ओळख पटवायचींच. गाढवाच्या पाठीवर साखरेच्या गोण्या लादल्या तरी त्याला त्यांचा काय उपयोग?

मुचकुंद–वाः काय प्रौढी चालली आहे पण! त्या पोकळ ऐटीच्या भाषणानं आमच्या कानांत दडे बसणार असं दिसतं.

हंसकेतु–पुरे करा तीं शुष्क भांडणं. कपिध्वजराज, आपल्या हृदयांत खऱ्या न्यायाला थारा देऊन आपलं हत्यार खालीं ठेवाल काय?

कपिध्वज–तसं केलं तर काड्कन् माझा प्राण जाईल. हंसकेतुराज, तुमचं म्हणणं आम्हांला नाकबूल आहे. वीरबाहू, माझी शक्ति फार मोठी आहे. हंसकेतूसारख्या भित्र्या राजाच्या मदतीनं जें कांहीं संपादन करण्याचा तुझा विचार आहे त्यापेक्षां पुष्कळपट जास्त मी तुला प्रेमानं बक्षीस देईन. मुकाट्यानं मला शरण ये.

वेत्रवती–बाळा वीरबाहू, इकडे ये.

चित्रसेना–जा-बाळ, आपल्या आजीबाईच्याकडे जा. तुझं राज्य तुला द्यावं अशी त्यांची इच्छा आहे. आणि त्या

तें तुला देतील. खरंच तुझ्या आजीबाई फारच ममतेच्या आहेत. आजी ह्या नात्यानं त्या तुला तुझं राज्य आणि हक्क ह्यांबद्दल–हक्कांच्या शिव्यांची छत्री देणार आहेत.

वीरबाहू–आई, थांब! हा माझा देह ह्या वेळीं स्मशानांत सरणावर असता तर मात्र कदाचित मी ती त्यांची देणगी स्वीकारली असती. तसलं बक्षीस देण्याचे त्यांनीं व्यर्थ श्रम घेऊं नयेत.

वेत्रवती–ह्या बालकाची आई किती दुष्ट आहे पहा. तिच्या ढालगजपणामुळें ह्याला मात्र बट्टा लागतो आहे.

चित्रसेना–माझ्या संबंधानं तर राहूंच द्या, पण ह्यामुळें आपल्याला मात्र बट्टा लागतो आहे. सगळ्या जगाला हालवून सोडणारे ह्या माझ्या बाळाच्या दुर्दैवी डोळ्यांतले हे जे मोत्यांप्रमाणें अश्रु त्याच्या गालांवर धडाधड उड्या मारताहेत–ते आपल्याच दुष्कृत्यांच्या पूराची साक्ष देताहेत; माझ्या नव्हे. हे अश्रु परमेश्वराच्या पदकमलांनां चटके देऊन खरा न्याय मिळवतील. ही अश्रूंची मौक्तिकमाला देवाला लांच देऊन माझं बाळ तुमचा सूड घेईल.

वेत्रवती–अग राक्षसणी, कुलटे, ह्या जगाची आणि परमेश्वराची तूं घोर अपराधी आहेस.

चित्रसेना–आपणच असाल. मी नाहीं. माझ्या ह्या बाळाचं-निराश्रित अर्भकाचं-ह्या जुलूम झालेल्या पोटच्या गोळ्याचं राज्य-आपल्या भामट्या चिरंजीवांनीं गिळंकृत करून आपण दोघंही चोरीच्या दोषाला पात्र झालां आहांत. हा आपल्या थोरल्या चिरंजीवांचा मुलगा–आपल्याच नीचपणानं दुर्दैवांत सांपडला आहे. माझ्या ह्या सोनकुल्याची आणि तुमच्या पापांची भेट झाल्यामुळेंच, तर आपल्या आतां दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या पापी

गर्भापासून उत्पन्न झालेलं हें सरळ पीढींतलं बालक, न्यायदेवतेचं खड्ग हातीं धरून उभं राह्यलं आहे.

कपिध्वज–भ्रमिष्ट-वेडी आहेस तूं. संपलं तुझं बोलणं ?

चित्रसेना–बोलायचं म्हणून इतकंच कीं, ह्या माझ्या सासूबाईंना पाप आणि दुष्कृत्य यांच्या मूर्तीमंत पुतळ्या परमेश्वरानं उत्पन्न केल्या असल्यामुळेंच ह्या माझ्या लाडक्याला त्रास सोसावा लागतो आहे. त्यांची दुष्ट कृत्यं ह्याच्या रूपानं आतां त्यानांच छळायला तयार झालीं आहेत. त्यांचं पाप तें ह्याचं दुःख. त्यांचं दुःख तें त्यांच्या पापाचं वेडेपण. ह्या सर्वांना शिक्षा करणारं त्यांचंच हें बालक.

वेत्रवती–आग लागो त्या तुझ्या शहाणपणाला. मूर्खे, ज्यामुळें तुझ्या कार्ट्याला राज्य मिळालं नाहीं तें मृत्यूपत्र पुराव्याला हजर करीन.

चित्रसेना–तें अगदीं खरं. ह्या सुंदर फुलांतला मध खाऊन, फुलालाही गट्ट करणाऱ्या त्या आपल्या सारख्या घातकी किड्याच्या हृदयाच्या प्राण्याकडून–मतलबानं तयार केलेलं तें मृत्युपत्र–अगदीं खरं.

हंसकेतु–जरा शांत व्हा. भांडण पुरे करा. जरा मर्यादेनंच चालूंद्या. असल्या ह्या भांडणाला आपल्या जोरदार भाषणांनीं उत्तेजन दिल्यासारखं होतं. आपल्यासारख्या राजघराण्यांनां हें भांडण शोभत नाहीं. ऐका, अंबरपूरच्या लोकांना तटावर येण्याकरतां शिंगनाद आव्हान करतो आहे. कपिध्वज राजा खरा किंवा हा बालराजा खरा ह्याचा न्याय त्यांच्याचकडून ऐका. (शिंगनाद ऐकून, नागरिक तटावर उभे असलेले दृष्टीस पडतात.)

प० नागरिक–आम्हांला तटावर बोलावण्याचा काय उद्देश आहे ?

हंसकेतु–आम्हीं फेनपचे राजे इंद्रकीलच्या बाजूनं आलों आहोंत.

कपिध्वज–आम्हीं इंद्रकीलचे राजे इंद्रकीलच्याच तरफेनं आलों आहोंत. आपण सर्व अंबरपूरचे लोक आणि आमची लाडकी प्रजा—

हंसकेतु–हे सर्व अंबरपूरचे प्रेमळ नागरिकांनो, वीरबाहूचे प्रजाजनहो, आमच्याच गंभीर शिंगनादानं तुम्हां सर्वांना ह्या सभेला बोलावलं असून—

कपिध्वज–आपण सर्व आमच्याकरतां आमचं म्हणणं प्रथम ऐका. हीं जीं फेनपचीं निशाणं सध्यां तुमच्यापुढें आणि तुमच्या कर्तव्यतेपुढें नाचताहेत–तीं खचित तुमचा नाश करायलाच इथें आलीं आहेत. मेघांच्या गडगडाटांशीं स्पर्धा करणाऱ्या त्यांच्या उल्हाटयंत्रांचीं पोटं–क्रोधवन्हीनं खवळून गेलीं आहेत. प्रज्वलित लोहरसाच्या पिचकाऱ्या तुमच्या तटावर मारण्याकरतां त्यांचीं तोंडं घाईला आलीं आहेत. भयंकर रक्तपात करण्याची त्यांची तयारी आहे. हे एकत्र झालेले फेनपचे निर्दय राक्षस–आपल्या अचाट कृत्यांनीं तुमच्या शहराचा दरवाजा फोडून तुम्हांला अंधळे करण्याला ते तयार झाले आहेत. तुमच्या ह्या शहराला वेढा देणारा हा तट–ही तुमच्या शहराची भक्कम कंबर आहे. तिच्यांतले ते चुन्याच्या शय्येंत आरामांत घोरत पडलेले दगड–शत्रूच्या तोफखान्याच्या माऱ्यांत अस्ताव्यस्त होणार आहेत. हे फेनपचे लोक रक्तपात करून तुमची शांतता नष्ट करणार आहेत. असलं तुमच्यावर अरिष्ट कोसळून तुमचे गाल फट-फटीत होऊं नयेत म्हणून हा तुमचा न्यायी राजा मोठ्या त्वरेनं तुमची शांतता कायम राखण्याकरतां ह्या तुमच्या वेशीपुढें सैन्या-सह येऊन उभा राह्यला आहे. ध्यानांत ठेवा. फेनपेशावर

विश्वास ठेवण्यांत तुमचा दगा आहे. विस्तवानं आलिंगन दिलेल्या शिशांच्या गोळ्यांनीं ह्या तुमच्या तटांत हिंवाची कुडकुडी भरवण्याच्या ऐवजीं—ज्याचा अर्थ चमत्कारिक आहे अशा भाषणांनीं ते तुमच्या कानांना जबरदस्त परंतु अविश्वसनीय असा मोह पाडतील. त्यामुळें तुमच्याकडून चुकी होणार आहे. ह्या माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा. दरवाजा उघडा. आम्हाला आंत घेऊन जा.

हंसकेतु—नागरिकहो, आम्हां दोघांनांही उत्तरं द्या. हा आमच्या उजव्या हाताकडे जो राजबिंडा उभा आहे—त्याला परमेश्वरानं हक्कांचं पाठबळ देऊन, तें सिद्ध करण्याकरतां तुमच्यापुढें त्याला धाडला आहे. ह्या कपिध्वजराजांच्या वडील भावाचा हा राजबिंडा औरस मुलगा आहे. कपिध्वज राजे ज्या सिंहासनाचा उपभोग घेत आहेत, त्याचा हा बालराजा ईश्वरदत्त मालक आहे. जुलमानं ग्रस्त झालेल्या ह्या राजमूर्तीला मदत करण्याकरतां आमच्या मनानं आणि शपथेनं आम्हीं बद्ध झालों आहोंत. आपण आमचे मित्र आहांत. आपणां सर्वांच्यापुढें आम्हीं मित्रत्वाच्या नात्यानं आलों आहोंत. ही आपल्या तटापुढची रमणीय हिरवीगार कुरणं तुडवून, आम्हीं तुमच्याकडे योग्य दाद मागायला आलों आहोंत. आतां जें तुमचं योग्य कर्तव्यकर्म तुम्हांला ह्या राजबिंड्यासंबंधानं बजावावंसं वाटत असेल तें आनंदानं बजावा—म्हणजे आमच्या भाल्यांची प्रखर तोंडं निस्तेज होतील. तीं अस्वलांच्या तोंडांप्रमाणं मुस्क्यांनीं बंद होतील. आम्हीं म्हणतों त्याप्रमाणें योग्य न्याय जर न होईल, तर आमचा तोफखाना रसरशीत शिशाच्या रसाच्या पिचकाऱ्या तुमच्या तटावर मारून, आकाशामध्यें आपल्या श्वासोच्छ्वासाचं मेघमंडळ विनाकारण उत्पन्न करील. आपण आमचे आणि हें

बालक आपलं असं म्हणा म्हणजे आम्हीं मोठ्या खुषीनं आपल्या तरवारींना विश्रांती देऊं. जें प्रखर रक्त आम्हीं इथें खर्च करायला आलों आहों त्याचा पूर न वाहूं देतां, चकचकीत शिरस्त्राणांसह मोठ्या खुषीनं परत घरीं जाऊं. आमच्या मागणीची जर तुम्हीं हेटाळणी कराल, तर लक्षांत ठेवा—इंद्रकीलच्या सुशिक्षित सेनाव्यूहांत जरी राह्यलांत तरी त्यापासून आणि ह्या तुमच्या शहराच्या पूज्य—परंतु हातघाईवर आलेल्या तटापासून तुमचं संरक्षण होणं कठीण आहे. आमच्या दारूच्या प्रखर बैदुलांच्या धडकांनीं तुम्हां सर्वांचा चुराडा होणार आहे. बोला तरमग ? ज्याच्या तर्फेनं आम्हीं आलों आहोंत त्याला ह्या शहराचा मालक म्हणतां कीं नाहीं ? नसेल इच्छा तर आम्हीं ह्याच क्षणीं आपलं क्रोधधनु आकर्ण ओढून रक्तस्रावानं सर्व दिशा लालभडक करून सोडतों.

प० नागरिक—आम्हीं इंद्रकीलच्या राजाची प्रजा असून, त्याच्याकरतां त्याच्याच हक्कानं आम्हीं हें शहर आपल्या ताब्यांत ठेवलं आहे.

कपिध्वज—असं जर आहे तर हा इंद्रकीलचा राजा असं कबूल करा आणि दरवाजा उघडून आंत घ्या.

प० नागरिक—तसं आम्हांला करतां येत नाहीं. जो पुराव्यानं राजा असं ठरेल त्याची आम्हीं आपल्याला राजनिष्ठ प्रजा म्हणवूं. त्यालाच आंत घेऊं. पुरावा होईपर्यंत दरवाजे कोणाकरतांच उघडले जाणार नाहींत.

कपिध्वज—इंद्रकीलचा राजा कोण आहे त्याची शाबीती हा मुगुट करीत नाहीं काय ? ह्याच्यावर विश्वास नसेल, तर आम्हीं आपल्या बरोबर इंद्रकीलचे जे तीस हजार शिपाई आणले आहेत त्यांच्या साक्षी घ्या.

शबलाक्ष–हो हो–अलबत्! ह्या इंद्रकीलच्या गादीचा हा अनौरस लेंकावळा आणि बाकीचे हे सर्व शिपाई–साक्ष देण्याला तयार आहेत.

हंसकेतु–त्यांच्याच बरोबरीच्या पिंडांचे आणि धैर्यांचे आम्हींही आमचं म्हणणं शाबीत करायला तयार आहोंत.

शबलाक्ष–त्याचप्रमाणें हा लेंकवळाही तयार आहे.

हंसकेतु–तर मग हक्क शाबीत करायला अस्तन्या सारून असे पुढें या.

प० नागरिक–आपणां दोघांमध्यें जो लढा पडला आहे त्याचा निकाल होऊन, खरा राजा कोण तें ठरेपर्यंत हें शहर आमच्याच ताब्यांत राहील.

कपिध्वज–असंच जर असेल, तर परमेश्वरा, ह्या नागरिकांच्या आत्म्यांना पापापासून मुक्त कर. त्यांच्या नेहमींच्या घरांत त्यांना सुखी ठेव. संध्याकाळचं थंड दंव पडण्याच्या आधींच मोठं रणकंदन होऊन, खरा राजा कोण तें ठरेल. खोटा पक्ष खालीं तोंड घालून भरारी मारणार.

मुचकुंद–अगदीं खरं! सैनिकहो, आपापलीं शस्त्रास्त्रं सावरा. घोड्यांवर खोगरं आवळा.

शबलाक्ष–(पुढें होऊन) ओ–हो–हो–हो. नंदनवनांत क्रीडा करणाऱ्या मरुत्वानाची स्वारी वारूवर आरूढ होऊन लढाईला तयार झाली आहे; आतां सगळेजण त्यानां भ्या बरं का? (मुचकुंदाला) अहो–शूरवीर लढवय्ये, मी जर घरीं असतों तर खचित आपल्या सौभाग्यवतींना सिंहिणीचं कातडं पांघरायला देऊन आपल्याला ग्रामसिंहाचा मुखवटा घालायला दिला असता. अशा तऱ्हेनं मी आपल्याला खरमुख नांवाचे राक्षस बनवणार होतों; पण आतां उपाय नाहीं.

मुचकुंद–बस्–आतां पुरे करा.

शबलाक्ष–काय, ह्या खऱ्या सिंहाची गर्जना ऐकून ग्रामसिंह भ्याला वाटतं?

कपिध्वज–चला-त्या वरच्या मैदानांत चला. तिथें योग्य ठिकाणीं आपलं सैन्य उभं करूं.

शबलाक्ष–त्वरा केली तरच ह्या वेळीं आपल्याला रणमैदानावर सोयीची जागा मिळेल.

हंसकेतु–आमचे सैनिकहो, त्या पलीकडच्या टेंकडीवर आमचं बाकीचं सैन्य उभं राहण्याची आमची आज्ञा जाहीर करा.

(सर्व जातात. पडद्यांत लढाईची गडबड होते. फेनपेशाचा एक दूत येतो.)

फे०दूत–अंबरपूरच्या शूर जवानांनो, उघडा–दरवाजे उघडून इंद्रकीलच्या तरुण राजाला–वीरबाहूला आंत घ्या. वीरबाहूनं आज फार घोर समर करून, इंद्रकीलच्या शूर मुलांना रणशय्येवर छिन्नभिन्न करून निजवले आहेत; त्यामुळें त्यांच्या माता ढळढळ अश्रु गाळायला लागल्या आहेत. आपल्या सुंदर उबदार स्त्रियांनां रमणीय मंचकावर नेहमीं आलिंगनं देऊन इष्कबाजींत दंग होणारे कांहीं हौशी इंद्रकीलचे लोक–आज रणमैदानांत थंडगार मातीला मिठी मारून स्वस्थ घोरत पडले आहेत. फारच थोडक्या खराबीनं आम्हीं विजयी झालों. फेनपेशाचं निशाण विजयश्रीच्या आलिंगनानं खूष झाल्यामुळें थैथै नाचतं आहे. तुमचा राजा वीरबाहूच आहे असं सांगण्याकरतां तें पहा तुमच्या तटाकडेच तेंच येत आहे. (इंद्रकीलचा दूत येतो.)

इं० दूत–अंबरपूरचे प्रजाजनहो, त्वरा करा. गुढ्यातोरणं उभारा. तोफांच्या सरबत्तीनं उन्हाळ्याचा भास करणारा आजचा हा दिवस शुभकारक आहे. कारण, कपिध्वजराजा आज पुरा विजयी झाला आहे. इंद्रकीलचे शिपायी इथून गेले तेव्हां

त्यांचीं चिलखतं आणि शिरस्त्राणं चकचकीत होतीं; पण तीं आतां फेनपीसैन्याच्या रक्तानं बरबटून गेलीं आहेत. फेनपेशाच्या भालेवाल्यांनीं आमच्या शिपायांच्या बरगड्या तोडण्याचा अचाट प्रयत्न केला; पण तो सगळा व्यर्थ गेला. पहिल्याच धडकीला आमचा झेंडा विजयी झाला. रानटी–क्रूर प्राण्यांची शिकार करून, शिकारी लोक जसे प्रफुल्लित मुद्रांनीं परत येतात त्याप्रमाणें ते पहा–शत्रूच्या रक्तांत न्हालेले इंद्रकीलचे शिपाई आनंदांत गर्क होऊन इकडेच येताहेत.

प० नागरिक–दोन्हीं पक्षांच्या दूतांनो, तुमची लढाई कशी काय झाली ती आम्हांला आरंभापासून अखेरपर्यंत ह्या शहराच्या उच्च मनोऱ्यावरून सर्व दिसली. तींमध्यें आम्हांला दोन्ही पक्ष समानच दिसले. वाराला वार, ठोंशाला ठोंसा, पेंचाला पेंच वगैरे गोष्टी दोन्हीं पक्षांची समानताच दाखवीत होत्या. दोन्हीं पक्ष आम्हांला आवडले. दोघांपैकीं एकानं आपण राजे आहोंत हें सिद्ध केलं पाहिजे. तें सिद्ध होईपर्यंत हें शहर दोघांचंही आहे, असं जरी म्हटलं, तरी एक पक्ष विजयी होईपर्यंत हें शहर दोघांकरतां आमच्याच ताब्यांत राहील.

(कपिध्वज आणि हंसकेतु समोरासमोर ससैन्य येतात.)

कपिध्वज–राजा, बोल! आमच्या खऱ्या हक्काच्या ओघाला स्वच्छंदानं वाहूं देण्याला अडथळा करून, अद्याप तुला किती रक्तस्राव करून घ्यायचा आहे? आमच्या हक्काच्या स्वच्छ ओघाच्या गतीला तूं अडथळा करूं नको. तूं त्याला अडथळा केलास, तर तो क्रोधानं खवळून आपलं जन्मस्थान सोडील आणि घोंटाळ्यानं ग्रस्त झालेल्या तुझ्या देशाच्या किनाऱ्याला गिळून टाकील. म्हणून म्हणतो–आमच्या हक्काच्या स्फटिकतुल्य प्रवाहाला स्वच्छंदानं महोदधीला जाऊन मिळूंदे.

हंसकेतु–राजा, तुझं बोलणं चुकीचं आहे. आतांच्या रणकंदनांत तुझीच फार खराबी झाली आहे. खड्ग धरलेल्या ह्या हाताचीच शपथ घेऊन सांगतों कीं, न्यायानं उचललेलं हें खड्ग खालीं ठेवण्याच्या आधींच तुला तुझं खड्ग खालीं ठेवायला लावीन. तसं जर न होईल तर (कागद दाखवून) ही पहा यादी–ह्या मृत्युमुखीं पडलेल्या वीरांच्या यादींत राजमृत्यूची भर टाकीन.

शबलाक्ष–अहो–सरकार, वैभवशाली महाराज, आपलं अमोल राजरक्त सध्यां उष्णतेच्या तापानं कढत असल्यामुळें आपल्या वैभवाचा मनोरा अतीशय उच झाल्यासारखा दिसतो आहे. पण हें पहा, यमराजाला आवडनिवड कांहीं नाहीं. त्याचा खादाड जबडा यथेच्छ ताव मारण्याकरतां त्यानं पुरा पसरला आहे. त्यानं आपल्या दाढा आणि दांत सैनिकांच्या शस्त्रास्त्रांचींच बनवलीं आहेत. म्हणून म्हणतों–तुम्हांला काय करायचं आहे तें विसरून जाऊन–तुम्हीं एकमेकांकडे अशा भ्रूभ्रमाच्या मुद्रा करीत स्वस्थ उभे काय राहलां आहांत? रक्तपातानं बरबटलेल्या रणभूमीकडे वळा. परमेश्वरानं दोघांनांही दिलेल्या एकसारख्या शक्तीच्या आणि प्रदीप्त झालेल्या आत्म्याच्या प्रभावानं हलकल्होळ करून, कोणच्या तरी एका शक्तीचा चुराडा करा आणि दुसरीला शांततेंत मग्न होऊं द्या. तोंपर्यंत रक्त, मांस, मृत्यु ह्यांचा गोंधळ चालूं द्या.

कपिध्वज–हे शहरवासी अजून कोणाचा पक्ष स्वीकारायला तयार आहेत?

हंसकेतु–नागरिकांनो, बोला–तुमचा राजा कोण?

प०नागरिक–इंद्रकीलचा जो राजा तोच आमचा; पण तो कोण हें ठरेल तेव्हां.

हंसकेतु–तो आम्हीं आहों असं समजा. कारण त्याचं प्रतिनिधित्व सध्यां आमच्याकडे आहे.

कपिध्वज–जिथें राजा प्रत्यक्ष आहे तिथें मुखत्यार किंवा प्रतिनिधी यांची जरूरी काय? म्हणून म्हणतों–तो आमचा मान आम्हांला देऊन, आपला प्रजाजनांचा हक्क आमच्यावर चालवा.

प०नागरिक–खोट्या राजाच्या अमलाखालीं जाऊन, त्रासांत हाल सोसण्याची आमची इच्छा नाहीं. तुम्हां दोघां बलवानां-पैकीं, एक राजा खरा ठरेपर्यंत ह्या शहरचा हा लोखंडी दरवाजा भीतीनं असाच बंद राहील.

शबलाक्ष–देवाशपथ, हे अंबरपूरचे लोक महा नीच आहेत. तुम्हां दोघांनाही धाब्यावर बसवण्याचा हे प्रयत्न करताहेत. हे तुमच्या चेष्टा करताहेत. रंगभूमीवरच्या नटांप्रमाणें हे अंबरपूरचे लोक त्या तटावरून तुमच्यापुढें–आतां घडलेल्या रणकंदनाचं नाटक करताहेत. म्हणून म्हणतों कीं, माझं ऐका. भयानं निर्बल करून सोडणाऱ्या तोफांच्या शिस्ती ह्या तटावर बांधा. पूर्वेकडून फेनपची शिस्त आणि पश्चिमेकडून आमची. मूर्खप-णाच्या घमेंडीनं जागच्या जागीं अखडून बसलेले ते निर्बल दगड ढांसळून रणमैदानांतली धूळ फांकीत पडेपर्यंत, त्यांच्या-वर जोराचा मारा केला पाहिजे; म्हणजेच त्यांच्या आश्रयाला राह्यलेल्या ह्या नीच लोकांची रग जिरेल. ह्या शहरांतल्या सर्व दुष्टांना सर्वसाधारण हवेप्रमाणें नग्न करून टाकतों. इतकं झाल्यावर पुन्हां आपण आपापसांत युद्ध करूं. नंतर विजय-श्रीला ज्याच्यावर खूष व्हायचं असेल त्याच्यावर ती होईल. तशा त्या वैभवाच्या आरक्त कपोलांचं चुंबन करणं–ज्याच्या नशीबीं असेल तो करील. मग कसं काय? राजमुर्तींनो, हा

माझा गांवढळ सल्ला तुम्हांला आवडतो का ? उत्तम राजकारणांत ही सल्ला उपयोगी पडेल तर पहा.

कपिध्वज–आम्हांला सल्ला आवडला. फेनपेश, प्रथम आपण आपल्या सेना एकत्र करून, ह्या अंबरपूरच्या लोकांनां जमीनदोस्त करूं. नंतर खरे हक्कदार कोण तें ठरवूं.

शबलाक्ष–ह्या नीच शहरवासीयांनीं दोन्हीं पक्षांचा सारखाच अपमान केला आहे. तुमच्यांत जर कांहीं राजसत्व असेल, तर तोफखान्यांचीं तोंडं फिरवा. तटावर शिस्त बांधा. त्यांना जमीनदोस्त करायला आम्हांला मदत करा. तें काम उरकल्यावर, स्वर्गाची किंवा नरकाची वाट दाखवणाऱ्या घंटेच्या घणघणाटाप्रमाणें आपसांत युद्ध करायला मोकळेच आहांत.

हंसकेतु–ठीक आहे. बोला, तुम्हीं कोणच्या दिशेकडून मारा करणार ?

कपिध्वज–आम्हीं पश्चिमेकडून ह्या शहरच्या मध्यावर मारा करतों.

मुचकुंद–मी उत्तरेकडून करतों.

हंसकेतु–आम्हीं दक्षिणेकडून ह्या शहरावर आगीचा कल्होळ करतों.

शबलाक्ष–वाहव्वा–उत्तम–युद्धरचना तर मोठी नामी झाली. उत्तरेकडून मुचकुंदजी आणि दक्षिणेकडून हंसकेतुमहाराज–एकमेकांच्या तोंडांवर सान्मे मारा सुरू करणार.

प० नागरिक–राजमूर्तींनो, आमचं म्हणणं ऐका. दोन्हीं पक्षांत मित्रभाव उत्पन्न होईल अशी युक्ती आम्हीं सांगतों. आमच्या म्हणण्याप्रमाणें केलं, तर हें शहर, एकही रक्ताचा थेंब न पडतां आणि तोफेचा एकही आवाज न होतां तुमच्या ताब्यांत येईल.

कपिध्वज—बोला—तुमचं बोलणं ऐकायला आम्हीं फार खूष आहों.

प० नागरिक—ती सम्राटची राजकन्या कपिध्वज महाराजांची भाची आहे. फेनपचे युवराज हंसचूड—यांच्याकडे आणि त्या सुकुमार कुमारिकेकडे पहा. स्त्रीविषयक प्रेमा जर सौंदर्याचा शोध करायला निघाला तर तो ह्या कुमारिकेशिवाय त्याला कुठें सांपडणार? खरी प्रीति जर सद्गुणांचा शोध करूं लागली, तर तिलाही ते ह्या कुमारि स्वयंप्रभेशिवाय कोणांमध्यें आढळणार? बरोबरीच्या कुळांत उत्पन्न झालेलं स्त्रीरत्न जर युवराज हंसचूड शोधूं लागले, तर त्यांना स्वयं-प्रभेशिवाय उच्च रक्ताचं दुसरं कोणचं सांपडणार? एकंद-रींत काय कीं, सौंदर्य, सद्गुण आणि कुल ह्या तिहींनीं त्या जशा शोभताहेत तसेच हंसचूडही खुलताहेत. ते जर तसे नसतील तर त्याही तशा नाहींत असं म्हणावं लागेल. स्वयंप्रभेंत उणें-पणाचं नांव ठेवायला कोणचीच जागा नाहीं. तसं जर नसेल तर त्या त्यांच्यासारख्या नाहींत असं म्हटलं पाहिजे. ब्रह्म-देवानं ह्या मानवकोटींत प्रथम एकच अत्युत्कृष्ट मूर्ती तयार करण्याचं योजलं होतं; पण पुढें त्या अत्युत्कृष्टतेचे दोन समान भाग करून, ह्या दोन मूर्ती त्यानं उत्पन्न केल्या आहेत. तेव्हां असे जे त्या गुणोत्कर्षतेचे दोन समान भाग—दोन दिव्य प्रवाह—त्यांचा संगम जर झाला, तर आपण उभय राजमूर्ति किती तरी शोभाल! बंदोबस्तानं ठाम केलेले ह्या शहराचे दरवाजे तोफांपेक्षां ह्याच संयोगानं जास्त लवकर उघडले जातील. आपण नंतर सुखानं शहरप्रवेश कराल. हा शरीरसंबंध जर होणार नाहीं तर तुफान करणारा समुद्र वेळेस शांत होईल, सिंहाचा दृढ-निश्चय ढळेल, डोंगर आणि खडकही आपल्या स्थितीपासून

स्वतंत्र होतील, इतकंच नव्हे तर काळाची अपरिहार्य घातकी निर्घृणता देखील आपल्यापुढें टिकणार नाहीं; पण हें शहर आमच्या ताब्यांत ठेवण्याच्या दृढनिश्चयापासून आम्हीं कधींही ढळणार नाहीं.

शबलाक्ष–हं झाला–हाच आमच्या शक्तीवर आघात झाला. तोंच वृद्ध मृत्यूचा कुचका मुडदा हालवून त्याच्या चिंधड्या उडवीत आहे. अहाहा! हें विराटवदन तर पहा! त्यांतून मृत्यु, डोंगर, खडक, समुद्र सर्व कांहीं पटापट थुंकीप्रमाणें बाहेर पडत आहे. बारा तेरा वर्षांचीं पोरं जशी कुत्र्यांच्या पिल्लांची मैत्री वर्णन करतात त्याचप्रमाणें सिंहाशीं मैत्री असल्या-बद्दलची तें तोंड प्रशंसा करीत आहे. त्याला जिंकण्याची कोणच्या तोफखान्याची छाती आहे? त्या तोंडांतून निघणारे शब्द म्हणजे तोफेचे प्रज्वलित गोळेच, शब्दोच्चारांची हवा म्हणजे धूर आणि बोलण्याचा आवेश हीच युद्धाची झडप. त्या तोंडांतल्या जिभेंतून केवढा खणखण नाद निघतो आहे तो ऐका. आमच्या कानांत तर बुवा अगदीं खुंट्या बसल्या. फेनपांच्या प्रत्यक्ष बुक्या खाण्यापेक्षां हा प्रत्येक शब्द दांडग्या मुष्टिप्रहारा-प्रमाणें भासतो आहे. छेः, देवाशपथ, माझ्या भावाचा बाप मेला असं म्हटल्यापासून, मी शब्दमारानं इतका कधींच बोथट झालों नव्हतों.

वेत्रवती–(कपिध्वजाला हलकेंच) राजा, तें त्या नागरिकांचं म्हणणं ऐक. हा संबंध जुळीव. मोठ्या हुंड्यासह आपल्या भाचीला दे. ह्या योगानं तुझ्या मस्तकावरच्या मुगुटाची गाठ ज्यास्त पक्की होईल. मोहोरापासून उत्पन्न होणाऱ्या शक्तिव-र्धक फळाला पिकवणाऱ्या सूर्यप्रकाशाची जी त्या पलीकडे उभ्या असलेल्या पोराला आशा आहे–ती ह्या योगानं पार नाहींशी

होईल. हंसकेतुराजाच्या मुद्रेवर कबूलीचं निशाण दिसतं आहे. ते पहा आपापसांत कसे गुणगुणताहेत. त्यांचीं मनं ह्या महत्वाकांक्षेला योग्य आहेत तोंपर्यंत त्यांची मनधरणी कर. गोड आर्जवाच्या दयाभूत अनुतापानं हवामय श्वासोच्छ्वासांनीं त्यांचा जो उत्साह विरघळला आहे तो पूर्ववत थंड होऊन थिजूं देऊं नको.

प०नागरिक—करडेपणानं भेवडावलेल्या आमच्या ह्या शहराचा हा तह करण्याबद्दल राजद्वयांकडून कांहींच जबाब कां बरं मिळत नाहीं?

हंसकेतु—कपिध्वजराज, या शहरवासीयांशीं बोलण्याचा प्रथम तुम्हींच आरंभ केला आहे. म्हणून प्रथम तुम्हींच त्यांनां उत्तर द्या. तुमचं म्हणणं काय आहे?

कपिध्वज—ते तुमचे युवराज—राजकीय चिरंजीव जर आमच्या भाचीच्या सौंदर्यकोशांतलं "मी प्रीति करतों" हें वाक्य वाचूं शकतील, तर महाराणीच्या योग्यतेचा हुंडा देण्याला आम्हीं तयार आहों. सुरेखपणा, सुशिक्षितता आणि सुकुलीनता ह्यां सर्वांत आमची स्वयंप्रभा सर्व जगांत एकटीच आहे. तिला तिच्या लग्नाच्या वेळीं, पदव्या—मान—बढत्या—वगैरे देऊन, इंद्रकीलच्या मुकुटाशीं आणि वैभवाशीं द्रोहाचं वर्तन करणाऱ्या ज्या ह्या अंबरपूर शहराला आम्हीं वेढा दिला आहे—त्या तुमच्या देशांतल्या ह्या शहराशिवाय समुद्रकांठच्या जितक्या जमीनींवर आमचा ताबा आहे—तितक्या सर्व जमीनी आम्हीं तिला आंदण देण्याला तयार आहों.

हंसकेतु—बेटा—हंसचूडा, ती स्वयंप्रभा बघ. तुला बायको आवडते का?

हंसचूड—महाराज, मी तिला पाहिली. मला तिच्या नेत्रांत

मोठाच चमत्कार आढळला–असं म्हणण्यापेक्षां चमत्कारिक अलौकिकपणा दिसला असं म्हणणं बरं. माझी छाया तिच्या नेत्रांत प्रतिबिंबित झाली आहे. ती छाया आपल्याच मुलाची असल्याकारणानं ते डोळे सूर्यासारखे होऊन त्यांनीं आपल्या ह्या मुलाला छाया बनवली आहे. मी खात्रीनं सांगतों कीं, त्या डोळ्यांच्या अप्रतिम तकटावर मी आपली स्वतःची उत्कृष्ट रंगीत तसबीर पाहण्याच्यापूर्वी मी आपणां स्वतःवर कधींच इतका भाळलों नव्हतों.

(स्वयंप्रभा आणि हंसचूड हलकेंच आपसांत बोलतात.)

शबलाक्ष–(स्वगत) काय गंमत आहे पहा! ह्या स्वारीची तसबीर तिच्या अप्रतिम तकटावर उभी राहून ती तिच्या विलासी भ्रूरज्जूच्या पाशांत बद्ध झाली; आणि प्रीतीची विश्वासघातकी म्हणून स्वतः तिच्या हृदयांत ठेंचून राहिली. हर हर! केवढी ही दुःखाची गोष्ट आहे पहा! प्रेमविषयांत उभं करून बांधणं आणि ठेंचून भरणं अशा गोष्टी करून घेण्याला खचित या मूर्खासारखा दुसरा कोणीही ग्राम्य नसेल.

स्वयंप्रभा–ह्या कृत्यांत माझ्या कपिध्वज मामांची जी इच्छा तीच माझी. त्यांनीं (हंसचूडास) आपणांस पसंत केलं आहे. माझी इच्छा–त्यांच्या पसंतीची बंदी दासी आहे. पण खरं पाह्यलं तर आपली जर इच्छा असेल, तर मीही आपल्या प्रीतीला तसं करायला लावीन. प्रियकरा, ह्यापेक्षां अधिक काय बोलूं? माझ्या विचारसरणीच्या योगानं गुणाचा अवगुण किंवा आपल्या-संबंधाची कुकल्पना करण्याची जरी मला शक्ति आहे, तरी आपल्यामधें जें कांहीं मला आढळलं तें एक योग्य प्रेमच.

कपिध्वज–अरे, ह्यांच्या आपापसांत काय गोष्टी चालल्या आहेत? बाळ स्वयंप्रभे, तुझं काय म्हणणं आहे?

स्वयंप्रभा—मामासाहेब, आपल्याला आपलं मन जसं करायला सांगेल तशा तऱ्हेनं वागायला, ही आपली भाची, नात्याच्या दोरीनंच बांधली गेली आहे.

कपिध्वज—ठीक आहे. युवराज हंसचूड, बोला—ह्या आमच्या भाचीशीं शरीरसंबंध करण्याची तुमची खुषी आहे काय ?

हंसचूड—असं विचारण्यांत मतलब काय ? मी प्रीतीपासून पराङ्मुख होईन कीं काय असं विचारा. कारण, माझं तिच्यावरचं प्रेम अगदीं निष्कलंक आहे.

कपिध्वज—आम्ही हिचा हात तुमच्या हातांत घालतों. लग्नाबद्दलच्या हुंड्याबद्दल—दोन लक्ष मोहोरा आणि ह्याच देशांत आमचीं जीं पांच शहरं आहेत तीं—तुम्हांला आम्हीं आंदण देतों. हंसकेतुमहाराज, आपली जर ह्या शरीरसंबंधांत अनुकूल संमती असेल, तर आमच्या ह्या स्वयंप्रभेच्या हातांत आपल्या चिरंजीवांचा हात घाला.

हंसकेतु—(हंसचूडाचा हात धरून) ह्या आमच्या चिरंजीवांच्या हातांत आपल्या भाचीचा हात द्या. (कपिध्वज हात मिळवतो.)

मुचकुंद—लागलाच विड्या तोडण्याचाही समारंभ व्हावा. माझ्या लग्नाच्या वेळीं मी तशी सलगी ताबडतोब केल्याचं मला पक्कं आठवतं.

हंसकेतु—अंबरपूरच्या नागरिकांनो, आत्तां करून दिलेल्या स्नेहभावाचा तुमच्या शहरांत आदरानं प्रवेश होण्याकरतां—आतां दरवाजा उघडा. ह्या लग्नविधीचा पुढचा समारंभ ताबडतोब उरकला म्हणजे बरा. काय, चित्रसेनाताई इथें नाहींत ? पण त्या इथें नाहींत हेंच बरं आहे. त्या इथें असत्या तर ह्या शरीरसंबंधांत मोठंच विघ्न आलं असतं. वीरबाहू कुठें आहे ?

हंसचूड–त्या दुःखविकारानं ग्रस्त झाल्या आहेत. वीरबाहू त्यांच्याच जवळ तंबूंत बसला आहे.

हंसकेतु–ह्या तहानं तिचा दुःखभार वाढणार खास. कपिध्वजराज, तिच्या दुःखाची शांति आतां कोणच्या उपायानं करतां येईल? तिचा हक्क स्थापित करण्याकरतां आम्हीं इथें आलों; पण आम्हीं आपल्या श्रेष्ठपणाला निराळाच रस्ता दाखवला हें परमेश्वराला सहन होईलना?

कपिध्वज–तें सर्व आपण व्यवस्थित करूं. वीरबाहूला भरतपूरचा सरदार करून, रामनगरचा जमीनदार करूं म्हणजे झालं. ह्याशिवाय हें अंबरपूर शहर त्यांतल्या जंगी खजीन्यासह त्याला बक्षीस दिलं म्हणजे तंटा संपला. कुणीतरी आमच्या चित्रसेनावहिनींना बोलवा! एखादा चपळ जासूद धाडून त्यांना आमच्या गोटांतल्या लग्नमंडपांत घेऊन या. आतां सांगितलं इतक्या उपायांनीं जर त्यांची ओरड बंद झाली नाहीं, तर इतर हर उपायांनीं त्यांचं तोंड बंद करूं. पण पुढच्या विधीची कांहींच तयारी नाहीं. लग्नसमारंभाच्या व्यवस्थेंत घाई होऊन मोठा गोंधळ उडणार आहे. पुढची व्यवस्था करायला आम्हीं जातों. तुम्हींही चला.

(अंबरपूरच्या उघडलेल्या दरवाजांतून **शबलाक्षा**शिवाय सर्व जातात.)

शबलाक्ष–काय हें खुळं जग, किती हे वेडगळ राजे आणि काय ही त्यांची खुळचट कृति! वीरबाहूला पदभ्रष्ट करण्याच्या हेतूनं त्याचं सर्व राष्ट्र आपल्या घशांत उतरवण्याकरतां कपिध्वजराजानं त्याच्यापुढें एक भाकरीचा तुकडा फेंकून दिला आहे. ज्या हंसकेतूला मनोदेवतेनं त्या सत्कार्याकरतां आपली ढाल पुढें करायला सज्ज केलं होतं–प्रत्यक्ष परमेश्वराचा दूत म्हणून, उत्साह आणि धर्म यांनीं ज्याला दंड थोपटून रणांत आणलं–त्याच्याच कानांत

स्वहिताच्या गारुडी मंत्राचा फुंकर बसल्याबरोबर, तो कर्तव्य-परांङ्मुख होऊन, वचनभ्रष्ट झाला. त्याच स्वार्थपिशाचिकेनं आपल्या मदानं सर्व जगाला अगदीं गुंग करून सोडलं आहे. मनुष्य एकदांका त्या पिशाच्चाचा ताबेदार झाला कीं, सत्यानं आपला पाय तिथून काढलाच. वचनं आणि प्रतिज्ञा ह्यांची त्याला मग आठवण कुठली ! राजेरजवाडे, यःकश्चित भिकारी, वृद्ध, तरूण, कुमारिका—हीं सर्व त्याच्या हांतून कधीं सुटायचीं नाहींत. ह्या जगांत स्वार्थ जर नसता, तर हें मोठ्या आनंदांत नांदलं असतं. ह्या जगाला स्वार्थाची नुसती झुळुक लागतांच हें झंझावाताच्या प्रचंड भोंवऱ्यांत सांपडल्याप्रमाणें होऊन, ह्याची परिस्थिति सर्वस्वी बदलल्यामुळें, ह्याच्यांतून समता पार नाहींशी झाली. सद्धेतूनं धरलेली दिशा आणि वरलेला मान पार लोपून जाऊन ह्याच स्वार्थानं हंसकेतूच्या चंचल डोळ्यांत धूळ फेंकली. ज्या सत्कार्यापासून किंवा ज्या रणांत सत्याकर-तांच आपल्या रक्ताचा सडा पाडून आपली कीर्ति त्यानं दुमदुमत ठेवली असती—इतकंच नव्हे तर प्राण गेला तरी बेहेत्तर पण निश्चयापासून यत्किंचितही ढळणार नाहीं असा त्याचा कृत-संकल्प असतां—स्वार्थानं त्याला खेंचून नेला. स्वार्थानंच त्याला लज्जास्पद आणि दुष्कीर्तिदायक अशी तहाची कलमं मान्य करायला प्रवृत्त केलं. (विचार करून) बरं पण ह्या स्वार्थावर मी इतका दोषारोप करण्याचं कारण काय ? हो—उघडच आहे. ह्याचं कारण जर मला कोणी विचारलं, तर त्याचं उत्तर माझ्या जवळ अगदीं चोख आहे. 'स्वार्थानं अद्याप मला घेरलं नाहीं' हेंच ह्याचं उत्तर. त्यानं आपले पंजे पसरून माझ्यावर झडप मारली म्हणजे त्यांतून मला निसटून जाण्याचं सामर्थ्य आहे असं मात्र कोणीं समजू नये. माझ्यावर तसा प्रसंग आला नाहीं म्हणूनच माझ्या ह्या

लांब लांब गोष्टी सुरू आहेत. एखाद्या भिकाऱ्यानं जर एखाद्या श्रीमंतावर हवं तसं तोंडसुख घेतलं, तर त्यांत गैर तें काय? ह्याच न्यायानं जोंपर्यंत आपल्याजवळ संपत्तीची ऊब नाहीं तोंपर्यंत संपन्न असणं म्हणजे महत्पाप आहे असं म्हणायला मला पूर्ण अधिकार आहे; पण एकदांका मी श्रीमंत झालों कीं, माझे सद्गुण मला काय म्हणतील कीं, भिकारी होण्यासारखं ह्या जगांत दुसरं पापच नाहीं. मोठालीं माणसं स्वार्थाकरतां आपल्या वचनाची किंमत ठेवीत नाहींत; म्हणून, हे स्वार्था, तूंच माझा परमेश्वर आहेस. तुझीच अनन्यभावानं आराधना करणं माझं कर्तव्यकर्म आहे असं मी आतां ह्यापुढें समजतों. (जातो.)

अंक दुसरा समाप्त.

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

[फेनपेशाच्या तंबूंत **चित्रसेना, वीरबाहु** आणि **वृषसेन** बसलीं आहेत.]

चित्रसेना–काय, त्यांचा शरीरसंबंध झाला? चालू असलेला तंटा बंद करण्याच्या त्यांनीं शपथा घेतल्या? अशा तऱ्हेनं ते परस्परांचे मित्र झाले? ठीकच आहे! खोट्या शपथा वाहणारं रक्त खोट्याला मिळालं. हंसचूडाला स्वयंप्रभा मिळाली आणि स्वयंप्रभेला ते प्रांत मिळाले! छेः–पण असं कसं होईल? तुमच्या बोलण्यांत चूक झाली असली पाहिजे. नीट ध्यानांत आणून पुन्हां सगळी हकीकत सांगा. तुम्हीं म्हणतां तसं कधींच व्हायचं नाहीं. तुमचं म्हणणं खरं आहे असं तुम्हीं म्हणतां पण माझ्या खात्रीवरून तुमच्यावर मला विश्वास ठेवतां येत नाहीं. कारण, तुमचे शब्द म्हणजे एका साधारण मनुष्यप्राण्याचे पोकळ श्वासोच्छ्वास आहेत. माझ्याजवळ विरुद्धपक्षी राजाची शपथ असल्यामुळें तुम्हींच माझ्यावर विश्वास ठेवा. मी सध्यां आजारी, गांजलेली, भयाला वश होणारी–एक विधवा स्त्री असल्याकारणानं तुम्ही तशी हकीकत सांगून मला भेवडावूं नका. तुम्हाला ह्याबद्दल शासन भोगावं लागेल. तुम्ही जें कांहीं बोललां तें सगळं युद्धांतल्या श्रमांबद्दल विश्रांति घेण्यासाठीं थट्टेनं बोललां असं जरी कबूल केलंत, तरी त्यामुळें माझ्या सर्वांगाचा जो भडका झाला आहे तो सर्व दिवसभर–थरकांप करून सोडणाऱ्या युद्धाला विश्रांति देऊन शांतता करायला कधींच उद्युक्त करणार नाहीं. बोला–त्या तुमच्या मान डोलवण्याचा आणि दुःखी मुद्रा करून छातीवर हात ठेवण्याचा अर्थ काय? कांठोकांठ तुडुब भरून मर्यादेबाहेर पाणी वाहण्याजोगा पूर आलेल्या उताणखाट नद्यां-

प्रमाणें ते तुमचे डोळे दुःखाश्रुपूरित होऊन, त्यांतून पाणी बाहेर वाहूं लागण्याबद्दल ते तुम्हाला कां भेवडावताहेत ? हे तुमचे दुःखी हावभाव–तुम्ही बोललेली गोष्ट खरी आहे असं सिद्ध करणाऱ्या खुणा आहेत काय ? जर असतील तर पुन्हां बोला. सगळी गोष्ट ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. पण बोललांत तें 'अगदीं खरं आहे.' इतकंच पुन्हां सांगा म्हणजे झालं.

वृषसेन–माझं म्हणणं खोटं आहे असं मानण्याला आपल्याला जितकं सबळ कारण आहे तितकंच–मला माझं म्हणणं खरं आहे असंही मानण्याला आहे.

चित्रसेना–आहो, ही दुःखदायक गोष्ट खरी आहे असं मानायला जर तुम्हीं मला शिकवताहांत, तर त्या दुःखदायक गोष्टीला ह्या जगांतून नाहींशी कशी करतां येईल हेंही मला शिकवाना ? संतापजनक अशा संग्रामांत ज्याप्रमाणें दोघां निराश जीवांचा पहिल्या धडकीसरसा नाश होतो, त्याचप्रामणें विश्वास आणि जीवित्व ह्यांचंही होऊं दे. हंसचूड आणि स्वयंप्रभा यांचं लग्न झालं. आतां माझ्या बाळा–तूं–तुझी अवस्था कायरे होणार ? हंसकेतु आणि कपिध्वज ह्यांचा स्नेह जमला. आतां माझी गत काय ? जा–चालते व्हा–मला तें तुमचं तोंड बघवत नाहीं. ह्या घडलेल्या गोष्टीच्या बातमीनं तुम्हाला शतमूर्ख ठरवलं आहे. चला–निघा–चालते व्हा माझ्यापढून !

वृषसेन-मी काय करूं ? माझा काय गुन्हा आहे ? दुसऱ्यांच्याकडून घडलेली हकीकत मी आपल्याला सांगितली ह्यापेक्षां दुसरा गुन्हा मीं काय केला ?

चित्रसेना–ह्याच गुन्ह्याचा अंतर्भाग इतका–दुर्गंधीचा आहे कीं, ज्यांच्या तोंडून तो वदला जातो त्यानांही त्याचा संसर्ग होतो.

वीरबाहू–आई, झाली गोष्ट कधीं परत आली आहे का ? उगीच दुःख करण्यांत अर्थ काय ?

चित्रसेना–बाळा–वीरबाहू, ह्या माझ्या गर्भाशयाला कमीपणा आणणारा असा तूं–दिवटा, राहुमुखी, भागुबाई, कलंकी, निर्लज्ज, कुलांगार, लंगडा, मूर्ख, आडमुठ्या, डोळयांत फुलं पडून वडस वाढलेला, गधडा जर असतास आणि मग अशा तऱ्हेनं शांतवन करून घेण्याला जर तूं मला सांगितलं असतंस, तर मग मात्र निष्काळजीपणानं मी शांतवन करून घेऊन, तुझ्यावर कधींच प्रेम केलं नसतं; पण तशा स्थितींत तुझा जन्म थोर कुळांत झालाच नसता. राजमुगुट धारणकरायला त्या स्थितीनं तुला अयोग्यच ठरवलं असतं; पण खरं पाह्यलं असतां, तूं सुरूप असून-माझ्या लाडक्या, तुझ्या जन्माच्यावेळीं, प्रकृती आणि प्रालब्ध यांनीं संगनमतानं तुला थोर असा उत्पन्न केला आहे. प्रकृतीनं जी तुला देणगी दिली आहे, तिनं तूं आपल्या सौंदर्याबद्दल कमलाशीं स्पर्धा करून, कांतीबद्दल, अर्धवट उमललेल्या गुलाबाच्या कळीचा हेवा करावास अशी तुझी योग्यता आहे. पण प्रालब्धानं जें कांहीं तुला दिलं आहे तें सगळं आचारभ्रष्ट होऊन, खरा रस्ता चुकून, तुझ्यापासून–भूल पाडून चोरून नेलं आहे. तें तुझ्या कपिध्वज चुलत्याशीं प्रहरचे प्रहर व्यभिचारकर्म करताहे. त्यानंच राजवैभवाच्या थोरपणाला लाथेनं तुडवलं आहे. हंसकेतूला फायदा करून घेण्याची सोन्यासारखी संधी त्यानंच आणून दिली आहे. तो स्वतः कपिध्वजाचा आणि प्रालब्धाचा दलाल बनला आहे. तें प्रालब्ध त्या चोरट्या कपिध्वजाचं मध्यस्त बनलं आहे. धन्य आहे त्याच्या त्या कृतीची! मग कसं काय वृषसेनजी, खरं सांगा! हंसकेतूनं माझ्यापाशीं शपथ वाहिली नव्हती का? त्या शपथेची त्याला आठवण करून, त्या शब्दरूप विषानं त्याच्या देहाचा भडका करा. किंवा सध्यां मला सहन करायला भाग असलेलीं दुःखं–मला एकटीला

अशीच इथें सहन करीत राहूंद्या. चला–तुम्ही एकटेच इथून एकदम चालते व्हा.

वृषसेन–क्षमा करा. आपल्याला घेतल्याशिवाय मी त्या राजमूर्तींकडे एकटाच कसा जाऊं?

चित्रसेना–कसा म्हणजे! आपल्या पायांनीं चालत जा. मीं तुमच्याबरोबर येणार नाहीं. दुःख हें जात्या मोठं गर्विष्ट असतं. तें आपल्या धन्याला खंबीर करतं. म्हणून आतां मी माझ्या दुःखाला गर्वाचा धडा देतें. मला आणि माझ्या भयंकर दुःखावस्थेला अभिवंदन करायला माझ्या भोंवतीं राजमंडळ जमूं द्या. कारण, हें दुःख इतकं जब्बर आणि असहनीय आहे कीं, त्याला सांवरायला, ह्या जब्बर–अचल पृथ्वीशिवाय इतर कोणीही समर्थ नाहीं. म्हणून मी आणि माझं दुःख तिचाच आसरा धरून तिच्यावर बसतों. हेंच आमचं सिंहासन. जा–ह्या सिंहासनाला प्रणिपात करायला येण्याबद्दल राजेलोकांनां कळवा.

[जमीनीवर बसते. **कपिध्वज, हंसकेतु, हंसचूड, स्वयंप्रभा, वेत्रवती, शबलाक्ष, मुचकुंद** आणि इतर मानकरी येतात.]

हंसकेतु–सूनबाई, अगदीं खरं आहे. आजचा हा आनंदाचा दिवस सदांसर्वदा ह्या फेनपदेशांत आनंदाचाच मानला जाईल. ह्या आजच्या दिवसाचा गौरव करण्याकरतां, सूर्यानं प्रत्यक्ष आपली गति थांबवून–मौल्यवान असा आपला तेजस्वी डोळा उघडला आहे. आणि ह्या लोष्टमय अशा कृश पृथ्वीला एखाद्या रसज्ञाप्रमाणें त्यानं कल्हई करण्याचा प्रयोग चालवला आहे. दिवसांच्या माळेंत जेव्हां हा दिवस येईल तेव्हां ह्याला उत्साहाचाच मानला जाईल.

चित्रसेना–ही तीथ सणाची नसून अति निंद्य आहे. ह्या तिथीनं अशी कोणची योग्यता मिळवली आहे कीं, हिला सोन्याच्या

शाईनं पंचांगांत सणांच्या यादींत मोठ्या अक्षरांत लिहून ठेवली पाहिजे ? ह्या तिथीला सण मानायच्याऐवजीं–निर्लज्जपणाचा कळस करणारी, जुलमी आणि खोट्या शपथावाहणारी म्हणून तिथींच्या यादींतून काढूनच टाकली पाहिजे. किंवा तिला तशीच ठेवायची असेल, तर ह्या तिथीवर गर्भिणी स्त्रियांनीं बाळंत नहोण्याबद्दल परमेश्वराची प्रार्थनाच केली पाहिजे. ह्या तिथीवर होणारीं मुलं गुणवान होण्याच्या ऐवजीं–वितीपात, वैधृतीच निपजतील. इतकी ही तीथ अमंगळ आहे. ह्या तीथीशिवाय दुसऱ्या तीथीवर जहाजं फुटण्याची खलाशांनीं भीतीच धरूं नये. ह्या तीथीवर न आरंभलेलं काम किंवा न केलेला धंदा बुडण्याची धास्तीच नाहीं. ह्या दिवशीं आरंभलेल्या सर्व कामांचा शेवट कडूच होणार. फार तर काय पण या तीथीवर ठेवलेला विश्वास सुद्धां खोटा ठरतो.

हंसकेतु–ताई, ईश्वरसाक्ष–ह्या तिथीवर घडलेल्या कृत्याला शापदग्ध करायला तुम्हांला कांहींच कारण नाहीं. आपल्या बालकाला मोठ्या संपत्तीचा मालक करण्याची–राजा ह्या नात्यानं मी शपथ घेतली नाहीं काय ?

चित्रसेना–ज्या नाण्याची परीक्षा सराफानं करून त्याला खोटं–बेकिंमत ठरवलं आहे–त्या खोट्या राजाच्या नाण्यानं तुम्हीं मला फसवलं आहे. आहो, तुम्हीं शपथ घेतली होतीना ? माझ्या शत्रूच्या रक्ताचा सडा घालून तें निर्जीव करण्याकरतां जे तुम्हीं अस्तन्या सारून आलां होतां–तेच तुम्हीं त्या अस्तन्या सारण्याचा उपयोग माझ्या शत्रूला घट्ट प्रेमालिंगन देण्यांत करून, आपल्या स्वार्थाची गाठ घट्ट करून घेतलीत. शत्रूचं काळीज ओरबडून काढण्याचा तुमचा आवेश, स्नेहसंपादण्यांत गारठून गेला. सौंदर्याचा भास दाखवण्याकरतां रंग चढवून तयार

केलेल्या नाटकी चेहेऱ्याप्रमाणें लढाईचं उग्र स्फुरण शांत झालं. हा जो तुम्हीं आपसांत तह केला आहे तो निव्वळ आम्हांला दुखवून केला आहे. परमेश्वरा, धांव आतां. ह्या–खोट्या शपथा वाहणाऱ्या राजांना योग्य शासन कर. ही विधवा दुःखाचा हंबरडा फोडते आहे. हिचा भर्ता तूंच हो. हा अपवित्र दिवस युद्धाशिवाय शांततेंत जाणं उपयोगी नाहीं. सूर्यास्ताच्या आधींच ह्या खोट्या शपथा वाहणाऱ्या राजांच्यामध्यें तंटा उपस्थित होऊन लढाईला सुरुवात होईल असं–देवा, तूं करच. देवा, माझं हें गाऱ्हाणं ऐकरे!

मुचकुंद–बाईसाहेब, जरा शांत व्हाल का?

चित्रसेना–आतां कसली शांतता? लढायी, रक्तस्राव ह्यांशिवाय कांहीं नाहीं. लढायी हीच माझी शांति. मुचकुंदजी, तुम्हींच व्यालकूटचे सरदार ना? नाहीं का तुमच्या त्या मूर्खपणाची तुम्हांला लाज वाटत? तुमच्या सारखे भित्रे गुलाम तुम्हींच! किती हो तुम्हीं मूर्ख आहांत? तुमच्या अंगांत पराक्रम आवळ्या एवढा असून, अकलेचं तर नांवच नको. तुम्हीं नेहमीं जोरदार बाजूलाच वळणारे वडवाघूळ आहांत. तुम्हीं नशीबाचे वीर आहांत. तें तुमचं छांदिष्ट नशीब, स्वतः तुम्हांला सुरक्षितपणाचा मार्ग दाखवणारं झाल्याशिवाय, तुम्हीं कधींच लढलां नाहीं. तुम्हींही खोट्या शपथा वाहणारे असून, विनाकारण मोठेपणा मिळवण्यासाठीं थोरांची हांजी हांजी करता. माझ्या पक्षाकरतां खोट्या शपथा वाहणारे, वढाईखोरी दाखवणारे आणि धडपड करणारे तुम्हीं–किती बेअकल अहांतहो? तुमच्या शब्दांचा गडगडाट मेघगर्जनेसारखा आहे. माझ्या बाजूची शपथ घेतलेले तुम्हीं शिपायी आहांत. पण आपल्या दैवाच्या जोरदार ताऱ्यावर अवलंबून राहण्याला मला तुम्हीं

सांगून, आतां माझ्या शत्रूपक्षाला जाऊन मिळता काय? तो सिंहाच्या कातड्याचा पोषाख कशाला नेहमीं अंगावर घालता? द्यानांत तो फेंकून? त्या क्रियानष्ट देहावर गाढवाचं कातडं चढवा!

मुचकुंद—अरेरे! मनुष्यप्राण्यानं मला असे शब्द बोलावे काय?

शबलाक्ष—मग कोण चतुष्पाद बोलेल कीं काय?

मुचकुंद—मूर्खा, तुला तुझ्या जीवाची परवा असेल तर थट्टा करण्याचं धाडस करूं नको.

शबलाक्ष—बस् करा! त्या क्रियानष्ट देहावर गाढवाचं कातडं चढवा.

कपिध्वज—आम्हांला हें अगदीं पसंत नाहीं. आपण कोण आहांत हें विसरून थोरांचा उपमर्द करणं अयोग्य आहे.

(कुशध्वज नांवाचा दूत येतो.)

हंसकेतु—हे पहा जगद्गुरूंच्याकडून दूत आले आहेत.

कुशध्वज—ईशप्रेरित आणि मूर्धाभिषिक्त राजांचा विजय असो. राजा कपिध्वजा, वैदिकधर्माधिकारी जगद्गुरूंचा तुला एक पवित्र निरोप आहे. माझं नांव कुशध्वज मी त्यांचा शिष्य आहें. तूं आर्यधर्माविरुद्ध वर्तन करून, पवित्र दैवतांना तुच्छ मानतोस. तूं आपल्या राज्यांत नवाच एक धर्माधिकारी नेमून खऱ्याला मानीनासा झाला आहेस. ह्या गोष्टींचं कारण काय हें तुला विचारण्याकरतां मीं इथें आलों असून, ह्या तुझ्या कृत्यांचीं कारणं मला सांग.

कपिध्वज—माझ्या सारख्या पवित्र राजाला अशा तऱ्हेनं नांवं ठेवण्याची ह्या मानवी प्राण्यांमध्यें कोणाची छाती आहे? आचार्य, मला प्रश्न विचारून त्याचं उत्तर मिळण्यासाठीं अयोग्य, तुच्छ व निंद्य शब्द प्रत्यक्ष जगद्गुरूंना जेवढे शोभतील तेवढे तुम्ही

मला लावूं शकणार नाहीं. ही हकीकत मठाधिपतींना कळवून शिवाय असंही कळवा कीं, आजपर्यंत आमच्या राज्याच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा गुरुदक्षणेदाखल जो तुम्हांला मिळत असे तोही ह्यापुढें बंद केला आहे. परमेश्वराच्या कृपेनं आम्हीं आमच्या देशांत मुख्य असून, तिथला राज्यकारभार–मर्त्य आचार्यांच्या साह्यावांचून चालवण्याला आम्हीं एकटे समर्थ आहों. इतकं सांगून असंही कळवा कीं, आपण उपटलेल्या परमेश्वराच्या गादीविषयीं आजपर्यंत आमच्या मनांत जो पूज्यभाव होता तोही इतउत्तर विसरा.

हंसकेतु–कपिध्वजराज, अशा तऱ्हेनं परमेश्वराची निंदा कां करता ?

कपिध्वज–मध्यस्ती करणाऱ्या त्या गुरूंच्या शापाची भीति बाळगून, आपणांसह सर्व राजांनीं आपल्या शेंड्या त्यांच्या हातीं दिल्या आहेत. त्यांचे शाप द्रव्यानं उच्छाप करून घेतां येतात. दुष्ट द्रव्याच्या लालसेनं जे लोक क्षमा विकण्याचा व्यापार करतात ते सर्वस्वी परमेश्वराच्या क्षमेला अपात्र ठरतात. असल्या ह्या मायावी गारूडाचं, आपण सर्व राजे जरी आपल्या देशाच्या उत्पन्नावर पोषण करताहांत, तरी मी त्याविरुद्ध असून, जगद्गुरूंना मी आपला शत्रु समजतों.

कुशध्वज–असं जर आहे तर मी आपल्या अधिकाराच्या सामर्थ्यानं तुला शाप देऊन वाळींत टाकतों. तुझ्यासारख्या नास्तीकाचा स्नेह सोडून तुझ्याशीं जो कोणी बंडाळी करील तो खचित परमेश्वराचा लाडका होईल. इतकंच नव्हे तर जो कोणी एखाद्या गुप्त मार्गानं तुझा तो तिरस्करणीय प्राण हरण करील तो मोठा प्रशंसनीय होऊन, साधूंच्या माळेंत पूजला जाईल.

चित्रसेना–ज्या आपल्या अधिकाराच्या सामर्थ्यानं तुम्हीं

ह्या राजाला वाळींत टाकला आहे तोच अधिकार कांहींवेळ मला द्या. त्याच्या योगानं हा राजा माझ्याकडून शापदग्ध होऊं द्या. मीं दिलेल्या शापाबद्दल तुम्हीं 'तथास्तु' म्हणा. ज्या लबाडीनं त्यानं मला दु:खांत ढकललं आहे त्याबद्दल इतरांच्यापेक्षां तो माझ्याच जीभेनं उच्चारलेल्या योग्य शापानं भ्रष्ट होण्याला अगदीं पात्र आहे.

कुशध्वज–ह्याला शाप देण्याचं सामर्थ्य माझ्यांत कायद्यानं आलं आहे. त्याची बजावणी करण्याची मलाच आज्ञा आहे.

चित्रसेना–तो अधिकार मलाही आहे. ज्यांत कायदा असायचा असं माझ्या सोन्याचं राज्य, कायद्यासकट ह्यानं बळकावलं आहे. म्हणूनच ह्याचं राज्य ह्याला इथें मिळत नाहीं. ज्यावेळीं, न्यायांत कायद्याची अंमलबजावणी योग्य तऱ्हेनं होत नाहीं–त्यावेळीं, न्यायानंच दुष्कृत्याला कायद्याच्या जोराचा अडथळा होत नाहीं. ह्या न्यायानं कायदाच जर पूर्णपणें अन्यायाचा ठरतो तर त्याच्याच अनुकरणानं, शाप द्यायला प्रवृत्त होणाऱ्या माझ्या जिभेला त्याला कसा अडथळा करवेल?

कुशध्वज–हंसकेतु राजा, शापाची जर तुला कांहीं भीति वाटत असेल, तर त्या धर्मभ्रष्ट नास्तीकाचा संबंध सोडून दे. तो जर जगद्गुरूंच्या गादीला शरण न जाईल, तर त्याच्याशीं लढाई करायला तूं आपलं सैन्य तयार कर.

वेत्रवति–कां–हंसकेतुराज, असे निरुत्साह कां दिसतां? तुम्हीं आपला स्नेहसंबंध सोडूं नका!

चित्रसेना–अग कैदासणी, तसं करण्याची काळजी घेणं हें तुझंच काम आहे. घे तेवढी काळजी! नाहींतर, स्नेहसंबंध तुटल्यामुळें तुझ्या देहरूपी नरकाला हंसकेतु व्यर्थ मुकतील. ते म्हणजे तुझा प्रत्यक्ष आत्माच झाले आहेत.

मुचकुंद–हंसकेतुमहाराज, कुशध्वज आचार्यांच्या बोलण्याकडे लक्ष दिलं तर बरं होईल.

शबलाक्ष–त्यांच्या त्या क्रियानष्ट शरीरावर कुणीतरी गाढवाचं कातडं घाला हो.

मुचकुंद–अरे साहसिका, हे तुझे बोल सध्यां मला माझ्या हृदयांत सांठवलेच पाहिजेत.

शबलाक्ष–तुमच्या हृदयापेक्षां तुमचा चोळणा त्यांची चांगली सांठवण करील.

कपिध्वज–हंसकेतुराज, आचार्यांना आपण उत्तर देणार?

हंसचूड–महाराज, आपण ह्या गोष्टीचा नीट विचार करावा. आपल्यापुढें दोन मार्ग आहेत. एकानं जगद्गुरूंच्या मठाकडून आपल्यावर शापाचा मोठा तडाका बसणार आहे. दुसऱ्यानं इंद्रकीलच्या राजाच्या स्नेहाच्या क्षुल्लक फायद्याचा बळी पडणार आहे. तेव्हां या दोहोंपैकीं, कोणच्या मार्गाकडून आपल्याला अल्प तोटा होणार आहे ह्याबद्दलचा विचार केला असतां ठीक होईल.

स्वयंप्रभा–जगद्गुरूंचा शाप सोसणं जितकं कमी फायद्याचं आहे, त्याहून इंद्रकीलच्या राजाची मैत्री तोडणं, फारच तोट्याचं आहे–हें कां सांगायला पाहिजे?

चित्रसेना–युवराज–हंसचूडा, जागा हो. आपला विचार ठाम कर. नव्यानवरीचा पोषाख केलेलं हें भूत–तुला भूल पाडतं आहे–ह्याचा विचार कर.

स्वयंप्रभा–चित्रसेनामामींचे हे शब्द अंत:करणपूर्वक नसून, त्यांनां जी कांहीं जरूर आहे तेवढ्याचकरतां आहेत.

चित्रसेना–अहो, विश्वासमूर्तींचा खून झाल्यामुळेंच माझी जरूर जिवंत राहिली आहे. विश्वासाला जिवंत करा म्हणजे

माझी जरूर ताबडतोब विरघळेल आणि त्याचं साम्राज्य सुरू होईल. जोंपर्यंत माझ्या जरूरीला सजीवपणा राहील तोंपर्यंत विश्वासाला लाथाच खाव्या लागतील.

कपिध्वज—हंसकेतूंच्या मनाची चलबिचल झाली आहे. त्यांना कांहींच उत्तर देववत नाहीं.

चित्रसेना—त्यांच्यापासून जरा बाजूला व्हा अन् गोडसं उत्तर द्या.

मुचकुंद—हंसकेतुराज, ठरवाच तर मग. उगीच शंकेंत घोंटाळण्यांत अर्थ नाहीं.

शबलाक्ष—छेः उगीच शंका कशाला हवी! त्याच्या अंगावर एकदम गाढवाचं कातडं चढवा. त्याशिवाय तो अती मौल्यवान—गांवढळ—गाढव—ढ—कसा शोभेल!

हंसकेतु—माझा मोठा गोंधळ झाला आहे. काय बोलावं तें सुचतच नाहीं.

कुशध्वज—तुम्ही जें जें बोलाल त्या.त्यापासून तुमची फजीतीच होणार आहे; कारण, त्या योगानं जगद्गुरूंच्या शापानं दग्ध होऊन तुम्हीं वाळींत पडणार आहां.

हंसकेतु—आचार्य, आपण माझ्या जागीं आहांत असं समजून सध्यांच्या प्रसंगीं आपण कसे वागाल तें सांगा. आम्हां दोघां राजांमध्यें आतां नुकताच मित्रभाव उत्पन्न झाला आहे. आमच्यामध्यें नुकत्याच झालेल्या संबंधानं आमचं अंतरैक्य—धर्मसंबंधीं शपथापूर्वक करारांच्या साह्यानं दृढ झालं आहे. आमच्यामध्यें अगदीं नुकतंच जें भाषण झालं तें—आमचीं राज्यं आणिआम्हीं स्वतः ह्यांच्यामध्यें खरं प्रेम आणि सख्य ह्यासंबंधानं विश्वासाच्या अत्यंत गूढ शपथेचं झालं आहे. कत्तल करणाराच्या लेखणीनं सूडाकडून रक्तमांसांत लडबडलेलं आणि फाजील

भयोत्पादक असं आम्हां दोन राजांच्या भयकारक मतभिन्नतेचं जें चित्र नुक्तंच रेखाटलं गेलं होतं, तें परमेश्वराला माहित आहे. तेव्हां असे जे हे रक्ताच्या अंजुली ओकलेले उभयपक्षीं बलिष्ट हात सध्यां एकमत झाले आहेत, त्यांनीं प्रेमाचं जूं दूर कसं करावं ? विश्वासाचा लपंडाव कसा खेळावा ? एकमेकांच्या हातांत दिलेले हात हिसकावून माघारे घेणं, विश्वासाची शपथ खोटी करणं आणि लग्नाच्या मंगलविधीनं झालेली आनंदकारक शांतता मोडणं म्हणजे निष्कपटभावाच्या मैदानावर वेडेपणानं बंडच करणं नव्हे काय ? परमेश्वराच्या–आमच्या सारख्या अस्थिर बुद्धीच्या लेंकरांनीं अशा तऱ्हेनं ही त्याची थट्टाच करणं नव्हे का ? म्हणून म्हणतों कीं, असं होऊं नये हें बरं ! दुसरा एखादा उत्तम मार्ग आपल्याजवळ असल्यास सांगा. आम्हीं दोघे मित्र राहून आपापल्या वचनांच्या आदरानं सुखी व्हावं ही इच्छा आहे.

कुशध्वज–जो जो उपाय शोधावा तो तो कपिध्वजाच्या मैत्रीविरुद्धच असणार. म्हणून म्हणतों–सैन्याची तयारी कर. आमच्या मठाचा वाली म्हणून शूरासारखा पुढें हो. नाहीं तर, मठाच्या गादीरूप मातेकडून–तिच्या विरुद्ध बंड करणारा जो तूं तिचा थोरला मुलगा–तो तूं शापभ्रष्ट हो. राजा, तूं विषारी तोंडाच्या सापाशीं मैत्री केली आहेस. तूं घातकी–क्रुद्ध सिंहाच्या पंजांत सांपडला आहेस. उपाशी वाघाच्या दाढां-पासून त्रास होणार नाहीं अशी जर तुझी समजूत असेल, तर संपादन केलेला स्नेह खुशाल वृद्धिंगत कर.

हंसकेतु–मीं ज्या हातांनीं स्नेह संपादन केला आहे ते हात विभक्त करीन ; पण विश्वास दवडणार नाहीं.

कुशध्वज–अशा तऱ्हेनं तूं विश्वासाचा शत्रु विश्वासच करतो आहेस. जनप्रकोपांत होणाऱ्या वचनांविरुद्ध वचनांप्रमाणें तूं आपले शब्द आपल्याच शब्दांविरुद्ध करतो आहेस. अरे राजा, प्रथम परमेश्वराकरतां शपथ व्हा. आपल्या धर्मसंस्थापकाच्या गादीचा संरक्षक वीर हो. परमेश्वरापाशीं वाह्यलेली शपथ पुरी कर. सध्यां तूं जी शपथ घेतली आहेस, ती तुझ्याच विरुद्ध आहे. म्हणून तूं ती पाळूं नको. तूं ज्याकरतां शपथ वाहिली आहेस त्यापासून दुष्कृति होणार आहे. तें दुष्कृत्य तूं न केलंस म्हणजे शपथेचं सार संभाळल्यासारखं होईल. तुझा घात होणार नाहीं. ह्याचमुळें तूं सत्याला जागल्यासारखं होईल. एखाद्याला चुकीचा मार्ग लागला असतां, मनांत नसतांही त्याच्या हांतून दुसरी चूक साहजिक घडते. कौटिल्य कुटिलतेलाच सरळपणा आणतं. विस्तव विस्तवाला शांत करतो. ज्यानं स्वतःला जाळून घेतलं आहे अशाच्या देहाचा भडका उष्ण पदार्थांनांच शमतो. खोटेपणाला खोटेपणाच सरळ रस्त्यावर आणतो.

हंसकेतु–शपथ वाहणं हें एक प्रकारचं बंधन आहे असं शास्त्रानंच ठरवलं आहे.

कुशध्वज–ज्या शपथेच्या योगानं तुझ्या शपथा बांधल्यागेल्या आहेत अशी तूं आतां घेतलेली शपथ शास्त्राच्या विरुद्ध आहे. घेतलेली शपथ राखायला धर्म लागतो. पण तूं तर धर्माच्या विरुद्ध शपथ घेतली आहेस. इतकंच नव्हे तर तूं सध्यां पतकरलेला मार्ग उत्तम समजून, शपथेच्या भंगानं जामीनाप्रमाणें शपथ घेतली आहेस. ज्या सत्यत्वासंबंधानं शपथ घेण्याला तुला खात्री वाटत नाहीं त्याबद्दल क्रियानष्ट न होण्याबद्दल तरी शपथ वहा. नाहींतर शपथ वाहणं ही निव्वळ थट्टा होईल.

हंसकेतु–माझी शपथ क्रियानष्टतेची आहे काय ?

कुशध्वज–अलबत! क्रियानष्टतेचा पूर्णपणा झाला म्हणजे तूं वाह्यलेली शपथ कायम ठेवल्याप्रमाणेंच होईल. पूर्वींची शपथ आतांच्या शपथेशीं साम्न्याला मांडलीस, तर तुझं कृत्य तुझ्या विरुद्ध बंड करताहे असंच ठरेल–आणि असं झालं म्हणजे, तुझ्या सैन्याची तुला योग्य सिद्धता केल्याशिवाय ह्या असल्या पोकळ–अनीतीच्या–मोहमय गोष्टींवर तुला कधींच जयप्राप्ति होणार नाहीं. तुझी इच्छा असल्यास तुझ्या संरक्षणाकरतां आम्हीं ईश्वरापाशीं प्रार्थना करूं. नसेल इच्छा तर अपरिहार्य अशा आमच्या प्रखर शापाच्या तडाख्यानं जर्जर होऊन, तुला प्राण सोडावा लागेल.

मुचकुंद–हा निव्वळ शिरजोरपणा आहे.

शबलाक्ष–गप्प! एखाद्या गाढवाच्या कातड्यानं तें तोंड नाहींका बंद करतां यायचं!

हंसचूड–(हंसकेतूला) महाराज, लढाईची तयारी करावी.

स्वयंप्रभा–काय, आपल्या लग्नाच्याच दिवशीं ? ज्यांच्याशीं आपण शरीरसंबंध केला आहे त्यांच्याशींच ? लग्नाची मेजवानी मनुष्यांच्या कत्तलीनं करणार ? कानठाळ्या बसवून नरकाचा रस्ता दाखवणाऱ्या रणशिंगांचे आवाज आणि रणभेरींचा राक्षसी दुमदुमाट हींच का आपल्या लग्नसमारंभाची मंगल वाद्यं ? माझं म्हणणं ऐकायचं! जी माझी जीभ आतांपर्यंत तें नांव उच्चारायला मर्यादेनं लाजत होती तें माझ्या प्रियांचं नांव मीं कसं घेऊं ? प्रिया, मीं पदर पसरतें. माझ्या कपिध्वजमामांशीं लढायला नका उभे राहूं.

चित्रसेना–पदर पसरून पसरून माझे हात शिणले आहेत, तरी पुन्हां मी आर्जव करून म्हणतें कीं, हे सद्गुणी हंसचूड युव-

राजा, परमेश्वरानं तुझ्या मनांत जी प्रेरणा केली आहे ती बदलूं नको.

स्वयंप्रभा–बघतें आतां आपलं प्रेम कुणीकडे आहे तें! पत्नी ह्या शब्दापेक्षां महत्वाचा शब्द आपल्याला कोणचा वाटतो तें आतांच दिसून येईल.

चित्रसेना–पत्नीपेक्षां अभिमानाची योग्यता अधिक आहे. त्यानं स्वतःचं रक्षण होतं. हंसचूडा, अहंपणा सोडूं नको.

हंसचूड–(हंसकेतूला) अशा तऱ्हेच्या महत्वाच्या गोष्टींचे विचार–निश्चय करण्याविषयीं आपल्यामागें लागले असतां, आपल्या शांत चित्ताचं मला नवल वाटतं.

कुशध्वज–बस्–मी ह्याला शापच देणार.

हंसकेतु–थांबा, जरा थांबा! तसं करण्याचं कारण नाहीं. कपिध्वजराज, मीं तुमचा स्नेह सोडला.

चित्रसेना–हं, आतां मात्र आपण राजेपणाला शोभतां.

वेत्रवती–फेनपची राजसत्ता अशा तऱ्हेची अस्थिर असावी हा केवढा मूर्खपणा आहे!

कपिध्वज–असंच जर आहे तर संभाळ! राजा, तूं याच क्षणीं मेलास रे मेलास!

शबलाक्ष–'इहलोकची यांची मुदत संपली' असं चित्र-गुप्तानं लिहून धाडलं असेल, तर हंसकेतूनं राम म्हटलाच म्हणून समजावं!

स्वयंप्रभा–हायरे देवा! ह्या रक्तपातानं प्रत्यक्ष सूर्यसुद्धां त्रासून गेला आहे. आजच्या ह्या आनंदी दिवसाचा कडेलोट झाला. आतां मीं कोणच्या बाजूला जावं? दोन्ही बाजू माझ्याच आहेत. दोन्हीं बाजूंच्या सैन्याशीं माझं नातं जमलं आहे. ह्या दोन राजांच्या रागाच्या धडकींत मी सांपडलें आहें.

भोंवऱ्यांत सांपडलेल्या लुगड्याप्रमाणं माझी स्थिति झाली आहे. माझे अवयव त्यामुळें निरनिराळे तुटण्याची मला भीति वाटते. प्रिया, आपल्याला युद्धांत जय मिळावा म्हणून मला परमेश्वराची प्रार्थना करवत नाहीं. कपिध्वजमामा, आपण युद्धांत जिंकले जावे अशीही मला देवाची करुणा भाकवत नाहीं. हंसकेतुराज, आपण जे मला आतां पित्याप्रमाणें झालां आहांत त्या आपल्यालाही नशीबानं पाठबळ द्यावं असं मला म्हणवत नाहीं. आजीबाई, आपली इच्छा तृप्त होण्याबद्दल मी कशी इच्छा दाखवूं ? कुणालाही जय मिळाला तरी मी दु:खीच राहणार! ह्या लढाईचा कसाही शेवट झाला तरी माझ्या वांट्याला दु:खच येणार!

हंसचूड–प्रिये, आतां तुझं दैव माझ्याबरोबर आहे. तुझं दैव मींच आहें.

स्वयंप्रभा–जशी मर्जी! जिथें माझं दैव जिवंत राहील तिथेंच माझा प्राण जाईल.

कपिध्वज–शबलाक्षा, जा! आपल्या सैन्याची तयारी कर. (शबलाक्ष जातो.) अरे हंसकेतुराजा, माझ्या भडकणाऱ्या रागानं ह्या माझ्या देहांत जो अग्नीचा डोंब उठला आहे, त्याची शांतता तुझ्या देहांतल्या रक्ताशिवाय इतर कशानंही होणार नाहीं हें पक्कं लक्षांत ठेव.

हंसकेतु–माझ्या रक्तानं तुझा क्रोधवन्ही विझायच्या आधींच, आगीनं पेटलेला तो तुझा देह जळून जागच्याजागीं खाक होईल. स्वतःकडे नीट पहा म्हणजे तूं केवढ्या घोंटाळ्यांत पडला आहेस हें तुझं तुलाच कळेल.

कपिध्वज–वाचाळतेपेक्षां कृती करून दाखवण्यांत किंमत आहे.

(सर्व जातात. पडद्यांत लढाईची धामधूम झालेली बाहेर ऐकूं येते व **शबलाक्ष** आपल्या भाल्याच्या टोंकावर मुचकुंदाचें डोकें घेऊन येतो.)

शबलाक्ष–देवाशपथ, आजचा दिवस फारच चमत्कारिक उगवला आहे. भयंकर–विक्राळकृती करणाऱ्या मायावी पिशाच्चांनीं अदृश्यरूपानं आकाशांत मोठा गोंधळ चालवला आहे. त्यांनीं ह्या पृथ्वीवर मोठाले अनर्थ मांडले आहेत. हें मुचकुंदाचं मस्तक ह्या माझ्या भाल्यावर–हंसकेतूला ठार करीपर्यंत असंच राहणार.

(**कपिध्वज, वीरबाहू** आणि **संजीवसेन** येतात.)

कपिध्वज–संजीवसेनजी, ह्या मुलाला संभाळा. हंसकेतुराजा, ये आतां ह्याचं रक्षण करायला. अरेपण–हो–आमच्या मातोश्रींची काय हकीकत ? आमच्या तंबूवर हल्ला होऊन–त्या शत्रूच्या तर हातीं लागल्या नाहींतना ?

शबलाक्ष–महाराज, मीं त्यांची सुटका केली. सध्यां त्या सुरक्षित आहेत. भिण्याचं कारण नाहीं. फारच थोड्या श्रमांनीं आजच्या ह्या दगदगीचा शेवट गोड होणार आहे. त्या पहा आजीबाईच इकडे येताहेत.

(संरक्षकासह **वेत्रवती** येते.)

कपिध्वज–आईसाहेब, आपल्या संरक्षणाकरतां चांगले लढवय्ये घेऊन आपण मागेंच रहावं असं आम्हाला वाटतं. अरे, वीरबाहू, तुझ्या ह्या आजीबाईचं तुझ्यावर अत्यंत प्रेम असतां तूं असा दुःखी कां ? तुझा बाप तुला जितका प्रिय होता तितकंच हा तुझा चुलता तुझ्यावर प्रेम करायला तयार आहे.

वीरबाहू–(दचकून) हाय–हाय! काकासाहेब, आपल्या शक्तिप्रभावानं जर असं होईल, तर माझ्या आईचं काळीज फुटून–खाड्कन् तिचा प्राण जाईल.

कपिध्वज–शबलाक्षा, आमच्या पुढें इंद्रकीलाला जायची तयारी कर. आमच्या आखत्याराच्या पूर्ण जोरावर–आम्हीं तिथें येण्याच्या आधीं–तुरुंगांतले कैदी–कैदमुक्त कर. शिवाय, द्रव्यसंचय करणाऱ्या लोभी मठाध्यक्ष भिक्षुकांच्या थैल्याही रिकाम्या कर. शांततेच्या पुष्ट बरगड्या भुकेनं व्याकुळ झाल्या आहेत. त्यांचं पोषण केलं पाहिजे.

शबलाक्ष–आपल्या आणि देवाच्या कृपेनं–लक्ष्मी जर आपण होऊनच मला आपल्याकडे ओढते आहे, तर भिक्षुकांचे शाप, धर्मशास्त्र किंवा अपशकुन–माझं काय करणार ? सरकार, हुजूरची आज्ञा बजावायला जातों. आजीसाहेब, आजपर्यंत जर मी दक्ष राह्यलों असेन, तर फक्त आपल्याच संरक्षणासाठीं. म्हणून मी आतां आपल्याला वंदन करून आपली आज्ञा घेतों. (जातो.)

वेत्रवती–बाळ–वीरबाहू, इकडे ये. माझं बोलणं ऐक.

(**वेत्रवती** आणि **वीरबाहू** आपसांत बोलतात.)

कपिध्वज–संजीवसेनजी, इकडे या. (एकीकडे) तुमचे आमच्यावर अती उपकार आहेत. ह्या हाडामांसाच्या कुडींत जो आमचा प्राण आहे, तो तुम्हाला आपले सावकार समजतो आहे. त्याच्याविषयीं तुम्हीं आपलं जें प्रेम व्यक्त केलं आहे, तें तो सव्याज फेडण्याची इच्छा करतो आहे. मित्रा, स्वयंसिद्धतेनं तूं जी माझ्यापाशीं शपथ घेतली आहेस, ती मीं ह्या हृदयांत मोठ्या आनंदानं जतन करून ठेवली आहे. तुझा हात दे पाहूं इकडे. (त्याचा हात धरून) मला तुझ्याशीं कांहीं बोलायचं आहे; पण राहूंदे तें आतां. दुसऱ्या एखाद्या चांगल्याशा वेळीं बोलूं. संजीवसेन, परमेश्वरसाक्ष, तुमच्या संबंधानं माझ्या मनांत केवढा थोरपणा आहे तो माझ्यानं बोलून दाखवतां येत नाहीं.

संजीवसेन–हा हुजूरचा बंदाच आहे.

कपिध्वज–मित्रा, असं म्हणण्याचा जरी अजून तुला प्रसंग आला नाहीं, तरी लवकरच तसा प्रसंग येईल. काळाची गति मोठ्या झपाट्याची असल्यामुळें, तुझ्याविषयीं प्रेम दाखवण्याचा प्रसंग मला लवकरच येईल असं वाटतं. मला तुझ्या जवळ कांहीं बोलायचं आहे. पण जाऊं दे. सूर्य आकाशांत बराच दूर आहे. आणि म्हणूनच हा गर्विष्ठ दिवस एखाद्या झाकीबाज भटक्या खुशालचंदाप्रमाणें जगांतल्या ख्यालीखुशालींचे आनंदोपभोग घेत रमत चालला आहे–त्याची मला भीति वाटते. मध्यान्ह-रात्रीं घूत्कार करणाऱ्या घुबडांना आपलीं तोंडं उघडून, आतांच घूत्कार करण्याला बुद्धि देण्याची जर परमेश्वर कृपा करील, तर निशासुंदरी झोंपेंतून खडबडून उठून, ह्या दिवसाला पार पिटाळून लावील. आपण उभें आहोंत हें जर स्मशान असतं आणि तूं जर अनंत दुष्कृत्यांचा पुतळा असतास–अथवा जन्मवेड्याप्रमाणें, आहे त्याच स्थितीच्या आनंदांत गर्क न राहतां, तुझ्या त्या उदासीनता दाखवणाऱ्या जीवानं, तुझ्या देहांत स्वच्छंदानं वाहणारं रक्त जर घट्ट करून कठिण केलं असतं आणि आळसाच्या आनंदांत टवटवीत झालेले ते तुझे गाल जर काळजींतून पार पडण्याची युक्ति काढण्यांत फिक्के पडले असते, तर मोठी बहार झाली असती. मला जें तुझ्याकडून काम करून घ्यायचं आहे त्याला तुझी सध्यांची स्थिति अगदीं अयोग्य आहे. माझी सध्यांची स्थिती डोळ्यांशिवाय जर तुला दिसत असेल, तर मी सांगतों तें कानांशिवाय ऐकून, त्याचं उत्तर जिभेनं न देतां, फारच गुप्त मसलत योजून–डोळे, कान आणि गुप्त गोष्ट फोडणारे जे शब्द त्यांच्याशिवाय माझी मसलत पार पाड. तयार असशील तर बोल. मी आपले विचार तुझ्या हृदयांत आतांच सांठवून, ह्या गमत जाणाऱ्या दिवसाचा दावेदार व्हायला तयार आहें. अरेरे–पण

नको–जाऊंदे. खरं सांगतों–माझं तुझ्यावर अत्यंत प्रेम आहे. माझ्या अनुभवावरून तुझंही माझ्यावर प्रेम आहे हें मी ओळखतों.

संजीवसेन–महाराज, आपण सांगाल ती कामगिरी–आपल्या मनाप्रमाणें बजावायला हा सेवक तयार आहे. फार काय सांगूं–ती बजावीत असतां–त्यांत माझा जीव गेला तरी बेहेत्तर आहे. भगवानसाक्ष, कशीही कामगिरी असली, तरी ती मी बजावीन.

कपिध्वज—तें मी पक्कं जाणतों. माझ्या जिवलग दोस्ता, त्या पलीकडच्या कार्ट्याकडे नजर फेंक. त्याचं काय करायचं तें मी सांगतों. तोच माझ्या राजमार्गांतला भुजंग आहे. ज्या ज्या ठिकाणीं हें माझं पाऊल पडतं त्या त्या ठिकाणीं तो आडवा येतो. माझं म्हणणं आतां तुला कळलंना ? तूं त्याचा संरक्षक आहेस हें तुझ्या ध्यानांत आहेना ?

संजीवसेन—त्याच्यापासून आपल्याला कोणच्याही तऱ्हेचा त्रास न होईल असं मी करतों म्हणजे झालं.

कपिध्वज–बस्स् ! खून !

संजीवसेन –सरकारची इच्छा !

कपिध्वज–कीं लागलींच मूठमाती !

संजीवसेन–दिलीच समजा !

कपिध्वज–बस्स्! हेंच मला हवं होतं. आतां माझं मन आनंदी होईल. संजीवसेनजी, ह्या प्रेमाचा बदला मी तुम्हांला काय देणार आहें तो आतां बोलून दाखवीत नाहीं. इतकंच लक्षांत ठेवा! आईसाहेब, आपल्या संरक्षणार्थ सैनिक धाडण्याची व्यवस्था करतों.

वेत्रवती–तुला माझा पूर्ण आशीर्वाद आहे.

कपिध्वज—बाळा—विरबाहू, इंद्रकीलाला जाण्याची तयारी कर. तुझ्या सन्मानाला योग्य अशी तुझी बरदास्त ठेवण्याकरतां, हे संजीवसेन नेमले आहेत. ह्यांच्या बरोबर विक्राळ बंदराला जा.

(सर्व जातात.)

प्रवेश दुसरा.

(फेनपच्या राजाच्या तंबूत–हंसकेतु, हंसचूड, कुशध्वज आणि इतर मंडळी साचिंत बसलीं आहेत)

हंसकेतु—सभोंवारच्या महोदधींतल्या वातावरणांत, प्रचंड वादळ उद्भवून, एकत्र जमवलेलं ईर्षेचं जोरदार आरमार अशा तऱ्हेनं, एकमेकांचा स्नेहसंबंध तोडून, उध्वस्त झालं–पार रसातळाला गेलंना ?

कुशध्वज—राजा, धीरसो गंभीर. धीर धर आणि सुखी हो. अजून सर्व यथास्थित होईल. आपण मार खाऊन मागें हटलों. अंबरपूर गमावलं. आपले बरेच मित्र धारातीर्थीं पडले. आपल्या सर्व प्रयत्नांना हरवून कपिध्वज इंद्रकीलाला निघून गेला. इतकं जरी झालं आहे, तरी अजून सगळं यथास्थित होईल. मात्र धीर पाहिजे.

हंसचूड—कपिध्वजानं जें कांहीं जिंकलं आहे त्या सर्वांचं त्यानं चांगल्या तऱ्हेनं संरक्षण केलं आहे. अशा भयंकर राजकारणांत इतक्या दूरदर्शीपणानं उत्तम टापटीप ठेवलेलं ह्या तऱ्हेचं एकही उदाहरण पाहण्यांत अगर ऐकण्यांत नाहीं.

हंसकेतु—अशानं आमची लाज मात्र व्यक्त होत आहे. (पाहून) पण हें पहा–इकडे कोण येत आहे; हा तर प्रत्यक्ष चितेवर ठेवलेला आत्माच इकडे येतो आहे. हिच्या अंगीं शक्ति नसतांही हिनं शाश्वत अशा आत्म्याला, त्याच्या संमतीशिवाय, आपल्या देहांतल्या शोकग्रस्त हवेंत मुद्दाम कोंडून ठेवला आहे.

(चित्रसेना येते.) चित्रसेनाताई, मी तुम्हांला सांगतों, कृपाकरून तुम्हीं माझ्याबरोबर चला.

चित्रसेना–पहा–नीट पहा ! आतां आपल्या शांततेचं फळ पहा.

हंसकेतु–सुशीले, चित्रसेने–धीर धर. शांत हो.

चित्रसेना–नाहीं. आतां सगळ्यांचे उपदेश मला तुच्छ आहेत. सर्व उपदेशांचा शेवट लावणारा आणि माझी खरी सुटका करणारा आतां एक मृत्युच आहे. अहाहा! किती तरी पण तो माझ्या जिव्हाळ्याचा आहे! काळा, तूं नरककुंडासारखा जरी आहेस तरी मला नंदनवनासारखाच भासतोस. तुझी मूर्ति–कुचकी जरी आहे तरी ती मला सर्वोत्तम वाटते. गळफास घालणाऱ्या दीर्घसूत्री रात्रीच्या सपाट्यांतून जागा होरे बाबा ! तूं वैभवद्वेष्टा असल्यामुळें तें तुला भिताहे. मित्रा, चल ये ! तुझ्या त्या बेचव हाडांना मला आलिंगन देऊंदे. तुझ्या अस्थिपंजराच्या डोळ्यांच्या खळग्यांत मी आपलीं बुबुळं बसवतें. तुझ्या सलगीचे नेहमींचे जे किडे त्यांची ह्या बोटांत आंगठी घाल. अरे काळा, फार तर काय–चल ये–मी तुझ्याशीं लग्न लावायला तयार आहें. तुझ्याशीं माझं एकदां लग्न लागलं–म्हणजे ही श्वासनलिका घाणेरीनं बंदकरून, चहूंकडे तुझ्यासारख्या मुडदाडाप्रमाणें हिंडायला लागेन. ये–मित्रा–ये ! मला एकदां आलिंगन दे आणि माझ्यावर एकदां–खिस–म्हणजे तूं माझ्याकडे पाहून प्रेमानं हंसतो आहेस असं मी समजेन. दैन्यमित्रा, ये–लवकर ये आतां ! दे एकदां मला आलिंगन.

हंसकेतु–हे सुकुमार–दुःखी स्त्रिये, शांत हो.

चित्रसेना-नाहीं, नाहीं ! माझ्या देहांत जीव असतां मी शांत होऊं ? माझ्या जिभेला मेघांचा गडगडाट करायची जर

शक्ति असती तर मीं सगळ्या जगाला हालवून सोडलं असतं. इतकंच नव्हे तर स्त्रीच्या दुर्बळ आवाजाकडे दुर्लक्ष करणारा आणि साधारण धाव्याचा तिरस्कार करणारा जो यमाजी भास्कर त्यालाही जागा केला असता.

कुशध्वज—बाई, तुमचे हे दुःखाचे विलाप नसून वेडेपणाचं बरळणं आहे.

चित्रसेना—मला वेडी म्हणणारे तुम्ही ढोंगी आचार्य असलां पाहिजे. मी मुळींच वेडी नाहीं. हे पहा—हे उपटतें आहें हे कैंस माझेच आहेत. माझंच नांव चित्रसेना. अजीतसिंहांचीच मी धर्मपत्नि. वीरबाहू बाळ माझा मुलगा आहे. पण आतां त्याचं काय? तो संपला! मी वेडी नाहीं हें पक्कं लक्षांत ठेवा. वेडी असतें तर फार नामी झालं असतं. मी जर तशी असतें तर स्वतःला विसरून दुःखालाही विसरलें असतें. तुमच्यांत जर कांहीं शक्ति असेल तर तुमच्या तत्वज्ञानाच्या उपदेशानं मला वेडी करा आणि साधूंच्या माळेंतले मेरुमणि व्हा. मी वेडी नाहीं म्हणूनच माझं दुःख मला कळलं आहे. मी वेडी नसल्यामुळेंच माझं अंतःकरण दुःखहोण्याजोगं कोंवळं आहे. त्यांतून पार पडण्याकरतां माझं ज्ञान मला गळफांस घेऊन प्राण देण्याचा धडा शिकवतं आहे. मी जर वेडी असतें तर मी आपल्या मुलाला विसरलें असतें. मी त्याला जिनगराच्या घरचं चिंध्यांचं बाव्हलं समजलें असतें. वेडी नाहीं म्हणूनच मला विशेष अनर्थांचे जबरदस्त धक्के—पक्के ओळखतां येतात.

हंसकेतु—तें असो. पहिल्यानदां ते आपले मोकळे सुटलेले केस व्यवस्थित एकत्र बांधा. अहाहा! हे पाठीवर आणि हृदयावर रुळणारे कुरळकुंतल किती तरी वर्णनीय सुंदर आहेत! दैववशांत त्यांवर एकच रुपेरी अश्रुबिंदु पडला आहे. दैवाच्या

दुष्ट फेऱ्यांत सांपडले असतां, जे अनर्थकाळींही विभक्त होणारे नव्हेत अशा विश्वासु मित्रांप्रमाणें, एका केंसाशीं ते हजारों केंस स्नेह्यांप्रमाणें चिकटून, एकमेकांचे जिवलग झाले आहेत. ते एकरूप होऊन राहिले आहेत असं दिसतं.

चित्रसेना–असं दिसत असेल तर जा–ह्यानांच घेऊन इंद्र-कीलाला जा. हेच कपिध्वजाची खोड मोडतील.

हंसकेतु–पण आधीं ते आपले केस बांधा पाहूं.

चित्रसेना–बांधतें; पण कां बरं बांधावे? हे केस जेव्हां मी मोकळे सोडले तेव्हां मी मोठ्यानं ओरडून असं बोललें होतें कीं, 'हे हात जसे ह्या केंसाना स्वातंत्र्य देताहेत तसेच माझ्या बाळालाही देतील. पण मी आतां त्यांच्या स्वातंत्र्याचा हेवा करतें. मी हे केंस आतां पुन्हां बांधतें. कारण माझा मुलगा बांधला गेला आहे. (केंस बांधतांना) आचार्यमहाराज, 'आपल्याला अंतरलेले स्नेही–आपल्याला स्वर्गांत भेटतात.' असं आपण बोललेलं मला आठवतं. ते आपले शब्द जर खरे असतील तर मी आपल्या बाळाला पुन्हां खचित भेटेन. सृष्टीमध्यें जो मुलगा पहिला उत्पन्न झाला त्याच्यासारखे आजपर्यंत पुष्कळ झाले पण ह्याच्या सारखं दुसरं मूल जन्मलंच नाहीं. त्या माझ्या कळीला पुष्पनाशी किड्याप्रमाणें दुःखरूप किडा आतां कुरतडून खाईल. त्याच्या त्या सुंदर गालांवरच्या गुलाबी छट्यांनां तो हरण करील. नंतर तो माझा बाळ भुतासारखा अस्थिपंजर होऊन, विषमज्वऱ्या-प्रमाणें कृश आणि विद्रुप होईल. शेवटीं देव त्याला आपल्या घरीं नेईल. तो देवाच्या घरीं गेल्यावर मी जेव्हां तिथें जाईन तेव्हां तशा त्या भयाण स्थितींत मी त्याला कसा ओळखीन? म्हणून म्हणतें–नाहीं हो–नाहीं. तो माझा वीरबाहूबाळ आतां दृष्टीस पडणं नाहीं.

कुशध्वज–अशातऱ्हेनं त्या घाणेऱ्या दुःखाला वश होणारे प्राणी पापी असतात.

चित्रसेना–ज्यांची पुत्रप्रेमाशीं ओळख नसते त्यांचेच असे उद्गार निघतात.

हंसकेतु–मुलगा आणि दुःख ह्या दोहोंवर तुमचं अगदीं एकसारखं प्रेम आहे.

चित्रसेना–ह्यांत काय संशय! माझ्या सोन्याची सगळी जागा त्या दुःखानंच आडवली आहे. तें माझ्याजवळ अंथरुणांत निजतं. मी जाईन तिकडे तें माझ्याबरोबर फिरतं. त्याची तें स्पष्ट गोड मुद्रा दाखवतं. त्याचंच बोलणं बोलतं. प्रत्येक बाबतींत वीरबाहूच मी आहें अशी तें मला आठवण देतं. इतकंच नव्हे तर त्याचे कपडे घालून तें माझ्यापुढें त्याच्याच ऐटीनं उभं राहतं. सांगा तर मग–दुःखावर प्रेम करायला मला कारण आहे ना? तुम्हीं सुखी असा. मी येतें आतां. पण एवढं लक्षांत ठेवा–माझ्याप्रमाणेंच तुमचं नुकसान झालं असतं तर तुम्ही मला देतांहात त्यापेक्षां मी तुम्हांला जास्त सुख दिलं असतं. पण जाऊंदे तें. माझ्या बुद्धींतच जर सध्यां अव्यवस्था झाली आहे तर मी माझे केंस तरी व्यवस्थित कां ठेवीन? (झिंजा पसरून) हे करुणाघना, दुःखहारका, धांव आतां? माझा तान्हा, माझा वीरबाहू, माझा लाडका, माझा जीव, माझा आनंद, माझं अन्न, माझं सगळं जग, ह्या विधवेचं सौख्य, माझ्या दुःखाचं उपशमन! थांबा! वीरबाहू, आलेंच मी तुझ्याकडे (झपाट्यानं जाते.)

हंसकेतु–भय ओढवण्याची भीति वाटते. मागोमाग जावं हें बरं! (जातो.)

हंसचूड–मला आनंद देणारं असं आतां ह्या जगांत कांहींच नाहीं. झोंपी जाणाऱ्या माणसाचे आळशी कान–जसे एखादी लांबलचक शुष्क गोष्ट पुन्हां ऐकण्याला त्रासतात–तसाच माझा जीव मला त्रासदायक झाला आहे. तीक्ष्ण–कठोर लज्जेनं ह्या जगाच्या रमणीयतेची बेचव झाली आहे. म्हणूनच तें लज्जा आणि दुःखातिरेक ह्यांशिवाय कोणाला कधीं नम्र होत नाहीं.

कुशध्वज–एखादा भयंकर रोगी बरा करण्याचे उपाय सुरू असतां तो जरी बरा झाला, तरी त्यावेळेपासून त्याची अगदीं पूर्वस्थिति येईपर्यंत त्याच्या त्या रोगाच्या उद्भवाचं भय असतंच. अंगांत येणारीं भुतं घालवण्याचा मांत्रिक प्रयत्न करीत असतां, तें अंगांतून जातां जातां भेडावतंच. त्याच प्रमाणें आजच्या तुझ्या अपजयाचं आहे. त्यापासून तुझं नुकसान काय झालं आहे ?

हंसचूड–वैभवाचे दिवस, आनंद आणि सौख्य–सर्व कांहीं–पार–रसातळाला गेलं.

कुशध्वज–तुला जर आज जयप्राप्ति झाली असती तर हें सर्व तुला मिळालं असतं असंच ना ?

हंसचूड–ह्यांत काय संशय ?

कुशध्वज–नाहीं तूं चुकतोस ! बाबारे, ह्या प्रारब्धाच्या मनांत जेव्हां एखाद्याला मोठा माणूस बनवायचं येतं तेव्हां तें त्याच्यावर मोठ्या धमकीच्या दृष्टीनं पहात असतं.

हंसचूड–कपिध्वजानं आज जो जय मिळवला त्यानं त्याचा केवढा फायदा झाला आहे ह्याचा तुम्ही विचार केला आहे का ?

कुशध्वज–त्यानं वीरबाहूला कैद केलं ह्याबद्दल तुला दुःख नाहींका झालं ?

हंसचूड–अलबत्–त्याचा जेवढा आनंद तेवढंच माझं दुःख.

कुशध्वज–तुझ्या इतकंच तुझं मन तरुण आहे. आतां माझा भविष्यवाद ऐक. कारण, माझ्या ध्वनीच्या प्रत्येक उच्चारानं इंद्रकीलच्या सिंहासनावर तुला सरळ जाऊन बसण्याकरतां मध्यें रस्त्यांत येणाऱ्या सर्व गोष्टी बाजूला होणार आहेत. म्हणून म्हणतों–नीट लक्ष दे! कपिध्वजानं वीरबाहूला कैद केलं आहे. जोंपर्यंत त्या बालकाच्या देहांत कढत रक्त वाहताहे तोंपर्यंतचं प्रत्येक पळ त्या अन्यायी कपिध्वजाला गोड वाटणार नाहीं. ज्या त्याच्या अनाधिकारी हातांनीं ज्या मार्गानं राजदंड हिसकावून घेतला आहे, त्याचं रक्षण करायला त्याला तोच अन्यायाचा मार्ग स्वीकारला पाहिजे. ज्या जागेवरून घसरून पडण्याचा संभव आहे अशा जागेवर कपिध्वज उभा आहे. तिथून घसरून पडण्याची त्याला फार भीति वाटते आहे. त्याच जागीं जर कपिध्वज उभा राह्यचा असेल, तर वीरबाहूला पडलंच पाहिजे. आणि तो पडणार हें खास. कारण, तसं झाल्याशिवाय राहणं शक्यच नाहीं.

हंसचूड–वीरबाहूच्या पडण्यापासून मला काय फायदा?

कुशध्वज–तूं आपल्या स्वयंप्रभा पत्नीच्या तर्फेनं वीरबाहूप्रमाणें इंद्रकीलच्या सिंहासनावर वारसा दाखीव म्हणजे झालं.

हंसचूड–वारसा दाखवून सर्वस्वाला मीं मुकावं–असंच ना?

कुशध्वज–इतक्या जुनाट आणि अनुभवज्ञ जगांत तूं एवढा मोठा झाला असतां, अद्याप इतक्या सरळ स्वभावाचा कसा? कपिध्वजानं तुझ्या लग्नांत तुला कांहीं जमीनी अंदण दिल्या आहेत, आणि हीच वेळ तुला अनुकूळ आहे. ज्या योग्य कुटुंबाच्या सल्यानं त्यानं आपलं रक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे–तेंच त्याला भयंकर आणि खोटं वाटायला लावायची वेळ हीच आहे.

हंसचूड–असं करण्याचा जर मीं प्रयत्न केला, तर त्याच्या दुष्कृत्यामुळें त्याच्यावर दांत ओठ खाणाऱ्या त्याच्या प्रजेचीं मनं शांत होतील काय?

कुशध्वज–इतकंच नव्हे तर त्यांचा उत्साह प्रदीप्त होईल. त्यांची शक्ति मर्यादित करायला येणाऱ्या प्रसंगावर ते तुटून पडतील. मेघाच्छादित आकाश, परमेश्वराची इच्छा, वादळाचा दिवस, सामान्य वारा किंवा एखादा चमत्कारिक प्रसंग वगैरे कांहींएक नसतां, ह्याच सर्व गोष्टी कपिध्वजाची स्वाभाविक इच्छा हाणून पाडतील. हेच सर्व प्रकार, उल्कापात, धूमकेतु, गर्भपात, दुःशकुन, आकाशवाणी इत्यादि होऊन–उघडपणें कपिध्वजाचा सूड उगवण्याला कारणीभूत होतील.

हंसचूड--वीरबाहू–तुरुंगांत कैदी असल्यामुळें, आपण सुरक्षित आहों असं मानून, कदाचित कपिध्वज त्याच्या शरीराला धक्का लावणार नाहीं.

कुशध्वज–युवराज, आपण तिथें जाऊन पोंचण्याची बातमी कपिध्वजाला कळेल त्यावेळीं वीरबाहू जर मेला नसेल तर तो तत्क्षणीं, आपल्या आगमनाच्या बातमीबरोबर मेलाच समजा.

हंसचूड–ह्या कृत्याची प्रसिद्धि झाल्यावर कपिध्वजाच्या प्रजेचीं मनं त्याच्या विरुद्ध बंडाळीं करूं लागून, त्याच्या हातून घडलेल्या अघोर कृत्याबद्दलच्या रागानं तीं संतप्त होतील आणि त्याच पायावर बंड उभारतील काय ?

कुशध्वज–इतकंच नव्हे तर त्याचं त्रासदायक राज्य बदलल्यावर जें नवं अपरिचित राज्य होईल, त्याचे ते लोक खुषीनं बंदीजन होतील. हा घोंटाळा होण्याची वेळ अगदीं समीप आली आहे. तुझा तुला फायदा करून घेण्याची हीच वेळ आहे.

हंसचूड–तो राजाचा लेंकावळा शबलाक्ष सध्यां इंद्रकीलां-तील धार्मिक मठांची द्रव्याकरतां लूट करीत असून, त्यानं धर्माचा छल चालवला आहे. तेव्हां ह्यावेळीं तिथल्या प्रजेचीं मनं राजाच्या विरुद्ध होण्याचा पूर्ण संभव दिसतो खरा.

कुशध्वज–ज्या प्रमाणें बर्फाच्या एका तुकड्याला हजारों तुकडे चिकटून शेवटीं त्याचा डोंगर होतो–त्याप्रमाणें आपल्या देशांतले दहापांच लोक जरी इंद्रकीलांत गेले तरी ते तिथले लाखों लोक आपल्या पक्षाकडे ह्यावेळीं ओढून घेतील. म्हणून शूर युवराज, चला माझ्या बरोबर राजाकडे. त्यांचीं हृदयं अप-राधांनीं तुडुंब भरलीं आहेत. त्यांच्या असंतोषाचा काय परि-णाम होईल तो नकळे. इंद्रकीलाला जाण्याची तयारी कराच. मी हंसकेतू राजाचं मन वळवतों.

हंसचूड–सबळ मुद्दे–सबळ परिणाम करतात. आपल्या संमतीला महाराज नकार देणार नाहींत. [जातात]

अंक तिसरा समाप्त.

अंक चवथा.

प्रवेश पहिला.

[किल्यांतील खोली. **संजीवसेन** आणि दोघे मारेकरी येतात.]

संजीवसेन–जा–ह्या लोखंडाच्या सळया तापवून आणा. आणि दरवाजाच्या बाहेरच उभे रहा. ह्या (वसुंधरेच्या उद-रावर) भूमीवर मी आपला पाय जोरानं धाडकन आपटल्या-बरोबर एकदम आंत या. माझ्या जवळ जो कुमार तुम्हाला दिसेल त्याला त्या खुरचीशीं घट्ट बांधा. सावध रहा. जा–पहारा करा.

प० मारेकरी–आपल्या हुकुमाचा कार्यभाग न्यायाचा होवो म्हणजे झालं.

संजीवसेन–मूर्ख आहेस. भिण्याचं कांहीं कारण नाहीं. जा–सावध रहा. (मारेकरी गेल्यावर) वीरबाहू, चल, इकडे ये. मला तुझ्याशीं कांहीं बोलायचं आहे. (वीरबाहू येतो.)

वीरबाहू–संजीवसेनजी, काय काम आहे ?

संजीवसेन–बाल-राजपुत्रा, इकडे ये.

वीरबाहू–राजपुत्रापेक्षां मोठ्या पदवीचा मला हक्क अस-तांनाही सध्यां माझी स्थिति जितकी क्षुद्र म्हणवेल तितक्या क्षुद्र राजपुत्राची आहे. पण तुम्ही असे दुःखी कां ?

संजीवसेन–छे ! मी खरोखर आनंदी होतों.

वीरबाहू–माफ करा. माझ्याशिवाय कोणीही दुःखी नसावं असं मला वाटतं. मला आठवतं, मी जेव्हां फेनपदेशांत होतों त्यावेळीं तिथले कांहीं तरुण लोक मात्र कुटिलतेनं रात्री-प्रमाणें दुःखी असत. ईश्वरसाक्ष, मी राजपुत्र म्हणून तुरुंगांत

राहण्यापेक्षां एखाद्या धनगराचा मुलगा म्हणून रानांत मेंढरं राखीत असतों, तर ह्या स्वच्छंदी-चैनी दिवसाप्रमाणें आयुष्य-भर आनंदांत राह्यलों असतों. तसं मला इथेंही राहतां आलं असतं. पण संशय येतो. माझा चुलता, माझा नाश कर-ण्याच्या खटपटी करीत असला पाहिजे. तो मला भितो आणि मी त्याला भितों. मी अजितसिंह राजाचा मुलगा झालों हा माझा अपराध आहे काय? नाहीं-खचित् नाहीं; पण त्यापेक्षां मी तुमचा मुलगा झालों असतों तर फार बरं झालं असतं. तुमचं माझ्यावर पुत्राप्रमाणें प्रेम आहे हें मी ओळखतों.

संजीवसेन-(स्वगत) मी जर ह्याच्याशीं बोलेन तर ह्या बालकाच्या निरुपद्रवी लाडक्या बोलांनीं, माझ्या हृदयांत मरून पडलेली दया जीवंत होईल. छेः जलदीनं काम उरकलं पाहिजे.

वीरबाहू-संजीवसेनजी, आपल्याला काय होतं आहे? तुम्हीं आज असे उदासीन कां? खरंच, तुम्हीं जरा आजारी आहांत असं मला कळलं असतं, तर रात्रभर मी तुमच्याजवळ जागत बसलों असतों. तुम्हांला खास सांगतों, तुम्हीं माझ्यावर करता त्यापेक्षां मी तुमच्यावर अधिक प्रेम करतों.

संजीवसेन-(स्वगत) ह्याच्या बोलण्यानं माझं हृदय द्रवू लागलं. छेः-तें उपयोगी नाहीं. (उघड) वीरबाहू, हें वाच! (पत्र देतो व स्वगत) अश्रूनों, केवढा हा तुमचा मूर्खपणा आहे? तुम्हीं आपली जागा सोडून बाहेर धांवण्याचं कारण काय? तुमच्या दर्शनानं ह्या माझ्या हृदयांत निष्ठुरतेच्या जागीं दया उत्पन्न होते. पण सध्यां तर मला तिचा गंधही नको आहे. माझं काम मला लवकरच आटपलं पाहिजे. हे माझ्या डोळ्यांतून धांवणारे घातकी अश्रू माझा दृढनिश्चय ढळवणार. (उघड) वीरबाहू, तुला वाचतां येत नाहीं? तें स्वच्छ लिहिलेलं नाहीं?

वीरबाहू–अगदीं स्वच्छ आहे. ह्यांतल्या दुष्ट मतलबाला इतकं स्वच्छ लिहिणं शोभत नाहीं. लोखंडाच्या तापलेल्या सळयांनीं माझे दोन्ही डोळे तुम्हाला फोडलेच पाहिजेत काय?

संजीवसेन–बालका, यांत काय संशय?

वीरबाहू–काय, तुम्ही माझे डोळे फोडणार?

संजीवसेन–अलबत्.

वीरबाहू–तुमची तसं करण्याची छाती होईल? तुमचं कपाळ दुखत होतं तेव्हां मींच आपल्या हातरुमालानं तें बांधलं होतं ना? एका राजकन्येकडून प्रेमाची खूण म्हणून मला मिळालेला तो उत्तम नकशीचा मोलवान हातरुमाल मीं पुन्हां तुमच्या-जवळ परत मागितला आहे का? मध्यरात्रीच्या सुमाराला तुमचं डोकं मींच चेपीत बसलों होतों ना? त्यावेळीं तुमचा प्रत्येक क्षण आनंदांत जावा म्हणून, मी किती झटत होतों! 'आपली तब्येत कशी आहे? आपल्याला बरं वाटतं का? आपलं कपाळ दुखायचं कारण काय? आपल्याला शांतता मिळण्याचे कोणचे उपाय करूं?' असं जें मीं तुम्हांला ममतेनं विचारीत होतों, तुमची बरदास्त उत्तम ठेवीत होतों–तें तुम्हांला आठवत नाहीं का? तशा प्रसंगीं तुमच्यापाशीं गरीबांची जरी मुलं असतीं, तरी त्यांनीं माझ्याप्रमाणें तुमच्याशीं प्रेमाचं भाषण कधींच केलं नसतं. तुमच्या शुश्रूषेला राजपुत्र होता. तें माझं प्रेमाचं वर्तन कपटाचं मानून, मला लबाड म्हणायचं असेल तर खुशाल म्हणा. माझ्या प्रेमाचा मोबदला म्हणून–तुमच्याकडून माझा प्राण घेण्याची जर परमेश्वराची इच्छा असेल, तर बेलाशक माझा प्राण घ्या. तो तुम्ही घेतलाच पाहिजे. ज्या डोळ्यांनीं तुम-च्याकडे कधीं अमर्यादेनं बघितलं नाहीं असे हे माझे डोळे तुम्ही फोडणार ना?

संजीवसेन–मीं तसं करण्याची शपथ घेतली आहे. लोखंडाच्या तापलेल्या सळयांनीं ते मला जाळून फोडलेच पाहिजेत.

वीरबाहू–हाय–हाय! या कलियुगांतच असं साहस मनुष्याच्या हातून होणं शक्य आहे. स्वतः तापलेलं लोखंड सुद्धां ह्या डोळयांजवळ आलं असतां, हे निरपराधी अश्रु पिऊन तें शांत होईल. इतकंच नव्हे तर ह्या माझ्या डोळयांना इजा करण्याच्या ऐवजीं, तें गंजून नाश पावेल! संजीवसेनजी, तुमचं मन घडीव लोखंडापेक्षांही कठीण आहे काय? माझे डोळे, संजीवसेन लोखंडाच्या तापलेल्या सळयांनीं फोडणार आहेत असं मला एखाद्या देवदूतानं जरी सांगितलं, तरी तें तुम्हीं स्वतः मला सांगितल्याशिवाय मीं कधीं खरं मानलं नसतं.

संजीवसेन–चल–असा पुढें ये. (पाय आपटतो. दोरी, तापलेल्या लोखंडाच्या सळ्या वगैरे मारेकरी आणतात.) हं सांगितल्याप्रमाणें करा.

वीरबाहू–संजीवसेनजी, नका हो नका! तुम्हींच माझं रक्षण करा! ह्या रक्तपाती मारेकऱ्यांच्या राक्षसी मुद्रा पाह्यल्याबरोबर माझे डोळे फुटले.

संजीवसेन–एँ–आण इकडे त्या सळया! बांधा त्याला तिथें.

वीरबाहू–हर हर! इतक्या कठोरतेचं कारण काय? हालचाल न करतां मी पाषाणासारखा स्वस्थ उभा राहतों. संजीवसेनजी, निदान परमेश्वराच्या भीतीनं तरी मला बांधू नका. माझी प्रार्थना ऐका! ह्या दोघांना इथून घालवा! गरीब मेंढराप्रमाणें स्वस्थ बसतों. एका जागेवरून रतिमात्र हलायचा नाहीं. एक चकार शब्द तोंडांतून काढायचा नाहीं. रागानं सुद्धां बघायचा नाहीं. किंवा होणाऱ्या वेदनांना भिऊन अंगावर उठणाऱ्या शहाऱ्यांनीं अंग चोरायचा नाहीं. पण ह्या

दोघांना इथून घालवा. तुम्ही स्वतः हवेतितके माझे हाल करा. त्याबद्दल मी तुमच्यावर यत्किंचितही रागावणार नाहीं.

संजीवसेन–जा तुम्हीं दोघे–बाहेर उभे रहा!

प० मारेकरी–असलं कृत्य करण्याचं नशीबीं येण्याचं टळलं हें पाहून मला अतिशय आनंद होतो आहे. (दोघे मारेकरी जातात.)

वीरबाहू–अरेरे! मीं त्यांना विनाकारण दोष दिला. त्यांची दृष्टि क्रूर होती पण हृदय मृदु होतं. बोलवा–त्या दोघांना परत बोलवा! त्यांची दयार्द्रता तुमच्या दयाळूपणाला जिंवत करूंद्या.

संजीवसेन–चल–तयार हो!

वीरबाहू–ह्यांतून मुक्त होण्याला कांहीं उपाय नाहींना?

संजीवसेन–डोळ्यांची आहुती दिल्याशिवाय कांहीं नाहीं!

वीरबाहू–परमेश्वरा, कोण हा तुझा क्रूरपणा! तुमच्या डोळ्यांत एखादं मुरकुट, मातीचा कण, किंवा कस्पट किंवा खुपणारा कांहींही पदार्थ या वेळेस गेला असता तर फार बरं झालं असतं. कारण, असा यत्किंचित् पदार्थसुद्धां डोळ्यांनां किती इजा करतो याचा अनुभव तुम्हांला येऊन, तुमचा हा दुष्ट हेतु तुम्हाला भयंकर भासला असता.

संजीवसेन–बस्–वटवट पुरे कर. आपलं वचन असंच पाळणार वाटतं?

वीरबाहू-संजीवसेनजी, हे माझे डोळे कायम राखण्याकरतां शेंकडो जिभांचीं वेटोळीं जरी वकीली करूं लागलीं, तरी देखील पुरीं होणार नाहींत हो! मग ही माझी जीभ मीं कशी बंद करूं? मर्जी असेल तर डोळे फोडण्याच्या ऐवजीं हिलाच कापून टाका. नका हो माझे डोळे फोडूं! त्यांचा दुसरा जरी कांहीं उपयोग नसला तरी तुमच्यासारखे पुरुष निरखण्याकरतां ते कायम ठेवा! त्या पहा–त्या लोखंडाच्या सळयासुद्धां माझ्या विनवणीनं गार झाल्या. आतां त्या मला त्रास देणार नाहींत.

संजीवसेन–मी ह्या पुन्हां तापवीन.

वीरबाहू–नाहीं, तसं करणं चांगलं नाहीं. निवळ चैनी-करतां अयोग्य उपयोगाकडे हा अग्नि लावायचा होता हें पाहून तो सुद्धा दुःखानं गतप्राण झाला. त्याची उत्पत्ति सुखाकरतां आहे. हें पहा–त्या प्रदीप्त निखाऱ्यांत कोणचीही द्वेषबुद्धी नाहीं. जें दुष्कर्म करायला त्याला इथें आणला होता त्याबद्दलच्या पश्चात्तापाची राख त्यानं आपल्या अंगाला फासली आहे. तो देवाच्या कृपेनं सध्यां कसा अदृश्य होऊन पडला आहे पहा!

संजीवसेन–अरे पोरा, मी त्याला फुंकून फिरून जिवंत करीन, समजलास!

वीरबाहू–असं जर तुम्हीं कराल तर तुम्हीं आपल्या पुढच्या कृत्यानं ह्याला लज्जेनं लाल कराल. मारुतीची शेपटी पेटवतांना रावणाच्या दाढीमिशा जशा जळाल्या होत्या त्याप्रमाणें तो विस्तव पुन्हां फुंकर मारून पेटवतांना त्याच्या ठिणग्यांनीं तुमचे डोळे फुटण्याची भीति आहे. माझ्या नाशाकरतां ज्याज्या वस्तूंचा तुम्हीं उपयोग करूं पहाल त्या त्या सर्व ह्या विस्तवाप्रमाणें आपापले कठोर धर्म विसरून, माझ्यापुढें लीनच होतील. क्रूर कर्म करण्यांत प्रसिद्ध अशा अग्नींत व लोखंडांत जी दया आहे ती तुमच्यांतच फक्त दिसत नाहीं.

संजीवसेन–जा–जिवंत रहा! मी तुझ्या डोळ्यांना स्पर्श करणार नाहीं. तुझ्या चुलत्यानं आपली सर्व संपत्ती जरी मला देऊं केली तरी ह्या लोखंडाच्या प्रज्वलित सळयांनीं मी तुझे डोळे फोडणार नाहीं. तुझे डोळे फोडण्याची मी जरी शपथ घेतली होती तरी कांहीं हरकत नाहीं–जा.

वीरबाहू–आतां मात्र तुम्हीं संजीवसेन ह्या नांवाला शोभतां. इतका वेळ तुमचा वेष निराळा होता.

संजीवसेन–आतां अधिक बोलूं नकोस. तूं मेलास असंच तुझ्या चुळत्याला समजलं पाहिजे. मी आतां हेरांकडून तूं मेल्याची बातमी पसरवतों. जा–स्वस्थ घोरत पड. ह्या संजीवसेनाला सगळ्या जगांतलं जरी द्रव्य मिळालं, तरी हा आतां तुला लवमात्र धक्का लावणार नाहीं हें पक्कं लक्षांत ठेव.

वीरबाहू–संजीवसेनजी, परमेश्वर तुम्हांला कांहीं कमी करणार नाहीं. माझ्यावर तुमचे अनंत उपकार आहेत.

संजीवसेन–आतां अधिक बोलण्यांत वेळ घालवणं चांगलं नाहीं. माझ्याबरोबर आंत मुकाट्यानं चल. तुझ्याकरतां मला बऱ्याच धोक्यांत पडावं लागणार आहे.

(जातात.)

प्रवेश दुसरा.

[इंद्रकीलचा राजवाडा–कपिध्वज, सुभानु, वृषसेन, वगैरे मंडळी बसलीं आहे.]

कपिध्वज–ह्या सिंहासनावर पुन्हा एकवार आम्हीं बसलों. पुन्हां एकवार राजमुगुट धारणकरून आनंदीदृष्टीनं सर्वत्र अवलोकन करीत आहों.

सुभानु–"पुन्हा एकवार!" या शब्दांपासून आपल्यास आनंद होतो आहे खरा, पण ह्याची कांहीं जरूर नव्हती. तें प्रचंड वैभव आपल्यापासून हिसकावून घेण्याचे कोणी प्रयत्न केले नव्हते. बंडखोरीच्या डागानं प्रजेचा विश्वास भ्रष्ट झाला नव्हता. त्यावेळची वस्तुस्थिति बदलण्याजोगं वावटळ राज्यांत उठलं नव्हतं.

वृषसेन–अस्सल सोन्याला मुलामा देणं, कमलाला रंगवणं, पाटलपुष्पावर अत्तर ओतणं, बर्फ मृदु करण्याचा प्रयत्न करणं

अथवा इंद्रधनुष्यांत नवा रंग मिळवणं–इतकंच नव्हे तर–भर दिवसां दिवटी पाजळून सूर्याला शोधीत फिरणं–ह्या गोष्टी जशा निरर्थक आणि हास्यास्पद होणार आहेत–तद्वतच आपलं जें पूर्वींचंच वैभव मोठं आहे तें पुन्हां नव्या थाटानं दाखवणं हेंही निरुपयोगीच होणार आहे.

सुभानु–हुजूरच्या इच्छेप्रमाणें हा राजकीय थाट झालाच पाहिजे, हें जरी खरं आहे, तरी हें कृत्य म्हणजे जुनी गोष्ट नव्यानं सांगण्यासारखं आहे. जी जुनी गोष्ट ऐकण्याची आवश्यकता नसते ती गोष्ट पुन्हां ऐकणं बरंच कंटाळवाणं होतं.

वृषसेन–ह्या अशा नव्या थाटानं चांगली ओळखीची, पुरातन, साधी, सुरेख–मुखश्री विनाकारण कुरूप होते. अशा करण्यानं विचारगतीचा रस्ता सुटतो. मुद्दाम हवा भरलेल्या अवजाराप्रमाणें ती चोहोंकडे सैरावैरा धांवूं लागते. समजूत भयाश्चर्यचकित होते. चांगलं मन रोगी होतं. सत्याचा संशय येतो. म्हणून हा नवा थाट त्याज्य आहे.

सुभानु–गाबडं मारायच्या पूर्वीं तडा लहान असतो. पुढें तो तें मारून बुजवतांना मोठा होतो. नेहमींपेक्षां जास्त कुशलता दाखवण्याचा जेव्हां कारागीरलोक प्रयत्न करतात, तेव्हां कोणाच्याही कुशलतेनं सुधारलं जाणार नाहीं असं स्वतःच्या लोभानं ते आपलं काम बिघडवून ठेवतात. त्या अपराधाबद्दल ते कांहीं तरी सबब सांगून–सबबीनंच अपराधाचं स्वरूप हिडिस करतात.

वृषसेन–महाराजांनीं आज जो हा नव्यानंच राज्याभिषेक करून घेतला त्याच्या आधींच आम्हीं महाराजांना अशी सल्ला दिली होती. महाराजांनीं तिच्याकडे दुर्लक्ष्य केल्यामुळें आमचा नाइलाज झाला. तेव्हांपासून आपण आमच्याविरुद्ध रस्ता धरल्यामुळें आम्हाला आपल्या इच्छेला मान देऊन स्वस्थ बसावं लागलं.

कपिध्वज–आमच्या ह्या नव्या राज्याभिषेकाचीं जीं कारणं तुम्हांला माहीत आहेत त्यांपेक्षां दुसरीं कांहीं विशेष सबळ आहेत. सध्यां जीं कांहीं संकटं आम्हांला भेडावताहेत तीं नाहींशीं झाल्यावर आम्हीं तीं तुम्हांला सांगूं; पण आधीं असं सांगा कीं, वाईट काय होतं आणि त्याचं चांगलं काय व्हायला हवं होतं? तुमच्या दोन्ही गोष्टी आम्हांला सागा. त्या तुमच्या मर्जी-प्रमाणें उरकूं म्हणजे झालं ना?

सुभानु–ही हुजूरची इच्छा योग्य आहे. माझी आणि ह्या सर्व सरदारांची इच्छा एकच आहे. आपला बचाव करण्या-करतां आम्हीं तयार आहोंत. आम्हांला ज्या एका गोष्टीबद्दल अती वाईट वाटताहे तिच्याबद्दल आपण योग्य तें करावं.

कपिध्वज–आम्हीं काय केलं असतां तुम्हांला संतोष होईल?

सुभानु–वीरबाहूची सुटका. त्याला कैद केल्यामुळें चहूंकडे द्वेषभावाची पुटपुट सुरू होऊन, कांहीं भयंकर प्रकार होण्याचा संभव आहे. आपण जें कांहीं मिळवलं तें न्यायाचं असतां त्याची मैत्री अन्यायाबरोबर करून, आपण वीरबाहूला कैद केलं. त्याच्या अंतःकरणरूपी स्वच्छंदी रानाची अज्ञानांत कापणी केली. त्याच्या मानसिक पेरणीच्या उध्वस्ततेनं, त्याच्या तारुण्यांतल्या जवामर्दीच्या कसरतींपासून त्याला पराङ्मुख केलं. हें जर आपण न कराल तर त्याच्या पक्षाला जाऊन आपल्याशीं साम्रा देण्याची सबळ कारणं दाखवण्याची कोणाची छाती आहे? जे आपल्या विरुद्ध होऊ पहाताहेत त्यांना आपले शत्रु होण्याचा प्रसंगच येणार नाहीं. ह्या करतां आपलं वचन पुरं करा. वीरबाहूच्या मुक्ततेची विनंति करायला मोकळीक द्या. त्याच्या मुक्ततेनं आमचं चांगलं होणार आहे. कारण, हुजूरचं चांगलं होणं त्याच्या सुटकेवर अवलंबून आहे. त्याची सुटका तोच आपला फायदा. आपला फायदा तोच आमचा.

कपिध्वज–ठीक आहे. त्याच्या वयाप्रमाणं त्याला योग्य शिक्षण देण्याकरतां आम्हीं त्याला तुमच्या ताब्यांत देतों. आतां तर झालं ना? (**संजीवसेन** येतो त्यास) कसं काय संजीवसेन? काय बातमी आहे? (दोघे एकीकडे बोलतात.)

सुभानु–(वृषसेनास) ज्याला तें राक्षसी कर्म करण्याची आज्ञा झाली होती तोच हा माणूस. ह्याला मिळालेलं आज्ञापत्र ह्यानं माझ्या एका स्नेह्याला दाखवलं होतं. दुष्टपणाच्या गुन्ह्याची केवळ अमंगळ मूर्ति ह्याच्या डोळ्यांत वास करते आहे. त्याची ती दृष्टी–संकोचित मुद्रा–त्याच्या हृदयांत चाललेल्या त्रासदायक विकारांची पूर्ण प्रतिमा दाखवते आहे. ह्यावरून त्यानं आपली कामगिरी बजावली असल्याची फार भीति वाटते.

वृषसेन–(सुभानूस) दोन युद्धांतला बातमीदार जसा इकडून तिकडे–तिकडून इकडे जातो येतो, तसाच–ह्या राजाच्या–अंतःकरण आणि मतलब ह्यांमधला रंग वरच्यावर जातयेत आहे. त्याचे मनोविकार इतके पक्कदशेला आले आहेत कीं, ते हाणून पाडणंच आवश्य आहे.

सुभानु–(वृषसेनास) पण ते हाणून पाडतांना त्याचा दुष्परिणाम त्या बिचाऱ्या लाडक्या पोराच्या मृत्यूनं होण्याची भीति वाटते.

कपिध्वज–सरदारहो, आपणां सर्वांच्या विनंतीला मान देऊन, वीरबाहूला जिवंत आपल्या ताब्यांत देण्याचं आमच्या मनांत पूर्णपणें होतं; परंतु मृत्यूच्या जबरदस्त हाताला आडवण्याची आमच्यांत शक्ति नसल्यामुळें, आपणां सर्वांनीं ज्या राजपुत्राची मागणी केली होती तो इहलोक सोडून गेला. हे संजीवसेन सांगतात कीं, तो रात्रींच आटपला.

वृषसेन– व्याजोक्तीनें) तो त्या दुखण्यांतून उठेल असं आम्हांला वाटलंच नव्हतं.

सुभानु—आपण रोगग्रस्त होणार असं त्या मुलाला वाटण्याच्या पूर्वीच तो मृत्यूच्या पाशांत सांपडणार हें आम्हांला केव्हांच कळलं होतं. ह्या कृत्याचा झाडा—ह्या किंवा परलोकीं द्यावा लागणार हें खास.

कपिध्वज—आम्हांला त्याचं काय? आमच्याकडे अशा गंभीरपणाच्या वक्र भिवया कां करता? त्याच्या दुर्दैवांत आम्हीं वांटेकरी होतों असं तुम्हांला वाटतं कीं काय? जीवित्वनाडीवर आमचा हुकूम आहे काय?

वृषसेन—हा डाव उघड लुच्चेगिरीचा झाला. असा डाव मोठेपणानं उघडपणें खेळल्याबद्दल लाज वाटली पाहिजे. मागितलेलं दान फाशानं घेतलं! आतां काय? आटपलं. सरकार येतों आतां.

सुभानु—वृषसेनजी, थांबा, जाऊंनका. मी तुमच्याबरोबर येतों. ज्या गरीब बापड्याचं राज्य ह्या सर्व इंद्रकीलावर होणार होतं त्याला काळानं जबरदस्तीनं अवघं तीन हाताच्या थडग्याचं जें राज्य दिलं आहे तें आपण जाऊन पाहूं. ही गोष्ट मोठी असहनीय आहे. ह्यापासून आम्हांला होणारं दुःख किती दूरवर जाईल त्याचा नेम नाहीं. (सर्व सरदार जातात.)

कपिध्वज—त्यांच्यातर सर्वांगाची आग होऊन गेली आहे. मला पश्चात्ताप होतो आहे. रक्तस्रावानं स्थापलेलं राज्य निसरड्यावर ठेवलेल्या पायाप्रमाणं डळमळीत असतं. एकाचा जीव घेतल्यानं दुसऱ्याचं आयुष्य वाढतं असं कधींच होत नाहीं. (एक बातमीदार येतो त्यास) कां तुझी दृष्टि अशी भित्रि कां दिसते? तुझ्या गालांवरचं रक्त कुठें गेलं? ढगानीं व्यापलेलं आकाश वादळाशिवाय साफ होणं नाहीं. हं चल आटप. काय बातमी आहे ती सांग. फेनपेशाची काय हकीकत आहे?

बातमीदार–इंद्रकीलला येण्याला फेनपाहून बरंच सैन्य निघालं आहे. परक्या देशावर स्वारी करायला, इतकं जबरदस्त सैन्य कधींच कोणी उभारलं नव्हतं. सैन्याची तयारी चालली आहे अशी जों आपल्याला बातमी कळते आहे तों इतक्यांत तें येऊनही पोंचलं.

कपिध्वज–आमचे हेर दारू पिऊन चैनींत घोरताहेत कीं काय ? ह्याबद्दल आमच्या मातोश्रीनीं आम्हाला कळवण्याची काळजी कां घेतली नाहीं ?

बातमीदार–सरकार, त्यांचे कान मातीच्या दड्यांनीं बंद झाले आहेत. चैत्र वद्य प्रतिपदेला त्या परलोकीं गेल्याची फेनपाहून बातमी आली आहे. चित्रसेनाबाईही भ्रमिष्ट होऊन कुठे गेल्या त्याचा पत्ता नाहीं. कोणी म्हणतात त्यांनीं आत्महत्या केली. पण ह्याबद्दलचं खरं किंवा खोटं–निश्चयपूर्वक कांहींच सांगतां येत नाहीं. कारण, हें सर्व कर्णोपकर्णीं उडत उडत ऐकलं आहे.

कपिध्वज–माझ्यावर धांवून येणाऱ्या राक्षसी प्रसंगांनो, पुरे करा आतां तुमचा हा प्रचंडपणा ! माझ्या नाखुष सरदारांना मी खूषकरीपर्यंत तुमचं माझ्याशीं सख्य असूं द्या. हर हर ! काय हा प्रसंग ! मातोश्री परलोकीं खऱ्याच का गेल्या ? तूं आतां सांगितल्याप्रमाणें फेनपचं सैन्य जर इंद्रकीलच्या किनाऱ्यावर उतरलं असेल तर आईच्या मरणानं, त्या देशांतल्या आमच्या स्वामित्वाच्या प्रांतांवरचा आमचा अधिकार जाऊन, ते जबरदस्त धोक्यांत पडले आहेत असं म्हणायचं ?

बातमीदार–तें सैन्य, हंसचूड युवराजांच्या सैनापत्याखालीं आलं आहे.

कपिध्वज–तुझी बातमी ऐकून माझं डोकं फिरून गेलं आहे.

(पुरुषवेष घेऊन **पिंगलाक्ष** नांव धारणकेलेल्या **चित्रसेनेला** घेऊन **शबलाक्ष** येतो.)

कपिध्वज–कां कसं काय? तुझ्या कामाबद्दल जग काय म्हणतं? आतां उगीच जास्त ओंगळ बातम्या सांगून माझं डोकं पिकवूं नको. तसल्या बातम्यांनीं तें आधींच ओथंबून गेलं आहे.

शबलाक्ष–आपण ऐकल्यापेक्षां जास्त वाईट गोष्ट मी आपल्याला सांगणार आहें. ती ऐकण्याची जर आपल्याला भीति वाटत असेल तर न ऐकतां तिचा परिणाम खुशाल भोगा!

कपिध्वज–शबलाक्षा, रागावूं नकोस! दुःखकारक वाईट बातम्यांच्या लोटानं मी अत्यंत त्रासून गेलों आहें. त्यामुळें तुला तसं बोललों. हं–चालूंदे. कितीही वाईट बातमी असली तरी ती खुशाल सांग. मी ऐकायला तयार आहें.

शबलाक्ष–भिक्षुक लोकांत माझं किती वर्चस्व होतं हें त्यांच्यापासून मी मिळवलेलं द्रव्यच सांगेल. पण आधीं रस्त्यांत घडलेला चमत्कार सांगतों. स्वच्छंदी लोक पोकळ स्वप्नांच्या आफवांवर भरंवसा ठेवून चमत्कारिक स्वभावाचे झाले आहेत. आपण कशाला भितों हें त्यांचं त्यांनांच कळत नाहीं. ते अगदीं भयग्रस्त होऊन गेले आहेत. हे भविष्यवादी पहा. यांचं नांव पिंगलाक्ष. यांना मीं पकडून आणले आहेत. रस्त्यांत ह्यांच्या भोंवतीं हजारों लोक जमले होते. हे मध्यें उभे राहून त्यांना कर्कश्श सुरांत कविता ऐकवीत होते. त्या कवितांत–आपण येत्या प्रतिपदेला दोन प्रहरीं आपला राजमुगुट दुसऱ्याच्या स्वाधीन करणार–असा अर्थ होता.

कपिध्वज–ह्या असल्या पोकळ आफवा तूं कां उठवल्यास?

चित्रसेना–पोकळ म्हणण्यापेक्षां भरींव म्हणणं चांगलं!

कपिध्वज–तें कसं?

चित्रसेना–स्त्रियांचे देह एखाद्या मलंगाप्रमाणें पिळदार असतात काय?

कपिध्वज–स्त्रियांचीं मनं तशीं पिळदार असतात!

चित्रसेना–तशा मनाचा पगडा देहावर बसतो किं देहाचा मनावर बसतो?

कपिध्वज–तशीं मनं देहाची राखरांगोळी करतात.

चित्रसेना–हें जर खरं आहे, तर ह्याच न्यायानं सध्यांच्या तुझ्या स्थितीकडे पहा! तुझ्या कुकर्मी मनाचा अंमल तुझ्या देहावर झाल्यामुळें–ती तुझी मुखश्री पहा कशी दारूच्या शिळ्या अमलाप्रमाणें तुझ्याच मनाला डिवचते आहे.

कपिध्वज–ह्या असल्या नसत्या उठाठेवी तुला करण्याचं कारण काय?

चित्रसेना–न्यायाचा खून. परमेश्वराचा अपराध.

कपिध्वज–कोणाच्या बाबतींत?

चित्रसेना–तुझ्या पुतण्याच्या! हें परमेश्वराला कसं सहन व्हावं?

कपिध्वज–तूं कोण आहेस?

चित्रसेना–भविष्यवादी!

कपिध्वज–आग लागो तुझ्या त्या ज्योतिषशास्त्राला?

चित्रसेना–आग लागो तुझ्या त्या अनीतीला!

कपिध्वज–मीं तुला ओळखलं!

चित्रसेना–मीं तुला कधींच ओळखलं आहे!

कपिध्वज–तूं पुरुषाचा वेष घेतलेली चित्रसेनावहिनी आहेस.

चित्रसेना–अन्यायाचा खून करणारी मी न्यायदेवता आहें.

कपिध्वज–बदकारीचं पेव, अधमपणाची मूर्ति, अन्यायाची मूस, धारिष्टाची ज्योत–इतकंच नव्हे, तर रक्तलोभाची हेवेखोर–मत्सरी स्त्री! असे बघतां काय? संजीवसेन, पकडा हिला! तो पहा जंबिया तिनं काढला आहे! त्याचा आघात ह्या हृदयावर

बसण्याच्या आधींच हें फुटूं पहाताहे. न्या हिला इथून. त्याच तुरुंगांत हिला ठेवा!

चित्रसेना–काय, माझा लाडका वीरबाहू ज्या तुरुंगांत सध्यां आहे तिथें मला नेणार? चला–मी आनंदानं येतें!

कपिध्वज–तो सध्यां जिथें आहे तिथेंच हिला नेऊन ठेवा! त्याच्याप्रमाणेंच हिला पंचमहाभूतांच्या स्वाधीन करून, ताबडतोब परत या! (**संजीवसेन** आणि **चित्रसेना** जातात.) शबलाक्षा, इंद्र-कीलच्या किनाऱ्यावर कोण येऊन उतरलं आहे त्याची चहूंकडे पसरलेली बातमी तुला कळलीच असेल?

शबलाक्ष–फेनपचं सैन्य आलं आहे असा सर्वत्र गवगवा झाला आहे. इडस्पती आणि वृषसेन ह्यांची गांठ पडली होती. संतापानं त्यांचे डोळे, नव्या विस्तवाप्रमाणें झालेले मला दिसले. वीरबाहूचा खून आपणच करवलात असं ते म्हणाले. ते त्याचं थडगं शोधायला गेले आहेत.

कपिध्वज–शबलाक्षा, तूं त्यांच्याकडे जा. त्यांनां माझ्याकडे घेऊन ये. त्यांचं प्रेम संपादण्याचा मला अजून एक मार्ग आहे.

शबलाक्ष–जशी मर्जी! (जातो.)

कपिध्वज–(बातमीदाराला) त्याच्या पाठोपाठ जा. माझ्या सरदारांच्या आणि त्याच्यामध्यें प्रसंगीं बातमीदाराची जरूरी लागेल. (बातमीदार जातो.) माझी आई वारली हें फार वाईट झालं. (**संजीवसेन** येतो.)

संजीवसेन–सरकार, असं म्हणतात कीं, रात्रीं आकाशांत एकंदर पांच चंद्र उगवून, चारांच्या भोंवतीं पांचवा मोठ्या वेगानं फिरत होता.

कपिध्वज–काय, पांच चंद्र?

संजीवसेन–तें पुढें येणाऱ्या अरिष्टाचं सूचक होतं असं

थेरडे आणि थेरड्या भविष्य करीत होत्या. तरूण वीरबाहूचा खून तर सर्वांच्या तोंडीं आहेच. त्याच्यासंबंधानं एकमेकांच्या कानांत कुजबुजी सुरू आहेत. त्याच्या मरणाची हकीकत जेव्हां एखादा सांगू लागतो तेव्हां ऐकणारांची वृत्ति मोठी चमत्कारिक होते.

कपिध्वज—भयाश्चर्यानं चकित होऊन ते स्तब्ध होत असतील ?

संजीवसेन—ते स्तब्ध होऊन भिवया वांकड्यातिकड्या करतात. अंगांत कांपरं भरून डोळे गरगर फिरवूं लागतात. एक लोहार तर ही गोष्ट एका शिष्याकडून ऐकत असतां, ऐरणीवरचं लाल लोखंड हातोड्यानं ठोकायचं विसरून, जशाचातसाच तोंड वासून स्तब्ध उभा राह्यलेला मीं पाह्यला. कोणी सैन्य थडकल्याची बातमी सांगतो तर कोणी मध्येंच येऊन वीरबाहूच्या मरणाची हकीकत कळवतो.

कपिध्वज—अशा बातम्या सांगून तूं मला भेडावतो आहेस. वीरबाहूच्या मृत्यूसंबंधानं तूं भाषण कां करतोस ? त्याचा खून तूंच केला आहेस ! तो मरावा अशी इच्छा करायला मला जबरदस्त कारणं होतीं. तुला त्याला मारायला कांहींच नव्हतं.

संजीवसेन—तसं खरं, पण तसं करायला मला महाराजांनींच चेव आणला नव्हता का ? अशा तऱ्हेचं बोलणं पुढें होईल असा मला संशय आलाच होता. म्हणूनच मीं चित्रसेना—

कपिध्वज—काय, तिला तूं ठार मारून टाकली नाहींस ?

संजीवसेन—महाराजांच्या आज्ञेप्रमाणें तिला तुरुंगांत पंचमहाभूतांच्या हवालीं केली आहे.

कपिध्वज— फार वाईट गोष्ट केलीस ! तिला ठार मारून कां आला नाहींस ? राजे लोकांच्यापाशीं उपयुक्त म्हणून जीं माणसं असतात, तींच अत्यंत दुष्ट असतात. कांहीं अल्पस्वल्प

कारणांनीं राजेलोक रागावतात. त्या आवेशांत त्यांनीं खूण केली असतां, त्यांच्या भोंवतालचीं माणसं त्या डोळ्याच्या खूणे-चाच हुकूम मानून, दुष्टात्म्यांप्रमाणें त्या लहरीचा उपयोग खूनासारख्या दुष्कर्मांत करतात. आणि मग त्याचा अन्वय राजाकडेच जोडतात; हें त्यांचं दुर्दैवच समजायचं.

संजीवसेन—वीरबाहूचा खून करण्याबद्दलच्या ह्या आज्ञा-पत्राप्रमाणें चित्रसेनेचा खून करण्याबद्दल माझ्याजवळ अज्ञापत्र नव्हतं म्हणून मी तिला जिवंत ठेवली आहे.

कपिध्वज—परमेश्वराच्या सिंहासनापुढें मी गेल्यावर, ज्या वेळीं इथल्या कर्माचा न्याय होईल तेव्हां हा कागद माझ्या विरुद्ध साक्ष देऊन माझी फजीती करील. वाईट कृत्यं कर-ण्याच्या खटपटी सुरू असतां, त्यांकडे जर वारंवार लक्ष दिलं तर त्यापासून वाईट परिणाम घडायचेच. निसर्गानं आपल्या हातानं खूण करून ज्याच्यापुढें—दुष्कृत्यं करणारा पुतळा—असा शेरा मारला आहे—असा जो तूं—तो तूं जर माझ्या जवळ नसतास तर वीरबाहूचा खून करण्याची इच्छा माझ्या मनांत कधींच उद्भवली नसती.

संजीवसेन—मीं स्त्रीहत्येचं पातक ह्याचकरतां केलं नाहीं.

कपिध्वज—तुझा तो तुच्छ चेहरा पाहून, रक्तपातासारखं दुष्कृत्य करायला अगदीं तत्पर अशा धाडसाच्या कामांत घाला-यला तूं योग्य आहेस असा माझा समज झाला. त्याचमुळें मीं वीरबाहूच्या खुनाबद्दल तुझ्यापाशीं अस्पष्ट बोललों. राजाचं मन सुप्रसन्न करून घेण्याकरतां, सदसद्विचारशक्तीला बाजूला ठेवून तूं एकदम राजपुत्राचा नाश केलास.

संजीवसेन—म्हणूनच चित्रसेनेला जिवंत ठेवली आहे. पण सरकार—

कपिध्वज—माझी जी कांहीं इच्छा होती ती मीं तुला अस्पष्टपणें कळवली होती. त्यावेळीं तूं नुसती नकाराची मान हालवतास—थांबतास—माझ्या तोंडाकडे संशयी नजरेनं बघतास—माझं बोलणं स्वच्छपणें सांगायला मला सांगतास, तर खचित लज्जेच्या साम्राज्यानं मला मुका बनवून, माझ्या इच्छेपासून मी पराङ्मुख झालों असतों. तुझ्या भयानं मला वेढा दिला असता; पण तूं माझा उद्देश नुसता खुणेनं जाणून त्याचं पापी उत्तरही तूं मला खुणेनंच दिलंस. यत्किंचितही न थांबतां—आपल्या हृदयाचं मत न घेतां—आपल्या त्या हातांनीं—ज्या कृत्याचा उच्चार करायला तुझी किंवा माझी जीभ धजत नाहीं असं कृत्य तूं केलंस. जा. चालता हो माझ्यापुढून. पुन्हां मला तोंड दाखवूं नकोस. माझे सरदार मला सोडून गेले. परराष्ट्रीय सैन्य माझ्या राज्याच्या देवडीजवळ—माझ्या छातीवर येऊन ठेपलं. माझ्या राजेपणाची नामोसकी झाली. इतकंच नव्हे—ह्या मांसमय क्षेत्रांत, ह्या रक्तवाताच्या कारागृहांत—ह्या देहाच्या राज्यांत—माझे सदसद्विचार आणि पुतण्याचा मृत्यु ह्या दोहोंत उत्पन्न झालेलं वैर नांदतं आहे.

संजीवसेन—महाराज, आपण जर आपल्या इतर शत्रूंशीं लढायला तयार असाल तर आपण आणि आपला आत्मा ह्या दोहोंमधें असलेलं वैर मी मिटवतों. वीरबाहू अजून जिवंत आहे.

कपिध्वज—काय ?

संजीवसेन—हा माझा हात अजून त्याच्या रक्ताच्या लाल डागांनीं रंगवला गेला नसून, निरपराध आणि पवित्र आहे. ह्या हृदयांत मारेकऱ्याच्या भयंकर कल्पनांनीं अद्याप प्रवेश केला नाहीं. आपण माझ्या राकट अशा बाह्यस्वरूपावरून निसर्गाला

दोष दिला खरा; पण हें शरीर, निरपराधी पोराचं मारेकरी नसून, शुद्ध अंतःकरणाचं आच्छादन आहे.

कपिध्वज—काय, वीरबाहू जिवंत आहे ? जा—ताबडतोब जा. त्या माझ्या रागावलेल्या सरदारांना ही बातमी कळीव. ते माझे पूर्ववत् अंकित होतील असं कर. रागाला वश होऊन मीं तुझ्या मुद्रेला दोष दिला. त्याबद्दल रागावूं नकोस. त्या वेळचा माझा राग अगदीं अज्ञानाचा होता. त्यामुळें लाल झालेल्या माझ्या डोळ्यांना, तुझं स्वरूप—आहे त्यापेक्षां फार विक्राळ दिसलं. बोलण्यांत वेळ घालवूं नकोस. तुझ्याकडून होईल तितकी घाई कर. त्या माझ्या रागावलेल्या सरदारांचीं मनं वळवून त्यांनां माझ्याकडे घेऊन ये. ही गोष्ट मी तुला हळू सांगतों आहें; पण तूं मात्र तसा हळू जाऊं नकोस. (पडदा पडतो.)

प्रवेश तिसरा.

[किल्यांतील तुरुंगांत **चित्रसेना** बसली असून, तटावर **वीरबाहू** धनगराच्या वेषांत उभा आहे असा प्रवेश उघडतो.]

चित्रसेना—ग्रहदशेनं पीडलेल्या हरिश्चंद्राच्या बायकोची आणि मुलाची अशीच भेट झाली होती. ह्यालाच दुर्दैवांतलं क्षणैक सुख म्हणायचं! बाळा वीरबाहू, जा. मार उडी. तुझा तो धनगराच्या पोराचा वेष, तुला हंसचूडाच्या छावणींत नेऊन सुखरूप पोंचवील. हा वियोग तारामतीरोहिदासासारखाच शेवटीं गोड होईल. कारण, दुःखामागून सुखोत्पत्तीची आशा स्वाभाविकच असते. मार उडी. आटप.

वीरबाहू—हा तट जमीनीपासून जरी अती उंच आहे तरी मी इथून खालीं उडी मारणार! धरणीमाते, तूं दयार्द्र हो. माझ्या शरीराला इजा करूं नकोस. मला ओळखणारं ह्या तटा-

खालीं कोणीही नाहीं. उडी मारण्याची भीति वाटते. पण धाडस करणार. उडी मारल्यावर माझे अवयव जर धड राहतील तर इथून निस्टून जायला मला हजारों रस्ते मिळतील. खालीं पडून माझ्या अवयवांचे तुकडे झाले नाहींत तरी मला नाहींसा होण्याला हजारों युक्त्या आहेत. कारण, इथून पळून जाऊन मरणं आणि इथें राहून मरणं मला सारखंच आहे. (उडीमारून पडतो.) अरेरे—मेलों! ह्या दगडांत माझ्या कपिध्वज चुलत्याचाच कठोरपणा आहे. परमेश्वरा, तूं माझ्या आत्म्याला संभाळ. इंद्रकीलदेशा, तूं माझ्या हाडांचं रक्षण कर. (मरतो.)

चित्रसेना—परमेश्वरा, माझ्या बाळाला हंसचूडाच्या छावणींत सुखरूप नेऊन पोंचीव! कोण आहे तें? संजीवसेनजी, माझ्या लाडक्याला जिवंत सोडलात हे तुमचे तुमच्या देशावर फार उपकार आहेत. दम धरा! मी आलेंच.

(जाते व तटाच्यापुढें **सुभानु**, **वृषसेन** आणि **इडस्पति** येतात.)

वृषसेन—अशा संकटसमयीं स्नेह्याच्या नात्यानं हंसचूड युवराजानं जें बोलावणं केलं आहे त्याचा प्रतिकार करणं चांगलं नाहीं. ह्यावेळीं त्याला जाऊन मिळण्यानचं आपला बचाव होणार आहे. मी त्याला अडोरपुरीं जाऊन मिळणार.

सुभानु—त्या कुशध्वज आचार्यांपासून हें पत्र कोणी आणलं?

वृषसेन—फेनपदेशांतले एक सुदर्शनराव म्हणून मोठे सरदार आहेत त्यांनीं. ह्या पत्रांत माझ्या गुप्त पत्रव्यवहार करण्याच्या धाटणीसंबंधानें युवराजाच्या मनांतलं प्रेम व्यक्त होताहे.

इडस्पति—तर मग त्याला जाऊन मिळण्याकरतां उद्यां सकाळीं आपण निघूंया?

वृषसेन— त्याला भेटायला दोन दिवसांचा प्रवास करावा लागेल. आतांच निघालों तरी चालेल. (**शबलाक्ष** येतो.)

शबलाक्ष–रागामुळें नाखुष झालेले सरदार आज पुन्हां भेटले. चांगलं झालं. सरदारहो, आपणां सर्वांना एकदम महाराजांकडे जाण्याची आज्ञा मीं घेऊन आलों आहें.

वृषसेन–महाराजांनीं आपल्या कृतीनंच आपल्यापासून आम्हांला दूर केलं आहे. त्या जीर्ण झालेल्या राजवैभवाच्या झग्याला आम्हीं आपल्या श्रेष्ठत्वाचं अस्तर लावायला इतउत्तर नाकबूल आहोंत. रक्तपाताची पावलं उठवीत जाणाऱ्या त्या रक्तपाती–खुनी राजाच्या पावलांचे अनुयायी होऊन, आम्ही आपल्या निष्कलंक कीर्तीला डाग लावून घ्यायला तयार नाहीं. जा–त्यांना हें आमचं म्हणणं कळवा! वीरबाहूचा खून कुणी केला तें आम्हांला माहीत आहे.

शबलाक्ष–आपली समजूत कांहींही झालेली असो. राजाला योग्य असं सरळ–शिष्टाचाराचंच उत्तर देणं ज्यास्त प्रशंसनीय आहे.

वृषसेन–आम्हांला जें दुःख झालं आहे तेंच अशा तऱ्हेचं उत्तर देताहे. आमच्या शिष्टाचाराचा त्यांत कांहीं संबंध नाहीं.

शबलाक्ष–आपल्या दुःखाचा मुद्दा स्वल्प होता. शिष्टाचाराचं उत्तर देण्याचा मोठा होता.

सुभानु–अधीरतेला अधिकारविशिष्टता असते.

शबलाक्ष–खरं आहे. ती धन्यालाच दुखवण्याकरतां असते, दुसऱ्याला नाहीं. हें लक्षांत ठेवलं पाहिजे.

वृषसेन–हाच तो तुरुंग! तिथें कोण पडलं आहे?

सुभानु–(पाहून) अरेरे मृत्यूनं ह्या राजपुत्राच्या शुद्ध शरीरांत प्रवेश केला. आतां मृत्यु आपल्या सौंदर्याबद्दल गर्विष्ठ झाला आहे. हा खून–आपल्या उदरांत लपवायला पृथ्वीला जागाच नव्हती काय?

वृषसेन–हा निंद्य खून–खूनाऱ्या प्रकृतीनं केला आहे. त्याबद्दलचा सूड उगवण्याची प्रार्थना करण्याकरतांच हा मुडदा त्या मूर्तीनं इथें टाकला आहे.

इडस्पति–अथवा, असलं हें सौंदर्य समाधींतल्या किड्यांनीं खाऊन नष्ट होण्यापेक्षां किंवा त्याचं जळून भस्म होण्यापेक्षां तें फारच मोलाचं असं त्याला वाटल्यावरूनच त्यानं इथें टाकलं असावं!

वृषसेन–सुभानु, असला देखावा पूर्वीं तुम्ही कधीं पाह्यला ऐकला–वाचला होता का? कल्पना करण्याचा प्रयत्न केलात तरी ही कल्पना तुम्हांला होईल का? हा प्रकार पुढें असल्याशिवाय तुमची कल्पनाशक्ति असा दुसरा प्रकार निर्माण करूं शकेल काय? मारेकऱ्याच्या हातून उभारलेला हाच अत्युच्च कळस. आजपर्यंत जगांतल्या थरकांप करून सोडणाऱ्या रागीट–प्रखर नेत्रांनीं, मृदु अनुतापाच्या अश्रूंना हीच क्रूर निर्लज्जता दाखवली. हाच रानटी खाटकीपणा दाखिवला. आव्हान करून, हाच पहिला अति निंद्य धक्का दिला.

सुभानु–आजपर्यंत जगांत झालेले सारे खून ह्याच्या पाठीशीं लपण्यासारखे आहेत. हा खून इतका पूर्ण आणि अद्वितीय उतरला आहे कीं, तो पुढें घडणाऱ्या सर्व पापांचं कांहीं चालूं देणार नाहीं. हा निंद्य देखावा, मृत्युदरबारची पूर्ण साक्ष देतो आहे. पुढें उदाहरणार्थ जरी कोणी ह्याचं वर्णन करूं लागला तरी ती चेष्टा होईल. अगदीं अतर्क्य खून.

शबलाक्ष–खरोखरच हें अनिष्ट आणि क्रूर कर्म झालं. हें कर्म कोणाच्या हातून झालं असेल तो हात अत्यंत कठोरच म्हटला पाहिजे.

वृषसेन–'हें कर्म कोणाच्या हातून झालं असेल'? काय

होणार होतं तें आधींच आम्हांला कळलं होतं. हें क्रूर कर्म संजीवसेनाच्या हातून झालं आहे. हें घडवून आणण्यांत राजा कपिध्वजाचा पूर्ण हात होता. ह्या सुंदर मृतमूर्तीपुढें गुडगे टेंकून—ह्या निर्जीव सौंदर्याला शपथ वाहून सांगतों कीं, ज्याच्या आज्ञाधारकतेंतून मीं आपल्या आत्म्याला वळिवला आहे त्याच्या सूडानं ही मृतमूर्ती पुजून, हे हात भूषणीय करीपर्यंत, ह्या जगांतल्या कोणच्याही सुखाची चव घेणार नाहीं. आनंदाला थारा देणार नाहीं. आळसांत आणि आरामांत कसलीही विचक्षणा करीत बसणार नाहीं.

सुभानु } **इडस्पति** } आमचेही आत्मे तुमच्याचप्रमाणें शपथांनीं बद्ध करून घेतों. (संजीवसेन येतो.)

संजीवसेन—सरदारहो, तुम्हाला शोधण्याच्या घाईनं मी अगदीं दमून गेलों. वीरबाहू जिवंत असून, महाराजांनीं आपल्याला बोलावलं आहे.

वृषसेन—आपण खूनी आहोंत असं ह्याला माहित असतां अशी धिटायी दाखवण्याची ह्याला लाज कशी वाटत नाहीं ? चल निघ दुष्टा ! अधमा, चालता हो इथून.

संजीवसेन—मी अधम नाहीं.

वृषसेन—(तरवार उपसून) खात्री करूं कीं काय ?

शबलाक्ष—सरदारसाहेब, आपली तरवार फार तीक्ष्ण आहे. म्यान करा.

वृषसेन—खुन्याच्या चामड्यांत घुसवल्याशिवाय करणार नाहीं.

संजीवसेन—सरदार वृषसेनजी, जरा मागें हटा ! मी म्हणतों जरा मागें सरा. तुम्हांला खचित सांगतों, माझी तरवार तुमच्या इतकीच तीक्ष्ण आहे. चाल करून येण्यांत आपण आपला

दर्जा विसरलांत. मीं मात्र आपला विसरलों नाहीं. माझं द्वंद्वयुद्ध माझ्या निर्दोषीपणाचा बचाव खात्रीनं करील. आपण आपला जीव त्याच्या धोक्यांत न घालावा हें बरं. नाहींतर तुमचा तो राग लक्षांत आणून, तुमचा मान, लौकिक, मोठेपण हीं सर्व मी विसरून जाईन.

इडस्पति–जा–उकिरडा फुंकायचा सोडून, सरदाराचा अपमान करायला इकडे कशाला आलास?

संजीवसेन–माझ्या जिवाची मला मुळींच पर्वा नाहीं.–असं जरी मी समजतों, तरी सरदारच काय परंतु एखादा बादशाहा जरी तरवार उपसून पुढं आला, तरी माझा निर्दोषी जीव बचावण्याची मीं खटपट करणं हें मी आपलं काम असं समजतों.

वृषसेन–तूं खुनी आहेस.

संजीवसेन–मी नाहीं. आणि म्हणूनच मला तसा ठरवूं नका. जो मला तसा म्हणेल तो खरं बोलला असं होणार नाहीं. जो खरं बोलत नाहीं तो खोटा नव्हे काय?

सुभानु–अरे त्याला जरा असा पुढें ओढा.

शबलाक्ष–अहो मेहेरबान, जरा शांत व्हा.

वृषसेन–शबलाक्ष, आतां गप्प बसायचं आहे कीं, कणिक मउ करून घ्यायची आहे?

शबलाक्ष–वृषसेनजी, असल्या धमकीच्या गोष्टी एखाद्या सैतानाला सांगा. माझ्याबद्दल कपाळाला नुसती आठी घाला किंवा माझ्यावर चाल करून या–अथवा तुमच्या उतावळ्या मनाला लाज वाटेल असं कांहीं कृत्य करायला मला शिकवा कि, त्याचक्षणीं तुमचा मुडदा पाडलाच म्हणून समजा. तरवारीला वेळींच म्यानांत घाला. नाहींतर तुमचा आणि तुमच्या त्या बेकिंमत लोखंडाच्या तुकड्याचा चेंदामेंदाकरून टाकीन. मग

तुम्हांला वाटेल किं, हें नरकांतलं सैतानच आपल्या पाठीमागं लागलं आहे.

इडस्पति–अहो प्रसिद्ध शबलाक्ष, आपण काय करणार ! दुसरे दुष्ट खुनी होणार होय ?

संजीवसेन–ह्यापैकीं मी मुळींच नाहीं.

इडस्पति–तर मग ह्या राजपुत्राचा कुणी खून केला ?

संजीवसेन–एक तासापूर्वीं मीं ह्याला चांगल्या स्थितींत सोडला होता. ह्याचा मानमरातब यथायोग्य राखून मी ह्याचा परामर्ष घेत असें. त्याच्या प्रेमळ आणि मधुर अशा प्राणहानी-बद्दल मला रडूं येतं.

वृषसेन–त्याच्या त्या ढोंगी अश्रूंवर भरंवसा ठेवणं योग्य नाहीं. असल्या ह्या नीचाशिवाय असलं हें घोर कर्म इतराच्या हातून होणं शक्य नाहीं. असल्या ह्या मार्गांत हा अती दूर चालून गेला आहे. त्याचमुळें अनुताप आणि निरपराधित्व ह्या दोन नद्यांच्या प्रवाहामध्यें हा आपलं रूप दाखवतो आहे. सरदारहो, तुम्हा सर्वांचे आत्मे कसाईखान्यांतल्या दुर्गंधीनं त्रासले असतील. चला–सर्वजण इथून जाऊं. इथल्या पापाच्या दुर्गंधीनं माझा जीव गुदमरून गेला आहे.

सुभानु–(संजीवसेन आणि शबलाक्ष यांस) जा-जाऊन राजाला सांगा कीं, आमची जर तुम्हांला अपेक्षा असेल तर आम्ही तुम्हाला हंसचूडाच्या गोटांत भेटूं. (सर्व सरदार जातात.)

शबलाक्ष–वाहवा ! एकंदरींत जग मोठं नामी खरंच. ह्याची तुम्हाला माहिती असेलच. संजीवसेनजी, तुमच्या हातूंन जरी हें खुनाचं दुष्कर्म घडलं असलं तरी त्यांतून तुमचं संरक्षण करा-यला अनंत आणि अगाध अशी ईश्वरी कृपा असतां, तिचा एक लेशही तुमच्या कां उपयोगी पडूं नये ?

संजीवसेन—शबलाक्षजी, माझं म्हणणं आधीं ऐका.

शबलाक्ष—अरेरे! मीच तें तुम्हांला आधीं सांगतों. खचित्—तुम्ही दुष्कृत्याची मूर्ति आहांत. तुमच्या काळ्याकुट्ट दुष्कृत्यापुढें अमावास्येची रात्रही लाजेल. अघोरदेवतेच्या वरची तुमची कडी आहे. तुम्हीच जर ह्या लेंकराला मारलं असेल तर खरोखर आजपर्यंत नरकांतही तुमच्या तोडीचं क्रूर सैतान असणं संभवत नाहीं.

संजीवसेन—माझ्या गळ्याशपथ—

शबलाक्ष—हें क्रूर कर्म करण्याची संमती देणारांपैकीं जरी तुम्ही एक असाल तरी तेवढ्यानंच तुम्हीं आपल्या जीवाची आशा सोडली पाहिजे. ह्यावेळीं तुमचं जीवित्व इतकं नाजुक झालं आहे कीं, तुमचा प्राण घेण्याकरतां तुम्हाळाच जर एखाद्या दोरीची जरूर लागली तर कोळ्याच्या जाळ्यांतल्या एका तंतूनंच तुमचं काम होईल. तुमचा प्राण घेण्याच्या कामीं सुळाच्या ऐवजीं लव्हाळ्याचं एक ताट ह्या वेळीं काम करील. तुमच्या सारख्या नीचानं पाण्यांत जीव द्यायचं मनांत आणलं, तर महोदधीच्या ऐवजीं ओंजळभरच पाणी पुरे होईल. हें कर्म तुम्हींच केलं असा मला पुरा संशय येतो. त्याबद्दल दुःख वाटतं.

संजीवसेन—जो मनोहर जीव ह्या सुंदर रक्तमांसांत विहार करीत होता तो चोरण्याच्या कामीं मीं जर मत दिलं असेल किंवा तशा तऱ्हेची नुसती कल्पना जरी माझ्या डोक्यांत उद्भवली असेल, तर यमपुरींतल्या अत्यंत कडक शिक्षा मला यमराज करो. मीं वीरबाहूलं चांगल्या सजीव अवस्थेंत सोडला होता.

शबलाक्ष—असो. उचला आतां त्या अर्भकाला. ह्या वेळीं माझी स्थिति मोठ्या घोंटाळ्याची झाली आहे. मला वाटतं ह्या जगांतल्या चांगल्या रस्त्यांतून मी चुकून—भयंकर

आणि कांटेरी रस्त्यांत घुसलों आहें. अहाहा! ही इंद्रकीलची राजमूर्ति इथें निर्जीवावस्थेंत तुमच्या हातांत पाहून असं वाटतं कीं, तुम्हीं अति अल्प श्रमानं इंद्रकीलचं राज्यच आपल्या हातांत आंवळून धरलं आहे. हें एवढंसं बालक एकदम मृत्यु-मुखीं पडल्यामुळें, ह्या राज्यांतला प्राण, अधिकार आणि सत्यता ह्यांनीं ह्याच्या आत्म्याबरोबरच स्वर्गारोहण केलं. आतां ह्या इंद्रकीलचे हाल कुत्रा खाणार नाहीं. तंटेबखेडे, मारामाऱ्या, लढाया, एकमेकांवर दांतओठखाणं आणि बेवारस महत्वाच्या गर्वाचा उद्धटपणा—एवढंच काय तें बाकी राह्यलं आहे. आतां मांसरहित झालेल्या कपिध्वजराजाची हाडं—आपल्या पोकळ रागाचा तुरा उभारून, कुत्र्यासारख्या शांत-तेच्या सभ्य डोळ्यांनीं गुरगुरत स्वस्थ ऐट करणार.

संजीवसेन—परंतु आतां आपल्यावर स्वारी करायला धांवून आलेलं परकीय सैन्य आणि आमच्या कपिध्वजराजावर नाखुष झालेली प्रजा ह्यांची एकी होऊन, तें सर्व लटांबर आमच्यावर तुटून पडणार त्याचं कसं काय?

शबलाक्ष—ज्याप्रमाणें एखाद्या रोगग्रस्त जनावराबद्दल तें मरेल केव्हां आणि त्याच्या मांसावर आम्हीं यथेच्छ ताव मारूं केव्हां असं म्हणत कावळे टपून बसलेले असतात त्याच-प्रमाणें आमच्या ह्या राज्यांतले लोक—राज्यांत मोठा गोंधळ होऊन, कपिध्वजराजा मरतो केव्हां आणि आम्हीं त्याचे तुकडे उडवून प्रजासत्ताक राज्य स्थापतों केव्हां—असं म्हणत प्रसंगावर डोळे देऊन बसले आहेत. आतां उद्भवणाऱ्या वादळाशीं टक्कर देण्यांत जो आपल्या धैर्याचा कमरपट्टा आणि वैभव संभा-ळील तोच खरा सुखी होणार आहे. चला—संजीवसेनजी, हें बालक आपण महाराजांकडे घेऊन जाऊं! रात्र थोडी अन् सोंगं फार अशी स्थिति झाली आहे. शिवाय, ह्या देशावर परमेश्व-राची अवकृपाच दिसते आहे. (जातात.)

अंक चवथा समाप्त.

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

[इंद्रकीलचें राजगृह–कपिध्वज राजा, कुशध्वजाचार्य आणि इतर मानकरी, नोकर वगैरे]

कपिध्वज–(कुशध्वजाच्या हातांत मुगुट देतांना) आचार्य महाराज, माझ्या वैभवाचा मेरुमणी जो हा मुगुट तो मी आपल्या स्वाधीन करतों. (मुगुट देतो)

कुशध्वज–राजा, घे हा परत. माझ्या हातून हा तूं परत घेतल्यामुळें, धर्मगुरूंच्याकडूनच परत मिळाला असं झालं आहे. आतां या पुढें त्यांच्या अधिकाराचं वर्चस्व तुला मानलं पाहिजे.

कपिध्वज– आपलं पवित्र वचन मात्र आपण पाळा! युवराज हंसचूडाकडे जाऊन त्याची भेट घ्या. आम्ही क्रोधाविष्ट होण्याच्या आधीं, त्याच्या सैन्याचा कूच आपल्या पवित्र अधिकाराच्या जोरानं बंद करा. आमच्या राज्यांतल्या नाखूष झालेल्या परगण्यांतून बंडाळ्या सुरू झाल्या आहेत. आमच्या प्रजेनं आमचे हुकूम तोडले. परक्या रक्ताच्या परकीय राजसत्तेचे प्रजाजन होण्याची आमच्या प्रजेनं अंतःकरणपूर्वक शपथ घेतली आहे. हा जो लहरी दुस्वभावाचा जलप्रलय झाला आहे तो नेमस्त करणं आपल्या हातीं आहे. म्हणून म्हणतों आतां थांबूं नका. सध्यांचा काळ इतका भयंकर रोगग्रस्त झाला आहे कीं, त्या रोगावर योग्य औषधाचा याच वेळीं उपाय केला–तरच तो रोग साध्य होऊन त्याचा परिणाम दुःखकारक होणार नाहीं.

कुशध्वज–धर्मगुरूंच्या आज्ञेचं तूं हट्टवादानं उल्लंघन केलंस

त्याचमुळें ह्या सध्यांच्या वादळाला मीं माझ्या श्वासमय शब्दांनीं उत्तेजन दिलं. आतां तूं नास्तिकपणा सोडून धर्मगुरूंच्या अनुमतानं वागण्याचं कबूल केलं आहेस. तेव्हां आतां माझी जीभ पुन्हां–तें तुझ्या राज्यांत घोंघाट करून उद्धत झालेलं वादळ–शांत करून, चोहोंकडे उत्तम शांततेची स्वच्छ हवा उत्पन्न करायला सिद्ध झाली आहे. आजच्या ह्या राज्याभिषेक-समयीं, जगद्गुरूंच्या मठासंबंधानं जी नोकरी बजावण्याची तूं शपथ घेतली आहेस ती पूर्णपणें ध्यानांत ठेव. आतां मी हंस-चूडाकडे जातों. त्याच्या सैन्याला हत्यारं खालीं ठेवायला लावतों. (कुशध्वज जातो.)

कपिध्वज–काय, आजचा हा राज्याभिषेकाचा दिवस ? राज्याभिषेकाच्या आदल्या दिवशीं दुपारीं मी आपला मुगुट स्वतः दुसऱ्याच्या हातीं देईन असं त्या ज्योतिष्यानं भविष्य वर्तवलं नव्हतं का ? त्याप्रमाणें जरी घडलं आहे तरी तें मला निग्रहानं करावं लागेल असं त्याचं म्हणणं होतं. असं असतां, जें मी आपण होऊन स्वयंसिद्धतेनं केलं आहे त्या माझ्या स्वसंतोषाच्या कृत्याबद्दल परमेश्वर मला सुखी ठेवील अशी माझी खात्री आहे. (शबलाक्ष येतो.)

शबलाक्ष–जयदुर्ग किल्याशिवाय सर्व अडोरपूरपरगणा शत्रूला शरणागत झाला. सुवर्णपुरी राजधानींत हंसचूड आणि त्याचं सैन्य मोठी धुमाळी माजवून राह्यलं आहे. आपले सर्व सरदार आपली आज्ञा झुगारून शत्रूच्या नोकऱ्या बजावायला गेले. आपले जे थोडेसे संशयित मित्र राह्यले आहेत ते कोणच्या पक्षाला सामील व्हावं ह्या घोंटाळ्यांत आहेत.

कपिध्वज–राजकुमार वीरबाहू जिवंत आहे असं ऐकूनही माझे सरदार पुन्हां मला वश होणार नाहींत काय ?

शबलाक्ष–कोणच्या तरी दुष्ट हातांनीं जीवरूप हिरा चोरून, त्याचं देहरूप रिकामं कोंदण फेंकून दिलं होतं. ठार मारून रस्त्यावर फेंकून दिलेला तो आपल्या सरदारांना सांपडला.

कपिध्वज–तो जिवंत आहे असं मला संजीवसेनानं सांगितलं.

शबलाक्ष–त्यानं मलाही शपथ घेऊन असंच सांगितलं! पण महाराज, आपण असे खचतां कां? उदास कां दिसतां? आपले विचार ज्याप्रमाणें मोठे आहेत त्याप्रमाणें कृती करून दाखवा! आपले ते राज्याधिकाराचे डोळे भयानं आणि उदासीनतेनं निस्तेज झालेले असे जगाच्या दृष्टीस पडण्यांत अर्थ काय? सध्यांच्या काळाप्रमाणें, आपल्या अंगांत पुरी चलाखी आहे असं दाखवा! आपल्यावर चालकरून येणाऱ्या अग्नीवर आपण वैश्वानररूपानंच चाल करा. आपल्याला दहशत घालूं पहाणाऱ्यांना आपण दहशत घाला. मनुष्यांना भीति उत्पन्न करणाऱ्यांच्या मनांत आपल्या कपाळाच्या आठीनं कापरं भरवा! जे कमी योग्यतेचे डोळे आपल्यावर निधड्या छातीनं ताणले गेले आहेत–त्यांना अशा आपल्या कृतीनं दबवून टाका. उठा–रणकुशल कार्तिकस्वामीप्रमाणें कडाक्याचं युद्ध करा. अंगीं धिटाई आणून निश्चयानं वागा. सिंह आपल्या गुहेंत असतां, त्याची आयाळ धरण्याची कोणाची छाती आहे? तिथें त्याला कोण नमवील? असे शब्दसुद्धां कोणाला उच्चारतां येणार नाहींत. महाराज, उठा–तो असंतोष जवळ येऊन पोंचला नाहीं तोंच त्याला दरवाज्याच्या बाहेर गांठून त्याचं निरसन करा. त्याच्याशीं झोंबी खेळा!

कपिध्वज–ते कुशध्वजाचार्य माझ्याकडे आले होते. त्यांच्या मर्जीप्रमाणें मीं त्यांच्याशीं सुखावह असा संधी केला आहे.

हंसचूडानं आणलेलं सैन्य परत फिरवण्यासंबंधानं त्यांनीं मला वचन दिलं आहे.

शबलाक्ष–त्या मूर्ख भिक्षुकावर आपण काय भरंवसा ठेवतां? शत्रू आपल्या घरांत घुसून, त्यानं आपल्यावर रंगसही करण्याचा फासा टाकला असतां, आपण त्याच्याशीं साम करण्याचीं बोलणीं लावणं, वशीकरणादि प्रकार योजणं अथवा मुदतीचा तह करूं पाहणं कधीं तरी शोभेल काय? ज्याच्या ओंठांवर अजून मिसुं फुटलं नाहीं–अशा त्या माजलेल्या–नामर्द, बदफैली कार्ट्यानं, मनांत कोणाचीही भीति न बाळगतां, आमच्यासारख्या लढवय्या राष्ट्रांत आपल्या समशेरीचा पराक्रम गाजवून, आपलं निशाण खुशाल आकाशांत फडकवावं काय? महाराज, उठा–युद्धाची तयारी करा. आपण जो तह करण्याची इच्छा करतांहात तो त्या आचार्यांकडून होण्याचा संभव नाहीं. आणि जरी झाला तरी आपल्या सैन्याच्या तयारीवरून आम्हीं आमच्या रक्षणाची तजवीज करणं योग्य आहे, असं त्यांनां वाटलं पाहिजे.

कपिध्वज–ठीक आहे. वेळेला अनुसरून जी कांहीं व्यवस्था करणं योग्य दिसेल ती कर–जा.

शबलाक्ष–येतों तर मी आतां? माझ्या अंगीं पुरं धाडस असल्याकारणानं–आपल्यापेक्षांही जास्त जोरदार शत्रूशीं आपल्याला टक्कर द्यायची आहे हें माहीत असतांही–मी आपलं धैर्य खचूं देत नाहीं. (जातात.)

प्रवेश दुसरा.

[अडोरची छावणी—हंसचूड, वृषसेन, सुदर्शन, सुभानु, इडस्पति आणि सैनिक–सशस्त्र येतात.]

हंसचूड–सुदर्शनराव, (कागद देतो) ह्याची एक निराळी प्रत करा, आणि आमच्या स्मरणार्थ ती नीट जपून ठेवा.

ह्या सरदारमंडळीला ती पहिली प्रत परत द्या. एकदां आपल्या तहाच्या अटी लिहून काढल्यावर त्या वाचल्या म्हणजे उभयतांनां त्यांतलीं वचनं विश्वासानं अस्खलितपणें पाळायला ठीक पडेल.

वृषसेन–आम्हां सरदारांच्याकडून कधींही वचनभंग होणार नाहीं. युवराज–हंसचूडमहाराज, आम्ही स्वतःच्या खुषीच्या उत्सुकतेनं आणि खऱ्या विश्वासानं आपल्या पुढच्या कार्यक्रमाच्या कामांत जरी शपथप्रमाण केलं आहे, तरी आपण हें पक्कं लक्षांत ठेवा कीं, अशा काळच्या दुःखानं गर्हणीय भांडणांत पुष्कळ जखमा करून, त्यांपैकीं झालेला एखादा हाड्यावर्ण बरा करायला एखादं मलम शोधून काढण्यांत मला आनंद वाटत नाहीं. अरेरे! कमरेची तलवार उपसून, साध्वी स्त्रीला विध्वा करण्याची मला खंती वाटते. 'माझं रक्षण–माझी संभावीत रीतीची सुटका–वृषसेनजी, तुमच्याशिवाय होणार नाहीं हो'–असं माझी जन्मभूमी मला मोठ्यानं ओरडून सांगते आहे. ती धाय मोकलते आहे! पण काय करावं? ज्या राजसत्तेंत खरं आणि खोटं यांचं संमेलन झाल्यामुळें जे आमचे हक्क रोगट झाले आहेत–ते कसदार आणि सुदृढ करायला आमच्या देशबांधवांचे आम्हांला बळी पाडल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. माझ्या दुःखी मित्रांनो, आपण जे ह्या भूमातेच्या पोटीं जन्म पावलों, त्या आपण तिच्या बच्चांनीं तिच्यावर उगवलेला हा असा दुर्दिन पहावा ही मोठी दुर्दैवाची गोष्ट नाहीं का? आपण परदेशीय सैन्याबरोबर कूचकरून–आपल्या सुशील भूमातेच्या उरावर शत्रूचे थवे नाचवीत आहोंत–छेः, हें ठीक नाहीं. ही बाजू सोडून देऊन, मी आपल्याला लावून घेतलेला काळीमा मला माझ्या अश्रूंनीं साफ धुऊन काढला पाहिजे. आपल्या भूमातेच्या पूर्वापार सुजनतेला–वैभवी करण्याकरतां अनोळखी

निशाणाच्या छायेला आम्हीं रहावं काय? काय, अनोळखी निशाणाची छाया! हाय–हाय! कोण हा प्रसंग! भूमाते, अग तुझ्या शत्रूला तुला सहज हांकून लावतां येईल! तो वज्रदेही हनुमान आपल्या हातांनीं तुला उचलून–सध्यांच्या जागेंतून जर दूर कुठें नास्तिक जागीं अचल अशी नेऊन ठेवील, तर भांड-खोर शेजाऱ्यांप्रमाणें ह्या दोन राष्ट्रांचं रक्त जें व्यर्थ खर्च होताहे तें न होतां–एकमेकांत सख्यत्व राहून–द्वेषी रक्त–शुद्धतेनं एकाच शिरेमध्यें खेळूं लागेल. आणि तूंही आपली सध्यांची स्थिति खास विसरशील!

हंसचूड–ह्या तुमच्या बोलण्यानं तुमच्या कुलीनपणाची उत्तम साक्ष पटली. तुमच्या हृदयांत ज्या प्रेमाची कालवाकालव चालली आहे त्यानंच तुमच्या कुलीनपणाचा भूकंप केला आहे. अहाहा! शूरपणाचा मान आणि बलात्कार यांच्यामध्यें तुम्हीं केवढी तरी कुलीनपणाची विसंगतता आणलीत? आपल्या कपोलप्रदेशावर रुप्याप्रमाणें चमकणारं तें मानीपणाचं दंव मला पुसूं द्या? एका स्त्रीच्या अश्रूंच्या अगदीं साधारण जलप्रवाहानं जर माझं हृदय वितळलं आहे, तर मग तुमच्यासारख्या पुरुषजातीच्या अश्रूंच्या लोटानं–तुमच्या आत्म्यानं उत्पन्न केलेल्या वादळांतल्या सरीनं–ह्या वरच्या मेघडंबराच्या क्षितीजावरून होणारे धगधगीत उल्कापात बघून वाटणाऱ्या आश्चर्यापेक्षांही मला जास्त नवल वाटून, माझे डोळे दिपावेत यांत आश्चर्य नाहीं. शूर वृषसेनजी, काढा त्या कपाळावरच्या आठ्या! निधड्या छातीनं आपल्या अंतःकरणांतलं तें वादळ आपल्या श्वासाच्या एका झटक्या-बरोबर उडवून टाका! ह्या राक्षसी जगाचं पर्यालोचन केलेल्या पोरकट डोळ्यांप्रमाणें अश्रु गाळणारे ते डोळे पुसा! मेजवानींतल्या गप्पा, हास्य, विनोद किंवा दारूचे पेले–यांमध्यें

दंग होऊन, जगांतल्या दुसऱ्या कोणत्याही प्रकारांचा ज्याला अनुभव नाहीं अशाच्या सारखं करूं नका. चला–ह्या हंसचूडाच्या बरोबरीच्या वैभवाच्या थैलींत हवातितका खोल हात घाला. सरदारहो, तुम्ही जे सर्व माझं बल वाढवण्याकरतां माझ्या भोंवतीं जमले आहांत ते तुम्हीही तसंच करा. मी आतां जें कांहीं बोललों तें देवदूतच बोलला असं समजा. कारण, ते पहा! देवाचा निरोप घेऊन आमच्या कर्तबगारीवर परमेश्वराचा शिक्कामोर्तब करण्याकरतां कुशध्वजाचार्य कसे घाईनं इकडेच येताहेत.

(कुशध्वज येतो.)

कुशध्वज–हंसचूडा, तुझा विजय असो. बाबारे, जगद्गुरूंच्या मठाच्या पवित्र गादीपासून जो पराङ्मुख झाला होता तो कपिध्वज राजा आतां त्या गादीचा सेवक झाला. तेव्हां आतां त्याला भेडावणारं हें तुझं निशाण तूं आतां गुंडाळ! माणसाळलेल्या सिंहाप्रमाणं मोठ्या सभ्यतेनं शांततेच्या पदकमलीं रहा. नुसत्या देखाव्यापेक्षां ज्यापासून त्रास होईल असं आतां कांहीं एक करूं नको. भयाण युद्धाचं रानटी क्रूर स्वरूप शांत कर.

हंसचूड–आचार्य–महाराज, क्षमा करा. आतां मी कधीं मागें घेणार नाहीं. माझा जन्म उच्चकुलांत झालेला आहे. वाटेल त्याला ज्या हत्याराचा उपयोग करतां येईल असं मी क्षुद्र हत्यार नाहीं. इतकंच नव्हे तर वरिष्ठाच्या हुकुमाप्रमाणें कामागिरी बजावण्याला तयार होणारा मी नोकर नाहीं. जगांतल्या कोणत्याही राजाचा मी बंदीजन अथवा सार्वजनिक यंत्र नाहीं हें पक्कं लक्षांत ठेवा. ह्या दैवहत राज्यांत आणि माझ्यांत–युद्धाचा विझालेला निखारा प्रथम तुम्हींच फुंकून प्रज्वलित केलात. शिवाय, त्याला प्रज्वलित करण्याचीं साधनंही तुम्हीच आणून त्यांच्या पोषणानं हा भयंकर युद्धाग्नि तुम्हीच

कुलीनपणाची विसंगतता आणलीत? आपल्या कपालप्रदेशावर रुप्याप्रमाणें चमकणारं तें मानीपणाचं दंव मला पुसूं द्या? एका स्त्रीच्या अश्रूंच्या अगदीं साधारण जलप्रवाहानं जर माझं हृदय वितळलं आहे, तर मग तुमच्यासारख्या पुरुषजातीच्या अश्रूंच्या लोटानं—तुमच्या आत्म्यानं उत्पन्न केलेल्या वादळांतल्या सरीनं—ह्या वरच्या मेघडंबराच्या क्षितीजावरून होणारे धगधगीत उल्कापात बघून वाटणाऱ्या आश्चर्यापेक्षांही मला जास्त नवल वाटून, माझे डोळे दिपावेत यांत आश्चर्य नाहीं. शूर वृषसेनजी, काढा त्या कपाळावरच्या आठ्या! निधड्या छातीनं आपल्या अंतःकरणांतलं तें वादळ आपल्या श्वासाच्या एका झटक्या-बरोबर उडवून टाका! ह्या राक्षसी जगाचं पर्यालोचन केलेल्या पोरकट डोळ्यांप्रमाणें अश्रु गाळणारे ते डोळे पुसा! मेजवानींतल्या गप्पा, हास्य, विनोद किंवा दारूचे पेले—यांमध्यें

तयार केलात. तो आतां नुसत्या पूर्ववत् फुंकण्यानं कसा विझणार? सत्याची मुखश्री ओळखायला प्रथम आपणच मला शिकवलंत. ह्या भूमींत माझा कोणचा फायदा आहे त्याची ओळख तुम्हींच मला करून दिलीत. इतकंच नव्हे तर, हें कर्म करण्याची कल्पनाही तुम्हींच माझ्या हृदयांत बिंबवलीत. असं असतां पुन्हां तुम्हींच मला सांगतां कीं, कपिध्वजानं जगद्गुरूंच्या गादीशीं सख्य केलं म्हणून हा युद्धसंग्राम आटप! काय म्हणावं तुम्हाला? त्या तुमच्या सख्याशीं मला आतां काय करायचं आहे? वीरबाहूच्या मरणानंतर, माझ्या नुक्त्याच झालेल्या लग्नाच्या नात्यानं ह्या भूमीवर मी आपला वारसा दाखविणार! जी भूमी अर्धी अधिक सध्यां मीं जिंकली आहे ती कपिध्वजाच्या जगद्गुरूंशी झालेल्या सख्याकरतां सोडून परत जाऊं होय? मी का शृंगेरीच्या मठाचा गुलाम आहे? ह्या स्वारीकरितां जगद्गुरूंच्या मठानं एका छदामाची तरी झीज सोसली आहे काय? त्या मठाकडून आम्हाला किती माणसांची मदत झाली? कायकाय लढाऊ सामानाची त्यांनीं आम्हाला भरती केली? मी आणि माझी नोकरी करायला तयार असलेल्यांशिवाय ह्या लढाईचा भार इतर कोणीतरी सोसला आहे काय? ह्या भूमीच्या किनाऱ्यावर मी जेव्हां येऊन थडकलों, तेव्हां ह्या देशांतल्या लोकांनीं ' विजयी भवतु राजा हंसचूड! ' असे मोठ्यानं उच्चारलेले शब्द मीं ऐकले नाहींत काय? हें राज्य मिळवण्याच्या स्वल्प युद्धाच्या गंजिफांचा डाव मी खेळत असतां हटकुन अखेरी मारण्याजोगीं जीं पानं मला आलीं आहेत तीं मुद्दाम जाळून, आतां मीं काडी घेऊं काय? नाहीं—कधीं नाहीं. असं मी कधीं करणार नाहीं. आपलं बोलणं मला पसंत नाहीं.

कुशध्वज–तूं नुसतं वरकरणीं पहातो आहेस.

हंसचूड–वरकरणी असो अगर अंतःकरणी असो. सर्व जगाला भारी असं हें निवडक–शेलकं सैन्य जमवलं आणि नंतर युद्धाला निघालों. निघतांना माझ्या आशेनं मला जें वैभव प्राप्त होईल असं दर्शवलं होतं तें आतां भयाच्या किंवा प्रत्यक्ष मृत्यूच्या जरी जबड्यांत असलं तरी त्याची पर्वा न करतां, कीर्तीच्या लालसेनं मी लढणार. कधीं माघार घेणार नाहीं. (शिंगाचा नाद ऐकून) अँ–हा कुठल्या शिंगाचा नाद आम्हांला आव्हान करतो आहे. (**शबलाक्ष** येतो.)

शबलाक्ष–मी–परराष्ट्राच्या वकीलाच्या नात्यानें इथें आलों आहें. माझं बोलणं ऐकावं. जगद्गुरूंच्या मठाचे दूत कुशध्वजाचार्य, आपण आमच्या महाराजांच्या कामगिरीचा कसा काय निकाल लावला तो विचारण्यासाठीं मी त्यांच्याचकडून आलों आहें. आपण माझ्या प्रश्नाला ज्या तऱ्हेचं उत्तर द्याल त्याच धोरणाचा जबाब मला ज्या सूचना मिळाल्या आहेत त्यांवरून द्यायला ठीक पडेल.

कुशध्वज–राजा कपिध्वजाच्या इच्छेप्रमाणं वागायला युवराज हंसचूड तयार नाहीं. तो सलोखा करायला तयार नसून आपलं हत्यार कधींच खालीं ठेवणार नाहीं असं म्हणतो.

शबलाक्ष–ज्याचं रक्त नेहमीं रागच ओकतं –अशा तरुणानं असं बोलणं रास्तच आहे. असो. आतां माझ्या तर्फे इंद्रकीलच्या महाराजांचं बोलणं ऐका. 'कपिध्वज राजे लढायला तयार आहेत. तशी तयारी करायला त्यांना तसं कारणही आहे. ह्या युवराजांचं अशा तऱ्हेचं हें छांदिष्टपणाचं वर्तन आणि गैर रीतीचं वर्तन, हा स्वारीवर जाण्याचा विदुषकी थाट, ही लढाईची प्रहसनीय नकल, ही पोकळ धिटाई आणि हें पोरकट

सैन्य–ह्या सर्वांकडे पाहून–आमचे महाराज हंसताहेत. त्यांनीं सामना देण्याची तयारी केली आहे. ह्या पोरकट वामनी सैन्याला, चाबकाचे तडाके मारून आपल्या राष्ट्रांतून पळवून लावण्याची सिद्धता केली आहे. तुमच्या दरवाज्यांपाशीं तुम्हांला दंडूके मारून तुमच्या दारांच्या आड तुम्हाला लपण्यास लावण्याची, विहिरींतल्या पाण्यांतल्या घागरीप्रमाणें तुम्हांला लपून बसण्यास लावण्याची, तुमच्या तबेल्यांतल्या गवताच्या राशींत तुम्हांला दबून बसवण्याची, गहाणवट जिनसांप्रमाणें पेट्याफडताळांमधून तुम्हांला पडून रहाण्यास लावण्याची, डुकरांप्रमाणें तुरुंगाच्या आसपास अगर एखाद्या भुयाराचा आसरा तुम्हाला घ्यायला लावायची, आणि तुमच्या राज्यांतला एखादा कावळा नुसता करकरला तर त्याबरोबर त्याचा तो आवाज प्रत्यक्ष इंद्रकीलचा सशस्त्र राजाच असं तुम्हांला वाटायला लावण्याची–ज्या हातांत ताकत होती तोच त्या आमच्या प्रभूचा विजयी हात–ह्या प्रसंगीं–तुम्हांला इथून धुडकावून लावून शासन करायला कमजोर होईल असं तुम्हांला वाटतं काय? नाहीं. कधीं नाहीं. तो शूर राजा हत्यारबंद झाला आहे. आपल्या घरट्याजवळ येणाऱ्यावर झडप मारून त्याला छळण्याकरतां, गरुडाप्रमाणें तो तुमची त्रेधा करायला आपल्या हवेच्या अगदीं उच्च मनोऱ्यावर टपून बसला आहे. आणि तुम्ही–निसत्व, कृतघ्न, बंडखोर, आपल्या सृष्टीविरुद्ध ह्या इंद्रकीलमातेचा गर्भाशय फोडून, मातृहत्या करण्याची खटपट करीत आहांत–ह्या बद्दल तुम्हांला शरम वाटली पाहिजे. तुमच्या स्त्रिया आणि त्यांच्या निरुत्साह दासी आपल्या कोमल अंतःकरणांना कठोर आणि घातकी करून आपापल्या फणेऱ्यांतल्या सुयांचे भाले, अंगुस्तानांच्या ढाला आणि दोऱ्यांचे पाश करून–रणांगणांत तुमच्या पाठीमागें भुत्यांप्रमाणें दोम दोम करीत येतील.

हंसचूड–बस्स–तुझ्या त्या गर्वोक्ति आतां पुरे कर. गुपचुप परत जा. तुझ्या त्या बहकण्यानं आमचं कांहीं एक होणं नाहीं. तुझ्यासारख्या भांडखोराबरोबर आमचा अमोल वेळ आम्हांला व्यर्थ खर्च करणं आवडत नाहीं.

कुशध्वज–मला थोडं बोलूं द्या.

शबलाक्ष–नाहीं–नाहीं मीच बोलतों.

हंसचूड–आम्हीं दोघांचंही ऐकत नाहीं. युद्धाचं तोंड दुंदुभी आहेत. त्यांनांच आतां आपल्या आवाजानं आम्हीं इथें आल्याबद्दल मध्यस्ती करूं द्या.

शबलाक्ष–खरं आहे. तुमच्या दुंदुभींप्रमाणें तुम्हीही गर्जना कराल खऱ्याच. तुमच्या दुंदुभींच्या गर्जनांचे प्रतिध्वनि–इथून नजीकच असलेल्या आमच्या सैन्याच्या कानांत घुसल्याबरोबर त्यांचेही दुंदुभी आपल्या गर्जनांचे प्रतिशब्द तुमच्यापेक्षां जोरानं करतील. तुमच्या कानांत ते दडे बसवतील. मग ते काढण्याकरतां तुमच्या भेरी वाजवा–कीं आमच्या भेरी तात्काळ ज्वालामुखीपर्वतांचे आवाज करूं लागून–प्रलयकालच्या मेघांच्या गडगडाटालाही मागें सारतील. हे इथे कुशध्वजाचार्य उभे आहेत. ह्यांनां आमच्या शूर महाराजांनीं आपल्या आवश्यकतेकरतां–संधि होईलच ह्या विश्वासावर बसून–तुमच्याकडे धाडले नाहींत. तुमचा हा पोरखेळ कसाकाय होतो त्याची गंमत बघण्याकरतां ते अगदीं सज्ज होऊन जवळ येऊन ठेपले आहेत. त्यांनीं आज स्वतः क्षुधेनं पीडलेल्या मृत्यूचा अवतार धारण केला आहे. हजारों फेनपीयांच्या देहावर ताव मारण्याकरतां ते इथें धांवून आले आहेत.

हंसचूड–हा फारच ऐट मारतो आहे. ह्याची लढण्याची कितपत तयारी आहे ती पहाण्याकरतां, आमच्या रणभेरींच्या गर्जना सुरू करा.

शबलाक्ष–संशय कशाला? युवराज, काय आहे तें आतांच आपल्याला कळेल. (सर्व जातात व दुंदुभींचे आवाज होत असतां–कपिध्वज आणि संजीवसेन येतात.)

कपिध्वज–संजीवसेना, लढाईचा रंग कसाकाय आहेरे?

संजीवसेन–रंग मोठा चमत्कारिक दिसतो; पण महाराजांची प्रकृती कशी आहे?

कपिध्वज–ह्या तापानं मला बरेच दिवस पछाडलं आहे. हा मला खूप छळणार असं दिसतं. माझ्या हृदयानं तर अगदींच आशा सोडली आहे. (एक हेर येतो.)

हेर–महाराजांनीं रणमैदानांतून दूर जावं अशी शूर शबलाक्षरावांची इच्छा आहे. तेव्हां हुजूरची स्वारी कोणच्या रस्त्यानं कुणीकडे जाणार हें कळलं म्हणजे तसं जाऊन कळवायला ठीक पडेल.

कपिध्वज–आम्हीं ब्रह्मारण्यांतल्या मृत्युंजयाच्या मंदिराकडे जातों म्हणून कळीव.

हेर–सरकारनीं काळजी करायचं कांहीं कारण नाहीं. कारण, युवराज हंसचूडानं लढाईच्या सामुग्रीचा जो ज्यास्त पुरवठा मागवला होता तो तीन दिवसांपूर्वींच सुमोदखाडींत बुडाला अशी आतांच बातमी आली आहे. सध्यां फेनपीसैन्य शिथिलतेनं लढताहे. तें परत स्वदेशीं जाण्याच्या बेतांत आहे.

कपिध्वज–अरेरे! ह्या दुष्ट तापानं माझ्या अंगाला आग लावली आहे. ही आग मला त्या चांगल्या बातमीचा आदर करूं देणार नाहीं असं दिसतं. ब्रह्मारण्याकडेच नीट सरळ जाण्याची तयारी करण्याकरतां माझ्या मेण्याची तयारी करा. अशक्ततेनं मला घेरल्यामुळें चक्कर येतेशी वाटते. (सर्व जातात.)

प्रवेश तिसरा.

[रणमैदान–वृषसेन, सुभानु आणि इडस्पति येतात]

वृषसेन–कपिध्वजाला त्याच्या इतक्या स्नेह्यांची इतकी मदत होईल असं नव्हतं मला वाटलं.

सुभानु–पुन्हां एकदां खटपट करा. फेनपीसैन्याला पुन्हां आवेश आणा. त्यांच्या जयावर सध्यां आपलं नशीब अवलंबून आहे.

वृषसेन–तो कमअस्सल अवलादीचा शबलाक्ष आज बेसुमार लढला. त्यानं एकट्यानंच आज पराक्रम गाजवला.

सुभानु–कपिध्वज बराच आजारी असल्यामुळें, रणमैदानांतून तो दूर गेला आहे असं म्हणतात. (जखमी सुदर्शन येतो.)

सुदर्शन–(नोकरांस) इंद्रकीलच्या बंडखोरांकडे मला न्या.

वृषसेन–आम्हीं सुखांत होतों तेव्हां आम्हांला दुसरीं विशेषणं होतीं.

सुभानु–अँ–हे तर–सरदार सुदर्शनजी !

वृषसेन–आहो, हे तर मृतप्राय जखमी झाले आहेत.

सुदर्शन–इंद्रकीलच्या सरदारांनो, पळा–जा–इथून दूर जा! दुसऱ्याकडून तुम्हीं विकत घेतले जाऊन तुमची विक्री झाली. बंडखोरपणाचा रानटी डोळा आतां शांत करा. आपल्या हृदयांतून घालवून दिलेल्या राजभक्तीला पुन्हां पहिली जागा द्या. कपिध्वजराजाची भेट घ्या. त्याला शरण जा. तोफांच्या भडिमारानं उन्नत झालेला हा दिवस–फेनपांच्या सरदारांना जर विजयश्रीकडून माळ घालवील, तर तुम्हां सर्वांच्या शिरच्छेदाच्या मोबदल्यानं–तुम्ही केलेल्या परिश्रमाची फेड करावी असं करायचं हंसचूडानं ठरवलं आहे. ज्या अडोरपूरच्या शिवमंदिरांत तुमच्याशीं शेवटपर्यंत मैत्री राखून–कोणच्याही कारणानं प्रेम

शिथिल होऊं देणार नाहीं—अशी शपथ त्यानं वाहिली, त्याच ठिकाणीं हंसचूडाच्या बरोबर मीं आणि माझ्या बरोबरच्या लोकांनीं आतां सांगितल्याप्रमाणें शपथ वाहिली आहे.

वृषसेन—हें शक्य आहे का? हें खरं असेल का?

सुदर्शन—ज्याप्रमाणें विस्तवाच्या साम्न्याला उभा केलेला मेणाचा पुतळा स्वतः विरघळून जाण्याच्या उद्देशानंच उभा असलेला दृष्टीस पडतो—त्याचप्रमाणें यमसदनीं जाण्याची भेसूर मुद्रा माझ्या देहानं धारण केलेली दिसत नाहीं काय? मींच जर फसवेगिरी सोडली तर जगांत मला कोण फसवणार आहे? यापुढें सत्यतेनं वागूनच जर मीं मरण्याचा बेत केला तर मग खोटेपणा करण्यांत अर्थ काय? हंसचूड जर आज विजयी झाला तर, उद्यां सकाळीं सूर्यानं पूर्वदिशा आलंकृत करण्याचं कौतुक तुमच्या नेत्रांना बघायला खचित सांपडणार नाहीं. सुर्योदयाच्या आंतच तुम्हां सर्वांचे बळी घेण्याची हंसचूडानं शपथ घेतली आहे.

वृषसेन—हंसचूडानं जर आज आमच्या साह्यानं जय मिळवला, तर सर्व दिवसभर कामकरून थकलेल्या ह्या वृद्ध आणि अशक्त अशा सूर्याची जागा बळकावून, रोगट हवा उत्पन्न करून—तींत आम्हांला गुरफटून टाकणाऱ्या रात्रींतच तो आमचे शिरच्छेद करणार काय?

इडस्पति—कपिध्वजाशीं आम्हीं केलेला अत्यंत सुरेख असा विश्वासघात—हंसचूड ओळखीत असल्याकारणानं त्याचा मोबदला तो आमच्या शिरच्छेदाच्या विश्वासघातानंच आम्हाला देणार असं वाटतं.

सुदर्शन—माझा पणजा इंद्रकीलचाच असल्यामुळें, तुमचे प्राण वांचविण्याची मला स्फूर्ति होते आहे. मला तुमच्याबद्दल

मोठं प्रेम आणि आदर वाटतो. म्हणून, कपिध्वजराजाचा जो संजीवसेन म्हणून सरदार आहे त्याच्याकडे मला न्या! ऐका, रण-वाद्यांचे आवाज स्पष्ट ऐकूं येताहेत. मला लवकर इथून घेऊन चला. नाहींतर माझ्या शिल्लक राह्यलेल्या आशा तशाच राहून चिंताग्रस्त आणि ईशसेवेचा भुकेला अशा माझ्या आत्म्याला ह्या माझ्या शरीरापासून विभक्त व्हावं लागेल.

वृषसेन–तुमचं बोलणं खरं आहे. मी आपलं मन शांत करतों. सध्यांचा प्रसंग मोठा गोड आला आहे. त्याच्या सुंदरपणाचं मला मोठं प्रेम वाटतं. ज्याप्रमाणें पाण्याचा ओघ मार खाऊन उलट फिरतो त्याप्रमाणें, ज्याच्या योगानं माघार घेण्याच्या घाणेऱ्या पायऱ्या न तुडवल्यासारख्या होणार असं वाटताहे–त्याच प्रसंगाची आशा सोडून, पत्करलेला सध्यांचा दुर्मार्ग आणि हेकटपणा जर सोडला तर खचित उत्तम होणार आहे.

इडस्पति–ज्या आज्ञाधारकतेचा आम्ही त्याग केला आहे तींमध्यें आम्हीं अशा वर्तनानं मोठ्या शांततेंत राहून आमच्या महोदधि कपिध्वजराजाकडे सरळ जाऊन पोंचूं असं वाटतं.

वृषसेन–आपल्याला मी स्वतः इथून घेऊन जातों. आपल्या डोळ्यांत–मला अगदीं बरोबर मृत्यूच्या वेदना दिसूं लागल्या आहेत. मित्रहो, चला. आपल्यापुढें आतां हें नवं परावर्तन उभं आहे. तें अगदीं नवं असल्यामुळें मोठं सुखकारक आहे. हक्काचं नवं राज्य मिळवण्याचा त्याचा उद्देश आहे. म्हणून चला. फिरा माघारे. (जातात.)

प्रवेश चवथा.

[फेनपीसैन्याचा गोट–सेवकांसह हंसचूड येतो.]

हंसचूड–इंद्रकीलच्या फौजेनं आपल्याच भूमीवर–भित्रेप-णाच्या निर्लज्जतेचा माघार घेतला त्यावेळीं–आकाशस्थ सूर्यमहा-

राज अस्तमानीं जायला माघार घेत होते असं दिसलं; परंतु त्यांनीं थांबून हें पश्चिमेकडचं नभोमंडळ लज्जित केलं. आमच्या तोफांची आम्हांला एकही फैर झाडावी न लागतां–त्याच लढाईच्या भयंकर श्रमांनंतर–आम्हीं मोठ्या विजयानं–या रात्रीला सलामी देतदेत–समरभूमींतून आमच्या गोटांत परत आलों. विजयानं फडकणारा झेंडा–आम्ही आतां ह्या भूमींत अखेरचाच विश्रांति घेत ठेवला असं म्हणायला हरकत नाहीं. (एक हेर येतो त्यास.) काय बातमी आहे?

हेर–सरदार सुदर्शनजी मारले गेले. आपल्याकडे आलेले कपिध्वजाचे सर्व सरदार–त्यांच्याच चिथावणीवरून परत गेले. लढाईच्या सामुग्रीचा पुरवठा येण्याची आपण बरीच वाट पहात आहांत; पण तो एकाएकीं सुमोदखाडींत बुडाला.

हंसचूड–हाय–हाय! केवढी ही हृदयद्रावक वार्ता! ही बातमी न कळवण्यासारखं तूं तें आपलं हृदय तरी कठोर कर. ह्या बातमीनं मला आतां जितकं उद्विग्न केलं आहे तितकं ह्या रात्रीनं खास केलं नसतं. रात्रीच्या घोंटाळ्यानं आमचं सैन्य आपला रस्ता चुकायच्या आधींच एकदोन तास, कपिध्वजराजा पळून गेला–असं सांगणारा तो कोण होता?

हेर–तसं कुणी जरी सांगितलं असलं तरी तें खरं होतं सरकार!

हंसचूड–ठीक आहे. आपलं काम योग्य रीतीनं बजावण्याची हेळसांड करूं नको. उदयीक उत्कृष्ट धाडस करायला आम्हीं सूर्योदयाच्या आधींच उठूं! (जातात.)

प्रवेश पांचवा.

[ब्रह्मारण्यांतील रस्ता–**चित्रसेना** काळा झुबा घालून येते.]

चित्रसेना–ज्या निशासुंदरीच्या साम्राज्यांत–दुष्ट, घातकी प्राण्यांना–बेधडक अघोर कर्मं करतां येतात, घुबडं आनंदानं घूत्कार करतात, भित्रे प्रवाशी कल्पनामय पिशाच्चांना भेदरतात, क्रूर विचार–मनोवेगानं धांवतात आणि अमंगल कृत्यांचे डाव उघडपणें खेळले जातात–ती सर्वोत्तम कुविचारांची स्वामिनी माझ्या मनांतल्या बेतांना–आपल्या उदराच्या काळ्याकुट्ट आवरणांत कां लपवून ठेवणार नाहीं? माझा बाळ वीरबाहू–धनगराच्या पोराच्या वेषानं तटावरून उडी मारून, हंसचूडाच्या गोटांत ह्यावेळीं जाऊन पोंचलाच असेल. संजीवसेनजी, तुमचे–माझ्या बाळावरचे आणि माझ्यावरचे उपकार–रात्रीचा शेजारी जो दिवस त्याच्या मस्तकावर आनंदानं विहार करोत. तुमच्याच कृपेनं आम्हीं दोघं तुरुंगवासांतून सुटलों. एक प्राणी मित्राकडे गेला आणि हा दुसरा प्राणी आतां शत्रूकडे चालला आहे. माझा बेत पूर्णावस्थेला पोंचून, जगाच्या दृष्टीला पडल्यावर तो रक्तपाताचं प्रदर्शन करणारा आहे असा जरी भास झाला,तरी 'जशास तसं' हें जें नैसर्गिक न्यायाच्या पुस्तकांत एक कलम आहे–त्याच्याच पायावर माझ्या कर्तृत्वशक्तीची वास्तुशांती व्हायला काय हरकत आहे? म्हणून–खुनाच्या मदतगार पिशाच्चांनो, या–माझ्या मदतीला या! स्त्रीचं धाडस धरून तुमची अतर्क्य शक्ती मला द्या. आपण एकमेकांच्या मदतीनं त्या घातकी कपिध्वजाच्या उरावर ह्या जंबियानं मृत्यूला आंत घुसायला दरवाजे करून देऊं. त्या चोरानं चोरलेलं माझ्या बाळाचं सिंहासन अशा तऱ्हेनं रिकामं करून–वीरबाहूच्या निरुपद्रवी आणि कोमल पराक्रमाला त्यावर अभिषिक्त करूं.

हंसकेतूसारख्या प्रबल राजाच्या हातून जें कृत्य झालं नाहीं–तें–ही चित्रसेना–एक निरपराधी विधवा स्त्री–आज–स्त्रियांच्या न्यायी धाडसाचा ध्वज उभारणार आहे. (पाहून) अगबाई, पण हे दोघे दोहींकडून कोण येताहेत! आतां आपण ह्या मधल्याच रस्त्यानं इथून जावं हें बरं.

(जाते व **शबलाक्ष** आणि **संजीवसेन** समोरासमोर दोहोंबाजूंनीं येतात.)

संजीवसेन–कोण आहे तें? बोला–जलदी जबाब द्या! नाहींतर मेलांत समजा.

शबलाक्ष–मित्र आहे. आपण कोण आहां?

संजीवसेन–इंद्रकीलच्या राजाची प्रजा आहे.

शबलाक्ष–मग ही प्रजा चालली कुठे?

संजीवसेन–तुम्हाला त्याची जरूर? माझ्याबद्दल तुम्हीं चवकशी केलीत तशी मी तुमच्याबद्दल कां करूं नये?

शबलाक्ष–कोण, संजीवसेनजी काय?

संजीवसेन–तुमचा तर्क खरा आहे. माझा शब्द तुम्हीं चट्कन् ओळखलांत–तेव्हां तुम्हीं माझे कुणी तरी मित्रच असलां पाहिजे. तुम्हीं कोण आहांत?

शबलाक्ष–ज्याअर्थीं तुम्हीं मला आपला स्नेही असं समजतां त्या अर्थीं तुम्हीं आपला उलट स्नेह दाखवण्यांत, मी माझ्या कुळाच्या एका बाजूनं राजवंशीय आहे हें लक्षांत ठेवा!

संजीवसेन–अरेरे! केवढा हा प्रमाद! स्मृतीच्या अवकृपेनं आणि ह्या रात्रीच्या अंधळेपणानं माझी अगदीं फजीती केली. शूर सरदारसाहेब, माफ करा. आपल्या तोंडून, एक वर्णोच्चार झाल्याबरोबर, माझ्या कानांत त्याची खरी–खरी परीक्षा झालीच पाहिजे.

शबलाक्ष–पुरे आतां तो दरबारी थाट. नवी बातमी काय आहे ती सांगा आधीं.

संजीवसेन–वाहव्वा! ह्या रात्रीच्या ह्या अशा काळ्याकुट्ट अंधेरांतून मी तर तुमचाच शोध करीत चाललों आहें.

शबलाक्ष–काय आहे तें सर्व थोडक्यांत सांगा.

संजीवसेन–सरदारसाहेब, बातमी मोठी वाईट आहे. भयंकर आहे. सौख्य हरपणारी अशी राक्षसी आहे. काळीभोर–अगदीं ह्याच रात्रीसारखी आहे.

शबलाक्ष–जखम पाहून घेरी येणारी मी कांहीं स्त्री नाहीं. अशी केवढी जबर जखम ह्या रात्रीला झाली आहे ती खुशाल सांगा.

संजीवसेन–सांगायला मला भय वाटतं. महाराजांना विषप्रयोग झाला. त्यांनां मी सोडले तेव्हां त्यांची वाचा बंद झाली होती. म्हणून, त्या घोंटाळ्यांतून तुमचा शोध करीत–आळसावर गोष्ट न टाकतां–ताबडतोब तिथून निघालों. कारण, ह्या प्रसंगीं, योग्य विचार करणारा तुमच्याशिवाय कोणी नाहीं–ह्याबद्दल माझी खात्री आहे.

शबलाक्ष–पण त्यांनीं तो कसा होऊं दिला? तो त्यांच्यावर कोणी केला?

संजीवसेन–एका जोग्यानं. एका निश्चयी दुष्टानं. हें कृत्य चित्रसेनेनं करवलं असा अदमास आहे. त्यांचीं आतडीं एकाएकीं बाहेर पडलीं. महाराज अजूनही बोलूं लागतील असं वाटतं. त्यांची प्रकृती दुरुस्त होण्याचा संभव आहे.

शबलाक्ष–पण सध्यां महाराजांची शुश्रूषा करायला कोण आहेत?

संजीवसेन—आपले फितूर होऊन गेलेले सर्व सरदार परत आले. त्यांना युवराज मणिधरांनीं महाराजांच्याकडे नेले हें तुम्हांला माहित नाहीं वाटतं? युवराज मणिधरांच्या मध्यस्तीनं महाराजांनीं त्या सर्वांना क्षमा केली. सध्यां तेंच मंडळ महाराजांच्या भोंवतीं शुश्रूषेकरतां आहे.

शबलाक्ष—हे सर्वशक्तिमान प्रभो, आतां आपला राग शांत कर. आम्हीं सोसलं ह्यापेक्षां आतां आम्हांला जास्त सोसायला लावूं नको! ह्या समुद्राच्या बाजूनं मी येत असतां, संजीवसेनजी, तुम्हांला काय सांगूं—माझ्या फौजेपैकीं अर्धी अधिक फौज अंधेरांत समुद्राच्या भरतींत गारद झाली. मी आणि माझ्या बरोबरचे चांगले हुषार असे स्वार काय ते बचलों. चला आतां लवकर. मला महाराजांकडे न्या. नाहीं तर मी तिथें जाण्याच्या आधींच त्यांचं देहावसान होईल. मला शंका येते. (जातात व राजपुत्र **मणिधर, वृषसेन** आणि **इडस्पति** येतात.)

मणिधर—महाराजांचं सर्व रक्त—दूषित झालं आहे. ज्याला आत्म्याचं राहण्याचं नश्वर असं घर म्हणतात—त्या त्यांचा स्वच्छ मेंदूवर ज्या साहजिक टीका चालल्या आहेत—त्यावरून त्या क्षणभंगुर जीविताच्या शेवटाचं भविष्य ठरतं. (**सुभानु** येतो.)

सुभानु—सरकारस्वारी अद्याप बोलत आहे. त्यांना जर उघड्या हवेंत नेलं, तर ज्या राक्षसी विषानं त्यांच्या देहावर आपला पगडा बसवून, त्यांच्या अंगाचा दाह केला आहे, तो शमेल अशी त्यांची खात्री आहे.

मणिधर—असं असेल—तर—इडस्पति, त्यांना फळबागेंत घेऊन या. (**इडस्पति** जातो.) पण महाराज अजून चावळताहेत काय?

सुभानु–आपण महाराजांकडून आलां तेव्हांपेक्षां ते सध्यां बरेच शांत झाले आहेत. आतां इतक्यांत त्यांनीं एक सुंदर स्तोत्र गायलं.

मणिधर–हर–हर! केवढा हा अजारीपणाचा पोकळपणा! दुःखाचा अतिरेक होत असला, म्हणजे त्या अजारीपणाच्या व्यथांची शरीराला विस्मृति होते. शरीरावर यथेच्छ ताव मारून, त्याची चेतना नष्ट केल्यावर–आतां मृत्यूनं त्यांच्या मनाला वेढा दिला आहे. आपल्या चमत्कारिक गमतीच्या सैन्याकडून त्यांच्या त्या आत्म्याला जर्जर करून सोडण्याकरतां त्या देहरूप भक्कम किल्यांत प्रवेश करण्यामध्येंच मृत्यु घोंटाळून राह्यला आहे. यमनगरीचा मार्ग धरलेल्या त्या निशक्त राजहंसाचा मी बच्चा आहें. स्वतःच्या आत्म्याबरोबर जाणाऱ्या श्वासनलिकेंतल्या जीर्ण आवाजानं आपल्या आत्म्याला आणि देहाला शेवटची विश्रांती देण्याकरतां तो राजहंस आपल्या मृत्युमखांतली ईशस्तवनाची सूत्रं स्वतःच गातो आहे.

वृषसेन–युवराज, आपण शांत झालं पाहिजे. महाराजांनीं जें कांहीं अपाचित ठेवलं आहे त्याचा रानटीपणा आणि बांकडा-तिकडा आकार मोडण्याकरतांच आपला जन्म झाला आहे. चला. महाराजांची तब्येत पाहूं. (जातात.)

प्रवेश साहवा.

[ब्रह्मारण्यांतील मृत्युंजयाचें देवालय. राजा **कपिध्वज** विव्हळत पडला असून, एका बाजूला **वीरबाहूचें** प्रेत पडलें आहे असा प्रवेश उघडतो]

कपिध्वज–अँः–अयाई–अरेरे! आतां माझ्या जीवाला वाटेल तिकडे फिरायला ह्या देहांत जागा आहे. ह्या जागेला दरवाजे, खिडक्या वगैरे कांहीं नव्हतं तोंपर्यंत–त्यानं ह्या देहाचा त्याग करणं नाकारलं होतं. ह्या माझ्या देहांतल्या

उन्हाळ्याची उष्णता इतकी वाढली आहे कीं, ती सर्व देहाची राखरांगोळी उडवणार असं वाटतं. माझ्या देहाची ही राकट तसबीर, मृत्यूच्या कलमानं ह्या चर्मपटावर काढलेली असून–ती आतां आगीच्या सांनिध्यानं सुरकुतून जाणार असं वाटतं. अयाई! अरेरे! (शांत पडतो व **चित्रसेना** येते.)

चित्रसेना–ही रात्र फारच भयंकर. हांतून घडलेलीं अघोर पातकं ह्याचवेळीं मनुष्याला पूर्णपणें डिवचतात. आपण एकांतांत आहोंत अशी समजूत नसतांही क्षणैक भ्रमानं मन शांत होण्याकरतां तीं पापं तोंडावाटें बाहेर पडून–त्यांच्या गुप्तपणाचा बुरखा दूर होतो. तीं दिगंबर होऊन जगापुढें येतात. अघोर पातकी असेच पकडले जातात. हीच अघोर पातकांची वाचा. हा पातकी चांडाळ इथें आपल्याशींच बरळत पडला आहे. पहा–ह्याच्या देहांत दुष्कृत्यांची उष्णता वाढल्यामुळेंच हा मृत्यूच्या दारापर्यंत जाऊन पोंचला आहे. ह्या जंबियाच्या एका वारानंच हा अधोगतीला जाणार आहे. (ऐकून) काय, मध्यान्हरात्रीं कावळ्याचं करकरणं ऐकू येताहे? वा! ह्या वेळीं माझ्या कृत्याला हें अनुमोदनच देताहे. तेव्हां–मित्रा, चल–नीघ बाहेर. (जंबिया काढून) वास्तुपुरुष कंटाळलेल्या आणि अनेक पावसाळे खाऊन अव्यवस्थितपणांत ओंगळ, रडकं–रूप आलेल्या भयाण इमारतीप्रमाणेंच जें ह्याचं शरीर दिसताहे–त्यावर तूं आपल्या विजेचा शक्तिप्रहार करून, त्याला जमिनदोस्त कर. असल्या ह्या अघोर–पातकी विक्राळ मुखश्रीकडे पाहून–तीं पहा–पिशाच्चांनीं सुद्धां आपलीं तोंडं लपवलीं. म्हणून आतां उशीर नको–चल!

(जंबिया मारायला जाते इतक्यांत.)

कपिध्वज–जरा दमधर.

चित्रसेना–नाहीं. तुझी दुष्कृत्यं तुला अधोगतीला धाडताहेत. जा. एकदम जा. स्वर्गारोहणाची आशा सोड.

कपिध्वज–हे साहसी स्त्रिये, आतां विनाकारण माझा खून कां करतेस? मला विषप्रयोग झाला आहे. त्याच्या वेदनाच यमाचे दूत बनल्या आहेत. त्या मला फरफर ओढून नरकाकडे नेताहेत. मी अघोर पातकी आहें. माझा वडील भाऊ अजितसिंह तोच तुझा नवरा. सुकुमार, निरपराधी वीरबाहूचा तोच बाप. त्याचा कांहीं एक अपराध नसतां फक्त राज्यलोभानं मीं त्याचा खून करवला आणि तीच पापवासना आतां माझा खून करीत आहे. म्हणून तूं माझा खून करून पातकी होऊं नकोस.

चित्रसेना–कां बरं? मांगा, माझ्या बाळाचा राजदंड चोरणाऱ्या भामट्या–मी तुझा सूड कां न घ्यावा. तुझी दुष्कृत्यंच तुझा खून करावा असं मला सांगताहेत. मी तुझा खून करणार. तुझी एकेक दुष्कृत्यं जर मी बोलायला लागलें तर युगंचीं युगं लोटतील. ह्या जंबियांत जर कांहीं सद्गुण असेल, तर जगावर उपकार करण्याकरतां तरी हा तुझं रक्त खास पीईल. ह्याला जबर तहान लागली आहे. हा विषारी तक्षक तुझा सूड उगवायला धांवून आला आहे.

कपिध्वज–नको. त्याच्या दांतांतलं तीव्र विष अति उष्ण आहे. ह्या देहांत सगळा नरक आहे. त्या नरकांत घुसलेलं विषरूपी पिशाच्च माझ्या गढुळ रक्ताला तुच्छ मानून, द्वेषभावानं तें त्यावर इतकं जलद ताव मारताहे कीं, आतां तें शुद्ध होण्याची आशाच नाहीं. ज्या रज्जूंनीं माझं हृदय बांधलं गेलं होतं त्या तुटून–तें फुटून–जळून खाक झालं. माझ्या जीवित–तारवाच्या

शिडाच्या सर्व दोऱ्या तुटून तें आतां अगदीं एका केंसा-इतक्या जोराच्या दोरीवर उभं आहे. माझं हृदय एका जीर्ण अशा शिरेच्या जोरावर जिवंत आहे. ह्या कोम्यांत झालेल्या कडक उन्हाळ्याला आपल्या थंडगार बोटांनीं शांत करायला-हिंवाळ्याला बोलावून आणायला आतां कोणीही समर्थ नाहीं. इतकंच नव्हे तर ह्या इंद्रकीलांतल्या सर्व नद्यांनीं जरी आपले ओघ वळवून, माझ्या हृदयाकडे धांव मारली तरी तें निर्फळ होईल. उत्तरध्रुवाकडला थंडगार वारा जरी ह्या चर्ममय ओष्टांचं चुंबन करूं लागला, तरी तेंही व्यर्थ होणार आहे. म्हणून म्हणतों कीं, तूं माझा खून करून पातकी होऊं नकोस. तूं ज्याकरतां माझा खून करायला आली आहेस तें तुझं कार्य आतां शेवटाला जाणं नाहीं. तूं ज्या सिंहासनाकरतां माझा खून करणार–त्या सिंहासनाला पराङ्मुख होऊन आधींच तें पहा–तुझं बाळ तिथें खून होऊन पडलं आहे. म्हणून आतां माझा खून करून तूं काय करणार? (चित्रसेनेच्या हातांतला जंबिया खालीं पडतो.) तुला दिसताहे हें माझं स्वरूप–नाश पावत असलेल्या कपटी राजमूर्तीचं–मृत्तिकेचं चित्र–तुला कांहीं वेळानं दिसणार आहे. हा सारा कपटप्रभाव बरं! समानदर्शी न्यायदेवतेनं मला चांगलं बक्षीस दिलं. आटपलं–आतां काय?

चित्रसेना–विषराज, ठीक चालवलं आहे. खून–माझ्या बाळाचा खून –याच मांगानं करवलान. हायरे दैवा! धनगराच्या पोराचा वेष घेऊन तटावरून उडी मारण्याचं त्याचं ते धाडस–त्याला हंसचूडाच्या गोटांत नेऊन खास पोंचवील असं मला वाटलं होतं. पण अखेर त्यानं दगा दिला. ह्या अनंत कालाच्या झपाट्याच्या गतीबरोबर एकसारखं धांवत राहून त्याच्या आधींच आम्हांला थांबलं पाहिजे. ह्या जगाची

…ाश्वती काय आहे? आशा अगदीं व्यर्थ आहे. हाच माझा बाळ–भूपाळ व्हावा म्हणून मी खटपटी करीत होतें; पण देवानं त्याला भूभाग करून टाकला. आतां माझं जगणं कः-पदार्थ–धरिणीला भार असं झालं. मांगा–कपिध्वजा, मर–असाच वेदनांनीं विव्हळत मर. (जंबिया घेऊन) जो हा जंबिया तुझा प्राण घ्यायला सज्ज झाला होता तोच सध्यां आपल्याला चांगलं भक्ष्य मिळालं नाहीं म्हणून जमीनीवर अश्रु गाळीत पडला होता. पण त्याचं शौर्य अजून कायम आहे. त्याच्या अश्रूंच्या नदींत त्याच्याच शौर्याची नाव ढकलून–तिच्यांत मी बसतें. ती मला स्वर्गसुख दाखवील.

कपिध्वज–चित्रसेनावहिनी, अखेरची बातमी काय आहे … ऐकण्याकरतांच ह्या कुडींत माझा जीव थांबला आहे. मी पातकी आहें. ह्या विषाच्या वेदनांनीं तडफडून मेलेला मला पहा आणि मग आपल्या जिवाचं वाटेल तें करा.

चित्रसेना–नाहीं, माझ्या बाळानं माझ्या आधीं स्वर्गारोहण …, आपल्याकडे वडीलपणा घेतला–तसा मी तुला नरकांतसुद्धां … घेऊं देणार नाहीं. माझा जीव–ह्या देहाची कक्षा सोडून … आधीं जाणार. हें जग इतकं कपटी आहे कीं, त्याच्या …मावाला मी हें असं अखेरचं दंडवत घालणार!

(जंबिया मारून घेऊन मरून पालथी पडते. **शबलाक्ष, वृषसेन, इडस्पति, माणेधर,** येतात.)

कपिध्वज–अरे, सांगारे, मला कुणी अखेरची बातमी सांगा. माझ्या कपटवन्हीनं मला जाळलं. माझ्या देहाचा भडका झाला. माझ्या कपटनाटकाचा अखेरचा पडदा पडण्याची वेळ आली. मला गारठ्याचं सौख्य द्या. मी मागतों आहे तें न देण्याइतके तुम्ही कृतघ्न आहांत कारे? आगाई–अरेरे–राम! (मरतो.)

B/8